पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

सोमवार, दि. १३ जानेवारी, २०२५ | वर्ष : १३ | अंक : ००८ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in | E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ लोकशाही आणि विचारांची लढाई आता उरली नाही

४ प्राईड अकॅडमीचे ग्रामीण भागात शिक्षण क्षेत्रात आदर्शवत

६ प्लास्टिकच्या बाटलीतून पाणी पिणे चांगलं की वाईट?



पान ८ वर..

# श्रध्दा आणि सबुरीचा अर्थ न समजलेल्यांची अवस्था बिकट : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## शिर्डी येथील भाजपच्या अधिवेशनात विधानसभा निकालाचा दाखला देत विरोधकांवर हल्लाबोल

जनप्रवास । प्रतिनिधी

शिर्डी : विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या घवघवीत यशानंतर आता भाजपाचं शिर्डीत महाविजय अधिवेशन पार पडत आहेत. या अधिवेशनासाठी राज्यातील भाजपाचे सर्व नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे देखील उपस्थित आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपाचं हे अधिवेशन महत्वाचं मानलं जात आहे. या अधिवेशनात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या यशाबद्दल सर्वांचे आभार मानले. तसेच महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला. ज्यांना श्रद्धा आणि सबुरीचा अर्थ समजला नाही, त्यांची हालत काय झाली? हे विधानसभेला आपण पाहिलं', असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला.

महाराष्ट्रामध्ये आपल्याला जो महाविजय प्राप्त झाला, त्याबद्दल आपल्या सर्वांना माझा साष्टांग दंडवत. कारण जनतेमुळे हा महाविजय मिळाला. आपल्या या लढाईमध्ये २४ तास आपल्याबरोबर अमित शाह होते. लोकसभेच्या निवडणुकीत मिळालेल्या अपयशानंतर कार्यकर्त्यांना लक्षात येत नव्हतं की आपलं काय चुकलं? मात्र, अशा परिस्थितीत अमित शाह यांनी विविध ठिकाणी मेळावे घेत आपल्याला मार्गदर्शन केलं, कार्यकर्त्यांच्या मनात ऊर्जा निर्माण केली. त्यानंतर भाजपाने



महाविजय मिळवला. आज आपण शिर्डीत हे महाविजय अधिवेशन घेत आहोत याचा मला आनंद आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

साईबाबांनी आपल्याला श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र दिला. श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र आपल्या भाजपात महत्वाचा आहे. राष्ट्र प्रथम म्हणजे श्रद्धा आणि नंतर सबुरी म्हणजे आपण. हा मंत्र आपण सर्वजण पाळत असतो. आपल्याला माहिती आहे की ज्यांना हा मंत्र समजला ते सर्व यशस्वी झाले. पण श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र ज्यांना समजला नाही, त्यांची हालत काय झाली? हे आपण विधानसभेच्या निवडणुकीत पाहिलं, असं म्हणत देवेंद्र फडणवीसांनी विरोधकांवर टीका केली. महाराष्ट्राच्या जनतेने आपल्याला एक नाही तर तीन वेळा भाजपाला १०० पेक्षा जास्त जागा दिल्या. ३० वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासात १०० पेक्षा जास्त जागा मिळवणारा आपला पक्ष आहे. आपण पाहतो की जसं जी–२० असतं, जी–७ असतं. तसं भाजपाचं जी–६ तयार झालं, म्हणजे जे लगातार तीन वेळा जिंकले त्या राज्यांच्या म्हणजे गुजरात, मध्ये प्रदेश, गोवा, छत्तीसगड आणि हरियाणाबरोबर आता महाराष्ट्र देखील जुडलेला आहे. लोकसभेच्या निवडणुकीत ४८ पैकी १७ जागा आपल्या निवडून आल्या. जेमतेम ३५ टक्के मार्क घेऊन आपण काठावर पास झालो होतो. मात्र, त्यानंतर आपण विधानसभेला २८८ पैकी २३७ जागा आपण जिंकल्या आणि ८२ टक्के गुण मिळवले. भाजपाने तर ८९ टक्के गुण मिळवले आणि आपला पक्ष मेरिटमध्ये पास झाला, असंही देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं.

## संक्षिप्त

### परभणीत गॅस सिलिंडरचा स्फोट

जनप्रवास । प्रतिनिधी

परभणी : शहरातील वर्दळीच्या वसमत महामार्ग रस्त्यावर शिवशक्ती बिल्डिंग परिसरात एका वडापावच्या गाडीला आग लागल्याची घटना शनिवारी रात्री प १२ वाजण्याच्या दरम्यान घडली. त्यामध्ये दोन सिलिंडरच्या स्फोट होऊन मोठे नुकसान झाले .

या घटनेनंतर त्वरित परभणी महापालिकेचे अग्निशमन पथक घटनास्थळी दाखल झाले होते. तसेच नवा मोंढा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गवते आणि कर्मचारीसुद्धा आले होते. तुलसी हॉटेलसमोर वसमत रोड येथे मातोश्री वडापाव गाड्याला आग लागल्याची माहिती रवि बाळासाहेब मोरे यांनी दिली त्याप्रमाणे घटनास्थळी जाऊन आग आटोक्यात आणून पूर्णपणे थांबविली. यात दोन गॅस सिलिंडर व इतर साहित्य आगीत जळाले. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. प्रभारी अग्निशमन केंद्र अधिकारी डी. यू. राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली जवान उमेश कदम, अक्षय पांढरे, वाहन चालक वसीम अखिल अहमद हे दाखल झाले होते. रविवारी सकाळी अनेक नागरिकांना या घटनेची माहिती होताच त्यांनी घटनास्थळी जाऊ काय नुकसान झाले, स्फोट कसा झाला याची माहिती घेतली.

### डोनाल्ड ट्रम्प यांचा २० जानेवारीला शपथविधी

जनप्रवास । वृत्तसंस्था

वॉशिंग्टन : ट्रम्प आणि मोदी यांची दोस्ती जगाने पाहिली होती. आता पुन्हा ट्रम्प सत्तेत येत आहेत. येत्या २० जानेवारीला ट्रम्प यांचा शपथविधी होत आहे. याचे निमंत्रण अमेरिकेने भारताला पाठविले आहे.

अमेरिकेचे नवे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी २०१९ मध्ये तेथील निवडणूक काळात हाऊडी मोदी, नमस्ते ट्रम्प असे दोन गाजलेले, मोठाले कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतले होते. या काळात ट्रम्प आणि मोदी यांची दोस्ती जगाने पाहिली होती. आता पुन्हा ट्रम्प सत्तेत येत आहेत. येत्या २० जानेवारीला ट्रम्प यांचा शपथविधी होत आहे. याचे निमंत्रण अमेरिकेने भारताला पाठविले आहे. या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी जाणार नसून त्यांच्याऐवजी परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर सहभागी होणार आहेत. ट्रम्प यांच्यासोबतच उपराष्ट्रपति जे.डी. वेंस यांचाही शपथविधी होणार आहे. ४७ वे राष्ट्रपती म्हणून ट्रम्प शपथ घेणार आहेत. ट्रम्प हे दुसऱ्यांदा राष्ट्रपती होत आहेत. २०१९ मध्ये त्यांना पराभवाचा सामना करावा लागला होता.जयशंकर या दौऱ्यात ट्रम्प सरकारच्या अधिकाऱ्यांशीही बैठका करणार आहेत. अमेरिकेतील राष्ट्रपती निवडणुकीनंतर अनेक देश अमेरिकेबद्दल चिंतेत आहेत,

## 'गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक आजुबाजूला फिरकणार नाहीत, याची काळजी घ्या'

### उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या सूचना

जनप्रवास । प्रतिनिधी



पुणे : हल्ली फोटो काढण्यासाठी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी होते, पण एखादा फोटो असा येतो की आमची वाट लागते, त्या मुळे हल्ली जरा भीती वाटते, कार्यकर्त्यांनीही आमच्यासोबत कोण फोटो काढून घेतात यावर लक्ष ठेवावे, अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

बारामती तालुक्यातील पणदरे येथे एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी ही बाब बोलून दाखवली. बीड येथील घटनेचा नामोल्लेख टाळून त्यांनी यावर भाष्य केले. अजित पवार म्हणाले, हल्ली कार्यकर्ते फोटोसाठी आग्रह करतात. नाही म्हटल तर लगेच नाराज होतात आणि अनेकदा कोण फोटो काढून जातात तेच समजत नाही. तरीही मी माझी सुरक्षा यंत्रणा व पोलिसांनाही गुन्हेगारी प्रवृतीचे लोक आमच्या आजूबाजूला फिरकणार नाहीत याची काळजी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

असं असलं तरीही एखादा फोटो येतो आणि आमची वाट लागते. असा फोटो आल्यास मला या बाबत काहीही माहिती नव्हतं असच मी सांगणार, अशी पुष्टी अजित पवार यांनी जोडली. मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री व शिवराजसिंग चौहान आम्ही सगळे एकत्र असताना एकाने फोटो काढला, आता त्याला आम्ही कस विचारायचं की तुझा व्यवसाय काय आहे? असं सगळं आक्रीतच आहे, त्यामुळे काळजी घ्यावी लागते, असं अजित पवार म्हणाले.

## अमोल कोल्हे हवेवर निवडून येणारे खासदार

### ठाकरेसेनेचे अंबादास दानवे यांची टीका

जनप्रवास । प्रतिनिधी





पुणे : ठाकरे गट झोपेतून जागा व्हायला तयार नाही तर काँग्रेसची मोडलेली पाठ सरळ होत नाही, असे वक्तव्य शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी भर सभेत केले होते. यावरून ठाकरे गटाने कोल्हेंना ते हवेवर निवडून येणारे खासदार असल्याचे म्हटले आहे. राज्याची सध्याची परिस्थिती पाहिली तर ठाकरे गट झोपेतून जागा व्हायला तयार नाही. त्यासोबत पराभवानंतर काँग्रेसची मोडलेली पाठ सरळ व्हायला तयार नाही. आपल्याकडे लढणारे शरद पवार आहेत, आता आपल्याला लढायला संधी आहे. सध्या विरोधी पक्षात मोठी जागा शिल्लक आहे. त्यामुळे बचेंगे तो और भी लढेंगे असं विधान त्यांनी पक्षातील आढावा बैठकीत कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांसमोर केले होते.

यावर विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी कोल्हे यांच्यावर टीका केली आहे. जाग यावी असे कोण म्हणाले मला माहित नाही. अमोल कोल्हे हवेवर निवडून येणारे खासदार आहेत. संघटनेत २०–३० वर्षे झिजावे लागते ते त्यांना माहित नाही. त्यांनी त्याचे मत व्यक्त केले आहे. एखादा पराभव आणि विजय एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आघाडीत बिघाडी कुठेही नाही. निवडणूक आली की विजय पराजय होतो, मविआ फुटत नाही, संजय राऊत यांनी स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर लढण्याचे संकेत दिले आहेत असे दानवे म्हणाले.

वेगवेगळ्या कामानिमित्त राज्याच्या मुख्यमंत्र्यांना भेटावे लागते. जनतेच्या प्रश्नांसाठी आदित्य ठाकरेंनी भेट घेतली यात काही वावगे नाही, असेही दानवे यांनी स्पष्ट केले. शिवसेनेत अनेकजण आले आणि गेले शिवसेना तळपत राहिली आहे. त्यामुळे कुणी आले, गेले यामुळे फरक पडत नाही. एकटे मुख्यमंत्री सांभाळू शकत नाहीत, त्यांना जनतेची साथ लागते अशी शरद पवार यांची भूमिका असेल तर ती सगळ्यांची भूमिका असेल, असेही दानवे यांनी स्पष्ट केले.

## नऱ्हे भागात ड्रेनेजमध्ये पडला दुचाकीस्वार

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : महापालिकेत समाविष्ट असलेल्या नऱ्हे गावातील रस्त्यावर वाहणाऱ्या ड्रेनेजची कामे सुरू आहेत. ड्रेनेज काम सुरू असल्याने रस्ते काही ठिकाणी बंद केले आहेत. या भागात शैक्षणिक संस्था आहेत, तसेच खासगी कंपन्या आहेत. विद्यार्थी वाहतूक करणारी वाहने या परिसरातून जातात. दरम्यान, ड्रेनेज काम सुरू असल्याने रस्ते काही ठिकाणी बंद केल्यानंतर दुचाकीस्वार मिळेल त्या रस्त्याने दुचाकी वरून रस्ता शोधत बाहेर पडत असतानाच दुचाकी गाडी उलटली आणि गाडीसह ड्रेनेज मध्ये पडला.

किरकोळ जखमी झालेल्या दुचाकीस्वाराला आणि गाडीला स्थानिक नागरिक यांच्या मदतीने बाहेर काढण्यात आले. दरम्यान या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे.

नऱ्हेतील ड्रेनेज लाईनसाठी विधानसभा निवडणुकीपूर्वीच दोन कोटी रुपये निधी मंजूर केला होता.मात्र त्यानंतर निवडणुका आल्यामुळे आचारसंहितेमुळे काम ठप्प होते. आता काम सुरू झाले आहे, मात्र वाहतूक कोंडी आणि रस्ते बंद असल्यामुळे नागरिक मिळेल त्या रस्त्याने बाहेर पडत आहेत.त्यातच हा अपघात झाला आहे.

## आगामी काळात पुणे इलेक्ट्रॉनिक क्लस्टर म्हणून नावारुपास येईल : केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव

जनप्रवास । प्रतिनिधी



पुणे : येत्या काळात पुणे इलेक्ट्रॉनिक क्लस्टर' म्हणून नावारूपास येणार असून उद्योजक, कंपन्या पुण्यात आकर्षित होऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या सेमीकंडक्टर मिशन' अंतर्गत रांजणगाव येथे प्रस्तावित इलेक्ट्रॉनिक उत्पादन संकुलाचे (मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर) काम येत्या दीड वर्षात पूर्ण होणार असल्याची माहिती केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी शनिवारी दिली

स्टोरियन एचके' आणि आयएफबी' या दोन मोठ्या कंपन्यांकडून या संकुलाची उभारणी सुरू असून येत्या काळात ५०० कोटी रुपयांचा निधी यासाठी देण्यात येईल. सेमीकंडक्टरशी निगडित विविध प्रश्न सोडवण्यासाठी मदत होईल. शिवाय देशातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन वाढेल. या परिसरातील उत्पादक कंपन्यांनाही या संकुलाचा फायदा होईल,' असे वैष्णव यांनी स्पष्ट केले

पुण्यातील सी–डॅक संस्थेला भेट दिल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी वैष्णव म्हणाले, भारत विकसित देश होण्यासाठी २०४७ पर्यंत होईल. त्या अनुषंगाने संगणकीय आणि तंत्रज्ञानाचा विकास हा मुख्य पाया असून सी–डॅक'ची त्यात अतिशय महत्त्वाची भूमिका आहे. आयआयटी मद्रास', बेंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्था (आयआयएस्सी), आयआयटी गांधीनगर' या शैक्षणिक संस्थांमध्ये सेमीकंडक्टर आणि संगणकीय क्षेत्रातील संशोधन कार्य मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. या सर्व संशोधन कार्याला एकाच छताखाली आणून पुढे मार्गक्रमण करण्यासाठी एकसंध आणि सुसंगत मार्ग कसा तयार करता येईल, यावर आढावा बैठकीत चर्चा करण्यात झाली आहे.

## विवाहाच्या आमिषाने महिलेवर अत्याचार; मुंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : विवाहविषयक नोंदणी संकेतस्थळावरुन झालेल्य ओळखीतून एका उच्चशिक्षित महिलेवर बलात्कार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. आरोपीने उच्चपदस्थ अधिकारी असल्याची बतावणी करुन महिलेची ३८ लाख रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी आरोपीविरुद्ध बलात्कार, तसेच फसवणूक केल्याप्रकरणी मुंढवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

याबाबत एका ३७ वर्षीय महिलेने मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात महिलेने विवाह नोंदणी संकेतस्थळावर नोंदणी केली होती. आरोपीने महिलेशी संपर्क साधून विवाह करण्यास इच्छुक असल्याचे सांगितले. त्यानंतर आरोपीने महिलेची भेट घेतली. उच्चपदस्थ शासकीय अधिकारी असल्याची बतावणी त्याने महिलेकडे केली. त्यानंतर महिलेला जाळ्यात ओढून त्याने तिच्यावर बलात्कार केला. जमीन खरेदीत गुंतवणूक करायची असल्याचे सांगून त्याने महिलेकडून ३८ लाख रुपये घेतले. महिलेने त्याच्याकडे विवाहाबाबत विचारणा केली तेव्हा त्याने टाळाटाळ करण्यास सुरुवात केली. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे धाव घेतली. सहायक पोलीस निरीक्षक कल्पना सुरवसे तपास करत आहेत.

## 'घरी कुणीतरी वाट बघतंय याचं भान ठेवा'

### रस्ते अपघातांवर नितीन गडकरींनी व्यक्त केली चिंता

जनप्रवास । प्रतिनिधी

नागपूर : रस्ते अपघातात अपघातग्रस्तांना 'गोल्डन अवर'मध्ये मदत करणे अत्यावश्यक आहे. आतापर्यंत मदत करणाऱ्यांना ५ हजार रुपये मिळायचे. आता ते वाढून २५ हजार रुपये करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी येथे दिली.

रस्ते सुरक्षा कार्यक्रमांत अभिनेते अनुपम खेर यांनी नितीन गडकरी यांची वनामती सभागृहात प्रकट मुलाखत घेतली. गडकरी यांनी अनुपम खेर यांच्या सर्व प्रश्नांना उत्तरे दिली.

केंद्रीयमंत्री नितीन गडकरी म्हणाले, वाहतुकीचे नियम तोडणाऱ्यांना दंड ठोठावला. कायदे कडक केले; तरीही रस्ते अपघातातील मृत्यू थांबलेले नाहीत. मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत आपण यावर नियंत्रण मिळवू शकत नाही. शालेय शिक्षण घेण्याच्या वयात मुलांवर चांगल्या गोष्टींचा प्रभाव पडला तर तो कायमस्वरुपी राहतो. त्यामुळे शालेय जीवनातच वाहतुकीच्या नियमांचे धडे मिळणे आवश्यक आहे. केंद्रीयमंत्री नितीन गडकरी एका प्रश्नाच्या उत्तरात म्हणाले, कोरोना, युद्धामध्ये किंवा एखाद्या दंग्यामध्ये जेवढ्या लोकांचा मृत्यू झाला नसेल तेवढे मृत्यू दरवर्षी रस्ते अपघातामध्ये होतात. याची मला खंत वाटते. त्यात १८ ते ३४ वयोगटातील तरुणांची संख्या जास्त आहे. एखाद्या घरातील तरुण अचानक निघून जातो, तेव्हा त्या कुटुंबावर



कोसळणाऱ्या संकटाची आपण कल्पनाही करू शकत नाही.

देशात आणखी उत्तम रस्ते तयार होतील. पण लोकांना शिस्त नसेल तर या रस्त्यांचा काहीही उपयोग नाही. सिग्नल तोडणे, लेन तोडून निघून जाणे, मर्यादेपेक्षा जास्त वेगाने गाडी चालणे, हेल्मेट न लावणे, सिटबेल्ट न बांधणे अशा कितीतरी चुका लोक करतात. घरी आई, पत्नी, मुले वाट बघत असतील, याचे भान ठेवून गाडी चालवावी, असे आवाहन नितीन गडकरींनी केले. रस्ते सुरक्षा संदर्भात समाजातील स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेऊन काम करावे. रस्ते सुरक्षा क्षेत्रात काम करणारे राजू मानकर आणि चंद्रशेखर मोहिते यांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

भारतात १० हजार विद्यार्थी हे शाळेच्या आजूबाजूची सदोष ट्रॅफिक व्यवस्था आणि चौकाच्या रचनेमुळे अपघाताला बळी पडतात. ३० हजार व्यक्ती विनाहेल्मेटमुळे दगावतात. नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार आणि रोडमार्क संस्थेने ४८ ब्लॅक स्पॉट दुरुस्त केल्यानंतर नागपूर ग्रामीणमध्ये राष्ट्रीय महामार्गावर अपघातांची संख्या ४८ टक्क्यांनी कमी झाली.

कार्यक्रमात अनुपम खेर यांनी शालेय विद्यार्थ्यांना काही प्रश्न विचारले. एका विद्यार्थ्याने हेल्मेट न घातलेल्यांना दंड ठोठावण्याऐवजी थेट कोठडीत टाकण्याचा सल्ला गडकरींना दिला. कार्यक्रमाला वाहतूक पोलीस उपायुक्त अर्चित चांडक, राज्य परिवहन कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी, रस्ते सुरक्षा संदर्भात काम करणाऱ्या विविध सामाजिक संघटना आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# अग्रलेख : इंडिया आघाडीत काँग्रेस एकाकी!

लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपाचा चौखूर उधळणारा वारू रोखण्यासाठी भाजपा विरोधकांनी एकत्र येत, गाजावाजा करत इंडिया आघाडीची स्थापना केली. अर्थात राजकीय स्वार्थासाठी ही मंडळी एकत्र आली होती. विचारांमध्ये एकवाक्यता, ध्येयधोरणे विभिन्न असतानाही केवळ भाजपाविरोध या धाग्यामध्ये एकत्र आली होती. यात प्रत्येकजण एकेकाळी आपापल्या राज्यात मातब्बर होता. पण सन २०१४ नंतर केंद्रामध्ये तसेच विविध राज्यांमध्ये भाजपाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मुसंडी मारल्यावर त्या त्या राज्यातील प्रस्थापितांना जनाधार गमवावा लागला. राज्यातील सत्ता गेली, विरोधी पक्षांमध्ये बसण्याची वेळ आली. पुढे सन २०१९ मध्ये झालेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्येही स्वतंत्र किंवा समविचारी पक्षांच्या माध्यमातून भाजपला रोखणे अशक्य झाले होते. काँग्रेसला तर विरोधी पक्षनेता मिळविण्याइतकेही संख्याबळ प्राप्त झाले नव्हते. परिणामी पूर्वीचा अनुभव पाहता सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही आपला टिकाव लागणे शक्य नसल्याने लोकसभा निवडणुकीसाठी ही सर्व मंडळी एकत्र आली व त्यातूनच इंडिया आघाडी देशाच्या राजकारणात जन्माला आली.

लोकसभा निवडणूक एकत्र लढणे व भाजपाला सत्ता मिळवू न देणे हा एककलमी कार्यक्रम राबविण्यासाठी इंडिया आघाडी कार्यरत झाली. मुळातच इंडिया आघाडीच्या वाटचालीला स्थापनेपूर्वीपासूनच ग्रहण लागले होते. ज्यांच्या संकल्पनेतून इंडिया आघाडी जन्माला आली, ते नितीशकुमारच लोकसभा निवडणुकीच्या अगोदरच काही महिने भाजपामध्ये सामील झाले. कर्णधारच मालिका सुरू होण्यापूर्वी प्रतिस्पर्धी संघाचा स्टार फलंदाज अथवा गोलंदाज बनावा, तशीच परिस्थिती नितीशकुमारांच्या भूमिकेमुळे इंडिया आघाडीची लोकसभा निवडणुकीअगोदर झाली. इंडिया आघाडीमध्ये भाजपाविरोधक एकत्र आले तरी पश्चिम बंगालची तृणमूल काँग्रेस, उत्तर प्रदेशात सपा, दिल्ली-पंजाबमधील आम आदमी पार्टी, बिहारमधील लालू प्रसाद यादव यांचे राष्ट्रीय जनता दल यांचे काँग्रेसशी फारसे सख्य नव्हते. इंडिया आघाडीत हे घटक काँग्रेससोबत असले तरी काँग्रेसशी ते चार हात अंतर राखूनच होते, हे लोकसभा निवडणुकीदरम्यानच पाहावयास मिळाले होते.

लोकसभा निवडणुकीतील जागावाटपामध्ये उत्तर प्रदेशमध्ये सपापुढे, पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसपुढे, उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षापुढे, बिहारमध्ये राष्ट्रीय जनता दलापुढे, पंजाब आणि दिल्लीमध्ये आप पक्षापुढे काँग्रेसला दुय्यम भूमिका स्वीकारावी लागली. लोकसभा निवडणुकीमध्ये इंडिया आघाडीला सत्ता मिळविता आली नसली तरी भाजपाला स्वबळावर सत्ता मिळणार नाही, इतपत यश इंडिया आघाडीला मिळाले होते. भाजपाला सत्ता मिळविण्यासाठी नितीशकुमारांचा संयुक्त जनता दल आणि चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगू देसमच्या आधाराची गरज घ्यावी लागली. सन २०१९ ला विरोधी पक्षनेतेपदही मिळविण्यात अपयशी ठरलेल्या काँग्रेसला लोकसभेत शतकी मजल मारता आली ही काय ती जमेची बाजू. शिवाय विरोधकांना सन्मानजनक संख्याबळ गाठता आले, हे इंडिया आघाडीचे यश होते. परंतु लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीचे तीनतेरा वाजण्यास सुरुवात झाली होती. त्या त्या राज्यांमध्ये मातब्बर इंडिया आघाडीच्या घटक पक्षांना विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसशी युती करण्यासाठी कोणतेही स्वारस्य नव्हते. किंबहुना त्यांना काँग्रेससोबत विधानसभा निवडणुका लढवायच्याच नव्हत्या. महाराष्ट्रातही इंडिया आघाडीतील काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी, उद्धव ठाकरेंची शिवसेना या तीन पक्षांची महाविकास आघाडी प्रभावी होती. लोकसभा निवडणुकीत या महाविकास आघाडीने भाजपा व मित्रपक्षांच्या महायुतीला महाराष्ट्रात रोखून धरले. परंतु लोकसभा निवडणुकीनंतर अवघ्या सहा महिन्यांनी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा दणदणीत पराभव झाला. महायुतीने २८८ पैकी २३८ हून अधिक जागांवर विजयी मुसंडी मारली. महाविकास आघाडीला अवघ्या ४९ विधानसभा मतदारसंघांमध्ये विजय मिळाला होता.

झारखंड व अन्य राज्यातही काँग्रेसच्या पदरी पराभवाची नामुष्की आली. काँग्रेसची अन्य राज्यातील पिछेहाट पाहिल्यावर इंडिया आघाडीच्या अन्य पक्षांनी काँग्रेसविरोधी सूर आळविण्यास सुरुवात केली. दिल्ली निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अरविंद केजरीवालांच्या आपने स्वबळावर निवडणूक लढविण्याची घोषणा करत काँग्रेसविरोधी बिगुल वाजविले. त्यापूर्वी काही दिवस अगोदरच इंडिया आघाडीचे नेतृत्व बदलण्याची भाषा करत काँग्रेसविरोधातील आपली भूमिका स्पष्ट केली होती. बिहारमध्ये लालूप्रसाद यादव यांचे पुत्र व बिहारचे माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव व पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही केजरीवाल यांच्या भूमिकेचे समर्थन करताना दिल्लीच्या निवडणुकांमध्ये केजरीवाल यांना जाहीर पाठिंबा व्यक्त केला. महाराष्ट्रातही शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्या देवेंद्र फडणवीसांशी झालेल्या गाठीभेटीमुळे भाजपा व त्यांच्यातील अंतर कमी होत असल्याचे चित्र निर्माण झाले. एकूणच इंडिया आघाडीचे खऱ्या अर्थाने तीनतेरा वाजण्यास आता मागील काही महिन्यांपासून सुरुवात झाली. इंडिया आघाडीतील अनेक पक्ष काँग्रेसविरोधी सूर आळवत इंडिया आघाडीतील काँग्रेसचे नेतृत्व अमान्य करू लागलेत. इंडिया आघाडीत काँग्रेस एकाकी पडू लागली. त्यामुळे येत्या काळात काँग्रेसविरहित इंडिया आघाडी अस्तित्वात राहिली तरी आश्चर्य वाटणार नाही.

## अंतरंग



# डबल इंजिन; तरीही शिवसेनेला का जमले नाही



गेल्या वर्षी लोकसभा निवडणुकीत भाजपची गाडी २४० वरच अडखळली आणि '२७२'चा जादूई आकडा गाठण्याकरिता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मित्र पक्षांवर अवलंबून राहावे लागले. यातून १६ खासदार असलेल्या चंद्राबाबू नायडू यांच्या तेलुगू देशम आणि १२ खासदार असलेल्या नितीशकुमार यांच्या जनता दलाला (संयुक्त) महत्त्व आले. या पाठिंब्याची पुरेपूर किंमत हे दोन्ही मुख्यमंत्री सध्या वसूल करीत आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर प्रथमच आंध्र प्रदेशचा दौरा करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुमारे दोन लाख कोटींच्या विविध विकासकामांचा शुभारंभ वा प्रकल्पांचे उद्घाटन केले. याशिवाय स्वतंत्र दक्षिण किनारपट्टी रेल्वे विभाग स्थापन करण्याची आंध्र प्रदेशची अनेक वर्षांची मागणी मान्य झाली. गेल्या महिन्यात मोदी यांनी लागोपाठ दोनदा केलेल्या बिहार दौऱ्यात २० हजार कोटींपेक्षा अधिक प्रकल्पांचे भूमिपूजन केले होते. लोकसभा निवडणुकीनंतर मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पात भाजप सरकारने बिहार आणि आंध्र प्रदेश या दोन्ही राज्यांवर विविध प्रकल्पांची खैरात केली होती. अर्थसंकल्पात बिहारसाठी ५९ हजार कोटी तर आंध्र प्रदेशसाठी १५ हजार कोटी अशा एकूण ७४ हजार कोटींच्या प्रकल्पांची तरतूद करण्यात आली होती. याशिवाय अमरावती हे आंध्र प्रदेशचे राजधानीचे शहर विकसित करण्याबरोबरच राज्यातील सिंचनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या पोला-वरम सिंचन प्रकल्पाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन अर्थसंकल्पात देण्यात आले होते. विशाखापट्टणममध्ये दक्षिण किनारपट्टी रेल्वे विभाग स्थापन करण्याची गेली अनेक वर्षांची मागणी होती. फेब्रुवारी २०१९ मध्ये स्वतंत्र रेल्वे विभाग स्थापन करण्याची घोषणा झाली होती. पाच वर्षांनी स्वतंत्र रेल्वे विभागाचे मुख्यालय उभारण्याच्या कामाला प्रारंभ झाला. विशाखापट्टणममध्ये स्वतंत्र रेल्वे विभाग स्थापन करण्यास ओदिशाचा विरोध होता. पण चंद्राबाबूंची मागणी मान्य झाली. गेल्या ११ वर्षांत विरोधी पक्षीयांची सत्ता असलेली राज्ये दूरच राहिली पण मित्र पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांनाही केंद्रातील भाजप सरकारकडून फार काही मदत झालेली नाही. पण आंध्र प्रदेश व बिहार या दोन राज्यांचा त्याला अपवाद. मोदी आता अपरिहार्यतेतून चंद्राबाबू नायडू यांचे कौतुक करीत असले तरी हेच चंद्राबाबू २०१९च्या निवडणुकीत मोदींवर टीका करीत होते. निवडणूक मतदान यंत्राच्या विरोधात चंद्राबाबूंनी तेव्हा आघाडी उघडली होती. नितीशकुमार हे राजकीय कोलांटउड्या मारण्यात एकदम माहीर. यातूनच नितीशकुमार हे 'पलटूराम' म्हणून ओळखले जातात. पण मोदी यांना आता या दोघांनाही खूश ठेवावे लागते. अटलबिहारी वाजपेयी सरकारच्या काळात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे समन्वयक असलेल्या चंद्राबाबू नायडू यांनी तेव्हाही एकत्रित आंध्र प्रदेशचा विशेष फायदा करून घेतला होता. तेव्हा एकत्रित आंध्र प्रदेशमध्ये २९ खासदार असलेल्या तेलुगू देशमने तांदूळ खरेदीपासून महत्त्वाचे प्रकल्प पदरात पाडून घेतले होते. सध्या १६ खासदारांची मदत आवश्यक असल्याने भाजपशासित राज्यांना मिळणार नाही एवढी भरीव मदत केंद्राकडून आंध्र प्रदेशला केली जाते. 'डबल इंजीन' सरकारचा फायदा होतो, असे नेहमी भाजपकडून अधोरेखित केले जाते. केंद्र व राज्यात एकाच पक्षाचे वा विचारांचे सरकार असल्यास राज्यांचा फायदा होत असल्यास ते चांगलेच. आंध्र प्रदेश, तमिळनाडू, तेलंगणा आदी दक्षिणेकडील राज्यांमधील प्रादेशिक पक्ष पाठिंब्याच्या बदल्यात केंद्राकडून जास्तीत जास्त फायदा करून घेण्यात आघाडीवर असल्याचे अनुभवास येते. दक्षिणेकडील प्रादेशिक पक्षांना जे जमले ते महाराष्ट्रात शिवसेनेला जमू शकले नाही हे दुर्दैव. वाजपेयी सरकारच्या काळात शिवसेना केंद्र व राज्यात सत्तेतील भागीदार होता. गेली अडीच वर्षे एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्रीपदी होते. पण आंध्र प्रदेशसारखे भाग्य महाराष्ट्राच्या वाट्याला कधीच आले नाही. शिंदे सरकारच्या काळात 'टाटा-एअरबस', 'वेदान्त-फॉक्सकॉन' हे महाराष्ट्रात गुंतवणूक होऊ घातलेले प्रकल्प गुजरातमध्ये गेले. राज्यातील नेते हातावर हात ठेवून बसले. महाराष्ट्राचे नेतृत्व दिल्लीच्या तख्तापुढे झुकते, हा इतिहास आहे! बिहारमध्ये या वर्षाच्या अखेरीस विधानसभा निवडणूक असल्याने बिहारलाही केंद्राकडून पुन्हा झुकते माप मिळू शकते. चंद्राबाबू नायडू संधी सोडत नाहीत. आपल्या राज्याचा फायदा कसा होईल हा चंद्रबाबू किंवा तमिळनाडूचे स्टॅलिन यांचा प्रयत्न असतो. एकनाथ शिंदे, अजित पवारही नेहमी मोदी-शहा यांना भेटतात. पण या भेटीतून महाराष्ट्राला काही विशेष लाभ झाला असे कधीच होत नाही. आंध्र वा बिहारप्रमाणेच राज्यातही 'डबल इंजिन'चे सरकार असले तरी या बिहार वा आंध्रला जे जमते ते महाराष्ट्राला कधी जमले नाही.

**- किशोर सातपुते**

# ठाकरे गटाच्या स्वबळाच्या भूमिकेमागे कारणं काय?

## राजकारण



राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीतील लाजिरवाण्या पराभवानंतर महाविकास आघाडीचा आपल्याला फायदा काय? असा प्रश्न शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) कार्यकर्ते विचारत आहेत. यानंतर कार्यकर्त्यांच्या वाढत्या दबावाखाली, शिवसेनेने (यूबीटी) शनिवारी सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका स्वबळावर लढवण्याचे जाहीर केले आहे. यामध्ये शिवसेनेसाठी (उद्धव ठाकरे) प्रतिष्ठित बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीचाही समावेश आहे.

मुंबईपासून नागपूरपर्यंतच्या महानगरपालिका निवडणुका आम्ही स्वबळावर लढू. एकदाच काय व्हायचे ते होऊद्या, आम्हाला स्व:ताला आजमावयचे आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आम्हाला यासाठी परवानगी दिली आहे, असे विधान राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांनी शनिवारी नागपुरात केले होते. राऊत यांच्या या विधानानंतर महाविकास आघाडीसह महायुतीतूनही प्रतिक्रिया येत आहेत.

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या अवघ्या ४६ जागा निवडून आल्या. यामध्ये शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे) २०, काँग्रेसच्या १६ आणि राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या १० जागांचा समावेश आहे. विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर, पक्षाच्या नेत्यांनी उद्धव ठाकरे यांना महाविकास आघाडीशी संबंध तोडण्याचा आणि स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा विचार करावा, असे सांगितले होते.दरम्यान १९७० पासून मुंबई महापालिकेवर शिवसेनेची सत्ता आहे. या महत्त्वाच्या निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षापासून वेगळे झाल्यास भाजपा आणि शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला रोखण्यास मदत होईल असे, या आमदार आणि नेत्यांना वाटते. नागपुरात संजय राऊत यांनी स्वबळाचा नारा दिला असला तरी, ते महाविकास आघाडीपासून वेगळ होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. ते म्हणाले, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये आमच्या कार्यकर्त्यांना निवडणूक लढवण्याची संधी मिळाली नाही. त्यामुळे पक्षाच्या वाढ खुंटली. आमचा पक्ष भक्कम करण्यासाठी आम्ही आता महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि परिषदांच्या निवडणुका स्वतंत्रपणे लढवण्याचा निर्णय घेतला आहे. जोपर्यंत आम्ही स्वतंत्रपणे निवडणूक लढवत नाही तोपर्यंत आम्हाला आमची ताकद पूर्णपणे समजणार नाही. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत आघाडीची गरज होती. त्यामुळे आमच्या कार्यकर्त्यांना निवडणूक लढवता आली नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्यांना ती संधी देण्याची संधी आहे. विधानसभा निवडणुकीनंतर, आमच्या अनेक नेत्यांनी असे मत व्यक्त केले की, जर आपण स्वतंत्रपणे लढलो असतो तर आपल्याला २० पेक्षा जास्त जागा मिळाल्या असत्या, असे दक्षिण मुंबईचे शिवसेना (उद्धव ठाकरे) खासदार अरविंद सावंत म्हणाले.

दरम्यान शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे) या घोषणेनंतर राज्य काँग्रेसने सावध प्रतिक्रिया दिली आहे. आमच्या कार्यकर्त्यांचीही स्वतंत्रपणे लढण्याची भावना असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. सर्वप्रथम, संजय राऊत हे पक्षाध्यक्ष नाहीत. उद्धव ठाकरे यांनी ही घोषणा केली असती तर आम्ही प्रतिसाद दिला असता. आमचे असे मत आहे की अशी विधाने सार्वजनिकरीत्या केली जाऊ नयेत आणि त्याऐवजी वरिष्ठ नेत्यांमध्ये प्रथम चर्चा केली पाहिजे, असे मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष आणि लोकसभा खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या. दरम्यान, महाविकास आघाडीत आणखी एक घटकपक्ष असलेल्या राष्ट्रवादीने (शरद पवार) म्हटले आहे की, त्यांचे राज्य नेतृत्व स्थानिक संस्थांच्या निवडणुकांबाबतच्या निर्णयांमध्ये हस्तक्षेप करत नाही, याचा निर्णय त्यांच्या जिल्हा समित्या घेतील. आम्ही स्थानिक पातळीवर काय सुरू आहे याचे माहिती घेऊन, स्थानिक नेत्यांना निर्णय घेण्याचा अधिकार देतो, असे राष्ट्रवादीचे प्रवक्ते महेश तपासे म्हणाले. यावेळी त्यांनी असेही निर्दर्शनास आणून दिले की यूपीए-१ आणि यूपीए-२ या दोन्ही काळात काँग्रेस आणि राष्ट्रवादीने महाराष्ट्राच्या विविध भागात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वतंत्रपणे लढवल्या होत्या.

## पंचांग

सोमवार विक्रम संवत्- २०८१
पौषशके संवत्- १९४६ संवत्सर - क्रोधीनाम
अयन- उत्तरायण मास- पौष
ऋतु- सौर शिशिर शुक्ल पक्ष
तिथि:पूर्णिमा २७:५६:४२+ नक्षत्र:आर्द्रा १०:३७:५०
योग : वैधृति २८:३८:३९+ करण:विष्टि १६:२६:२८ करण:बव २७:५६:४२+ सूर्य : धनु चन्द्र:मिथुन हिजरी सन् - १४४६ मुस्लिम मास - रज्जब तारीख - १२ विशेष-शाकंभारी पौर्णिमा माघस्नानारंभ शाकंभरीदेवी नवरात्र समाप्ती भोगी राजमाता जिजाऊसाहेब भोसले जयंती (तिथीप्रमाणे) धनुमास समाप्ती पौर्णिमा प्रारंभ पहाटे ५.०२ पौर्णिमा समाप्ती

## राशी भविष्य...

**मेष** - शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पश्चिम. व्यावसायिक योजना गुप्त ठेवा. देण्या घेण्याच्या व्यवहारात सावधपणा ठेवा. मुलांच्या बाबतीत काळजी वाटेल. देवाधर्मावरील विश्वास वाढेल.

**वृषभ** - शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर. मुलांच्या प्रगतीमुळे मन प्रसन्न राहील. आर्थिक आवक चांगली राहील. वाचनाची गोडी वाढेल. राहण्यासाठी घराची चिंता दूर होईल.

**मिथून** - शुभ रंग काळा, शुभ दिशा:पश्चिम. रचनात्मक कामात यश मिळेल. आर्थिक योग उत्तम आहे. कुटुंबातील व्यतिंच्ये सहकार्य घ्या. प्रभावी वातावरणाचा उपयोग होईल. उत्साहीपणा दाखवू नका.

**कर्क** - शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा : पश्चिम. बौद्धीक अडचणी दूर होतील. प्रगतीचे मार्ग मोकळे होतील. फायदेशीर प्रवास होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील वयस्कर व्यक्तींच्या प्रकृतीची काळजी घ्या.

**सिंह** - शुभ रंग: लाल, शुभ दिशा : पूर्व. कामकाजामध्ये वाढ होईल अनकूल स्थिती राहणार आहे. वेळेचा चांगला उपयोग करून आपल्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने कामकाजाला सुरुवात करा.

**कन्या** - शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा:पूर्व. भांडण, वादविवादामुळे मानसिक ताण वाढेल. आर्थिक स्थिती मध्यम राहील. पारिवारीक सहकार्याने कामात यश मिळेल.

**तूळ** - शुभ रंग : केसरी, शुभ दिशा: उत्तर. व्यवसायामध्ये अनकूल अशी सफलता मिळेल. येणाऱ्या खर्चामुळे चिंतेत रहाल. खर्चामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील.

**वृश्चिक** - शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण. नातेवाईकांशी असलेल्या संबंधात मर्यादा राखा. व्यापारात नवीन संधी मिळतील. आर्थिक उत्पन्नात वाढ होईल. कौटुंबिक समस्या दूर होईल.

**धनू** - शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण. कौटुंबिक समस्यामध्ये लक्ष राहणार नाही. अनिश्चितेमुळे वैचारिक धाडसामध्ये कमतरता राहील. व्यापारात कोणावरही विश्वास दाखवू नका. कर्ज घेण्याची वेळ येऊ शकते.

**मकर** - शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पश्चिम. आपले प्रयत्न आज सफल होतील. व्यापारात योग्यवेळी घेतलेला निर्णय फायदेशीर राहील. शिक्षणात यश मिळेल. वेळेचा दुरूपयोग करू नका.

**कुंभ** - शुभ रंग: काळा: शुभ दिशा:पश्चिम. वाद विवाद संपुष्टात येतील. नोकरी करणाऱ्यांना मनासारखी बढती, बदली होण्याची शक्यता आहे. सामाजिक कार्य करीत असल्यामुळे मान सन्मान मिळेल.

**मीन** - शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर
कौटुंबिक समस्या आणि स्थावर मालमत्ता या संबंधीतील समस्या दूर होतील. समाजात प्रतिष्ठा मिळाल्याने आनंदी रहाल.

## पारावरचा फड



महाराष्ट्रात बहुमतात आलेल्या महायुती सरकारमधील मंत्री अन् आमदार अजूनही निवडणूक प्रचार आणि त्यानुसार स्टंटबाज वक्तव्याच्या माहोलमधून बाहेर आलेले नाहीत. वास्तविक निवडणूक झाल्यानंतर सत्ताधारी आणि विरोधकांनी विकासात्मक आणि सर्वसमावेशक काम करायला हवे. पण दुर्दैवाने राजकारणातील बदल जणू द्वेष, मतभेदाची दरी वाढविणारे ठरत आहे. विशेषत: मूळ भाजप सोडाच, भाजपमध्ये आलेले बहिस्थ काँग्रेस, राष्ट्रवादीचे पूर्वाश्रमीचे नेते निष्ठा दाखविण्यासाठी वाचाळवाणी पाजळत आहेत. नव्या दमाचे सोडाच, जुन्या जाणत्या नेत्यांच्या बुद्धीलाही ग ची बाधा झाल्याचे दिसून येते. यात नवे हिंदुत्वाचे प्रणेते मंत्री नितेश राणे यांच्यासह अनेक नेते आघाडीवर आहेत. त्यांनी सांगलीत हिंदू-मुस्लिम द्वेषाची भाषा केलीच. त्यात भरीस भर म्हणून मिरजेचे चारवेळा नेतृत्व करणाऱ्या आ. सुरेशभाऊ यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याने तर मिरजेला मिनी पाकिस्तानच जाहीर केले. यातून नवा वाद उफाळला आहे. याबाबत पारावरची चर्चा...!

**पांडूनाना :** इलेक्शान आन् जाती-धरम, बुद्धीभेदाचं ईक पेरनं हे समिकरन हाय. पन आता त्या समद्यानंतर बी कशापाई ही मंडळी हे करत्यात?

**बाबूराव :** बराबर हाय तुजं. तुला त्या सांगलीत झालेल्या वाचाळवीर कुटुंबाचं युवराज नितेश रानेसायबाचंच म्हनायचंय का?

**पांडूनाना :** व्हय, आन् त्यावर आपलं माजी पालकमंतरी. आरं ज्या सुरेशभाऊस्नी भाईरचं आसून बी सलग चारयेळा मिरजेचं आमदार केलं त्यानास्नी आता मिरज मिनी पाकिस्तान वाटाय लागलंया व्हय?

**पांडूनाना :** आरं हे राने नवं हिंदुतवाचं पुरसकरतं झाल्याती? आपन याआगुदर चड्डीवालं आन् त्या शिवप्रतिष्ठानच्या भिडे गुरुजीस्नी काय बोललो ते ईसरलं. आन् त्यांचं उदोउदो करनारं बी ईसरलं.

**बाबूराव :** खराय तुजं. आता राजकारनात समद्यास्नी उन्मत्तपना आलाया. बग न्हवं. आरं खाडेसायब चांगलं ५०-६० हजार मतानं निवडून आलं. त्यात समद्यांनीच मतं दिली न्हवं. आन् हे पाकिस्तान म्हननं म्हजी मिरजकर समद्यांचाच आपमान हाय.

**पांडूनाना :** आरं आशानं पुन्यांदा दंगलीचं वातावरन तापवायचा धंदा कशापायी करत्यात ही लोकं.


**बाबूराव :** गुन्या-गोविंदानं नांदनारं मिरज आन् मिरजकर ह्याकडं लक्श देनार न्हायती.

**पांडूनाना :** खराय तुजं. ह्या आदुगर पोळल्याती दंगलीतनं. आनेक लोकांवर त्या आजून बी केशीस हायती. त्यात ह्या नेत्यांच काय जातंया. त्यांची आयुष्य बरबाद झाल्याती.

**बाबूराव :** व्हय. पन राजकारन कुटल्या थराला चाललंया काय खरं न्हाय.

**- अमृत चौगुले**


## उपदेश कथा



### उज्ज्वल भवितव्यासाठी

एका उद्योगपतीने आपल्या कारखान्यात उच्च तंत्रज्ञान घेऊन आलेल्या एका इंजिनीयरची नेमणूक केली. त्याने आल्यावर महिन्याभरातच साऱ्या मशिन्स ठाकठीक केल्या. मशिन्सची काळजी कशी घ्यायची याचेही प्रशिक्षण त्याने कामगारांना दिले. दोन - तीन महिने झाले. त्याला काही कामच नव्हते. तो मालकाला भेटला. म्हणाला, सर ! मला तुम्ही मला फुकट पगार का देता ? सर्व मशिन्स व्यवस्थित सुरु आहेत. आता मी नसलो, तरी कारखाना ठिक चालेल. मालक म्हणाले, ते सर्व ठिक आहे. आज कारखान्यातली यंत्रं व्यवस्थित आहेत पण उद्या यातले एखादे जरी मशिन बिघडले, तरी माझे लाखो रुपयांचं नुकसान होईल. त्यावेळी मी तुला कुठे शोधू ? म्हणूनच उद्या बिघडणाऱ्या मशिन्सच्या दुरुस्तीसाठी मी तुझी आजच व्यवस्था करुन ठेवली आहे. मी काय मूर्ख आहे, तुला पैसा फुकट द्यायला !

## दिनविशेष...



१५५९ - एलिझाबेथ पहिली इंग्लंडच्या राणीपदी. १६१० - गॅलिलियोने गुरूचा चौथा उपग्रह, कॅलिस्टोचा शोध लावला. १८४७ - काहुएन्गाचा तहाने कॅलिफोर्नियातील मेक्सिकन अमेरिकन युद्ध संपले. १८९३ - हवाईची राणी लिलिउओकालानीला संगीनी राज्यघटना अवैध ठरवण्यापासून अडविण्यासाठी अमेरिकन सैनिक होनोलुलुत उतरले.

१९१५ - इटलीतील अवेझानो येथे भूकंप. २९,८०० ठार. १९३० - मिकी माउसची चित्रकथा प्रथम प्रकाशित. १९४२ - अमेरिकेने जपानी वंशाच्या अमेरिकन नागरिकांना बंदिवासात पाठविण्यास सुरूवात केली. १९५३ - मार्शल जोसिप ब्रोझ टिटो युगोस्लाव्हियाच्या अध्यक्षपदी. १९८२ - वॉशिंग्टन डी.सी.च्या विमानतळावरून निघाल्यावर एर फ्लोरिडा फ्लाईट ९० हे बोईंग ७३७ जातीचे विमान कोसळले. रस्त्यावरील ४ सह ७८ ठार. १९९१ - लिथुएनियाची राजधानी व्हिल्नियस येथील स्वातंत्र्यसैनिकांवर रशियन सैनिकांनी हल्ला केला. २००१ - एल साल्वाडोरमध्ये भूकंप. ८००हून अधिक ठार.

२००७- थंडीमुळे कॅलिफोर्नियात आणीबाणी. २००७- चीनमध्ये कोळसा खाणीतील स्फोटात १३ ठार. २००८ - पश्चिमी अफगानिस्तामध्ये बर्फवृष्टी व थंडीमुळे ५२ लोकांचा मृत्यू झाला. २००८ - दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर तयार केलेला रोमँटिक चित्रपट 'अटोनमेंट' ला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा 'गोल्डन ग्लोब' पुरस्कार देण्यात आला.

## मंदिरांची सुरक्षा रामभरोसे...

भारतात धार्मिक महत्वाची मानली जात असल्याने देशात मंदिरांचे अनन्यसाधारण महत्व आहे. मात्र या मंदिरांची सुरक्षा आता मात्र रामभरोसे असल्याचे दिसून येत आहे. नुकतेच तिरुपती बालाजी मंदिरात प्रशासनाचे योग्य नियोजन नसल्यामुळे दर्शन घेत असताना भक्तांची चेंगराचेंगरी झाली तर दुसरीकडे दक्षिण काशी अशी ओळख असलेल्या पंढरपुरात देखील मंदिरात श्वानांचा मुक्तसंचार असल्याचे वृत्त एका वृत्तवाहिनीने नुकतेच प्रदर्शित केले आहे. त्यामुळे धार्मिक बाब ही इतकी संवेदनशील असताना इथे मात्र त्याच्या सुरक्षेविषयी इतका डोळेझाकपणा योग्य नव्हे. तर दुसरीकडे मंदिरातून मिळणाऱ्या प्रसादातून सुद्धा मागील काही महिन्यांपूर्वी गजहब माजला होता. राज्यात सतत दर्शनावेळी चेंगराचेंगरी होऊन भाविकांचे प्राण जात असल्याच्या घटना घडताना दिसत आहे. यामध्ये मंदिराचे प्रशासन कोठेतरी नियोजनात किंवा सुरक्षिततेत कमी पडताना दिसते आहे. तर काही ठिकाणी मंदिरातील मूर्ती किंवा अन्य पूजेचे साहित्य चोरीस जाण्याच्या घटनाही घडताना दिसत आहेत. त्यामुळे मंदिराचे पावित्र्य अबाधित ठेवायचे असेल तर आता राज्य सरकारने आश्वासक पावले उचलणे गरजेचे आहे. कारण ही बाब न परवडणारी अशी आहे. मंदिर प्रशासनावर ही जबाबदारी देऊन त्यांना ही प्रसंगी सुनावावयास हवे.

**अमोल भोसले, कोल्हापूर**

## जन की बात...



# निसर्गाची वक्रदृष्टी; जळतेय सृष्टी..



अमेरिकेत लॉस एजिल्स येथे पेटलेला वणवा तर युरोपमध्ये हिम वितळून आलेला पूर हे मानवानी केलेल्या चुकांचे जीवंत उदाहरणे आहेत. ग्लोबल वार्मिंगच्या नावाखाली सर्व काही खपवून आता चालणार नाही. कारण ज्यावेळी आशियात थंडीने लोक कुडकुडत होतो तर तिथे दुसरीकडे युरोपमध्ये महापुराने थैमान घातले होते. या अशा घडणार्या अतिरेकी घटनांमुळे सृष्टीचा समतोल बिघडत असल्याचे सामोरे येत आहे. तर दुसरीकडे लोक यातून काही धडा घेण्यास तयार नाहीत तर त्यांच्या चुकांचा मालिका ही सुरूच आहे. त्यामुळे अशा घडणार्या घटनांसाठी आतातरी जागे होणे गरजेचे आहे.

भारतात देखील महामार्ग, पूल किंवा विकास या गोंडस नावाखाली सरसकट वृक्षतोड करून जंगले उजाड बनविली जात आहेत. परिणामी वन्यप्राण्यांचा मानवी वस्तीत वावर वाढला आहे. तर दुसरीकडे पावसाचे प्रमाण ही कमी अधिक होताना दिसते आहे. साधारणपणे जूनमध्ये सुरू होणारा पाऊस आता उशिरा सुरू होऊन तो उशिराने परतताना दिसतो आहे. नुसताच तो परतताना दिसत नाही तर जाताना तो हाहाकार माजवत आहे. परतीच्या पावसाने महाराष्ट्रात नुकतेच थैमान घातले त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना याचा फटका बसला. तर दुसरीकडे आता नद्या जोड प्रकरण, मेट्रोसाठी आरेचे जंगल तोडणे असे नवनवीन प्रकल्प तर शक्तिपीठसारखा हमरस्ता बनविण्याचे सुद्धा प्रस्तावित आहे. विकासाच्या नावाखाली जर निसर्गाचा ऱ्हास केला तर मग लॉस एजिल्स काय किंवा भारत काय यांना याचा फटका बसल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे निसर्गाची हाणी राखून संभाव्य नुकसान टाळावे.

**प्रमोद अग्निहोत्री, पुणे**

## नैतिकता आणि नेत्यांचे राजीनामे...

मस्साजोग प्रकरणामुळे संबंधित जिल्ह्याच्या मंत्र्याने राजीनामा द्यावा, यासाठी बंद तसेच आंदोलनाचे पेव फुटले आहे. सततचे होणारे बंद हे सर्वसामान्यांना परवडणारे नाहीत. मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात असे बंद होताना दिसत आहेत. त्यामुळे संबंधित नेत्याने नैतिकता बाळगून योग्य तो निर्णय घ्यावा किंवा संबंधित मंत्र्याच्या वरिष्ठ नेत्यांनी आंदोलनकर्त्यांना योग्य स्थिती समजावली पाहिजे. तसे पाहता यापूर्वी अशी काही प्रकरणे झाल्यानंतर त्या त्या पक्षाच्या मंत्र्यांनी राजीनामे दिले होते. त्यानंतर आरोपातून मुक्त झाल्यानंतर पूर्ववत पदभार स्वीकारला होता. कोणीचे भ्रष्टाचाराचे प्रकरण होते, कुणाचे गुणवाढ प्रकरण होते तर काहीचे सैनिकांसाठी बांधलेल्या सदनिकांचे होते. कोणाचा सिमेंट घोटाळा होता मात्र त्या त्यावेळी त्या संबंधित नेत्यांनी तपासास विघ्न किंवा दबाव येऊ नये याकरिता जबाबदारी स्वीकारत आपल्या मंत्री पदाचा राजीनामा दिला होता. तशीच काहीशी परिस्थीत आता बीड प्रकरणात असल्यामुळे त्या संबंधित नेत्याने राजीनामा द्यावा, असे विरोधकांचे म्हणणे आहे. त्यामुळे या युवा नेत्याने आता सारासार विचार करून योग्य निर्णय घ्यावा, असे राज्यातील तमाम जनतेस वाटते. त्यामुळे असे संप, बंद, आंदोलने तरी बंद होतील.

**ओंकार देशपांडे, सांगली**

# मंचर येथील बाणखेलेमळा येथे बिबट्याचा वावर

## परिसरात भीतीचे वातावरण ; पिंजरा लावण्याची मागणी

निरगुडसर
जनप्रवास । प्रतिनिधी

मंचर ता. आंबेगाव येथील बाणखेले मळा येथे महात्मा गांधी विद्यालय कडे जाणाऱ्या रस्त्यावर ओढ्याच्या बाजूला असलेल्या परिसरात बिबट्याचा वावर असून रात्रीच्या वेळी बिबट्या फिरताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. वनविभागाने या ठिकाणी पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

मंचर बाणखेलेमळा येथे बिबट्याचा वावर असून दिनांक १० रोजी रात्री माजी ग्रामपंचायत सदस्य संगीता बाणखेले यांना घरासमोरच बिबट्याचे दर्शन झाले आहे. यापूर्वीही या परिसरात अनेक शेतकऱ्यांना, नागरिकांना बिबट्याने दर्शन झाले आहे या परिसरात उसाची, कांदे लागवड शेती मोठी असल्याने रात्रीच्या वेळी अनेक शेतकरी शेतात पाणी भरण्यासाठी येत असतात त्यामुळे बिबट्या कडून शेतकऱ्यांना इजा होण्याची शक्यता आहे. याबाबत त्यांनी यापूर्वी वन विभागाला या ठिकाणी पिंजरा लावण्याची मागणी केली आहे मात्र अद्याप वन विभागाने दखल घेतली नसल्याचे बाणखीले यांनी सांगितले.

### ओढ्याजवळील झाडेझुडपे काढण्याची मागणी

बाणखेलेमळा येथे असलेल्या ओढ्याला मुबलक पाणी असल्याने तसेच ओढ्याच्या बाजूला मोठ्या प्रमाणात झाडे झुडपे वाढल्याने या ठिकाणी बिबट्या पाणी पिण्यासाठी येतं असतो. तसेच झाडाझुडपांमुळे लपन क्षेत्र वाढल्याने बिबट्या चा वावर वाढला आहे. याबाबत संगीता बाणखेडे यांनी मंचर नगरपंचायत चे मुख्याधिकारी गोविंद जाधव यांना या ठिकाणी वाढलेली झाडेझुडपे काढून साफसफाई करावी या संदर्भात सांगितले होते मात्र नगरपंचायत प्रशासनाकडून देखील कुठलीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माजी ग्रामपंचायत सदस्य संगीता बाणखेले यांनी सांगितले.

# लोकशाही आणि विचारांची लढाई आता उरली नाही: पृथ्वीराज चव्हाण




पुणे
जनप्रवास । प्रतिनिधी

निवडणूक आयोग हा स्वायत्त राहिला नसून सरकारी विभाग बनला आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत प्रचंड पैशाचा वापर झाला. पैशातून सत्ता, सत्तेतून पैसा हे पैशाचे वर्तुळ तोडणे अवघड झाले आहे.आता ही विचारांची लढाई राहिली आहे का,हा प्रश्न आहे.पक्षांतरबंदी कायदा धाब्यावर बसवला गेला,सर्वोच्च न्यायालयाकडून निराशा झाली. लोकशाहीची हत्या करण्यास सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी मदत केली.हे पाहता लोकशाही उरलेली नाही,हे स्पष्ट होते', असे परखड प्रतिपादन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी रविवारी पुण्यात केले.

महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या वतीने रविवार, दि. १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी साडेनऊ ते सायंकाळी साडेपाच या वेळेत 'गांधी दर्शन' शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कोथरूड येथील गांधी भवनच्या सभागृहात हे शिबीर झाले. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण( सद्य राजकीय स्थिती),मानवाधिकार कार्यकर्ते आनंद तेलतुंबडे(गांधी,आंबेडकर आणि संविधान),आणि प्रा. नितीश नवसागरे(वन नेशन,वन इलेक्शन) यांनी मार्गदर्शन केले.' गांधी दर्शन' विषयावरचे हे १७ वे शिबीर होते.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले,' विधानसभा निवडणुकाचा निकाल धक्कादायक होता. काँग्रेससह अनेकांचा निवडणूक प्रक्रियेवर विश्वास उरला नाही. निवडणूक आयोग नि:पक्ष असला पाहिजे. तरच लोकशाहीला अर्थ राहिल. निवडणूक आयोगाच्या अध्यक्षाची नियुक्ती प्रक्रिया वादग्रस्त ठरली आहे. निवडणूक आयोग हा स्वायत्त राहिला नसून सरकारी विभाग बनला आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत प्रचंड पैशाचा वापर झाला.हे पाहता लोकशाही उरलेली नाही,हे स्पष्ट होते. पैशातून सत्ता, सत्तेतून पैसा हे पैशाचे वर्तुळ तोडणे अवघड झाले आहे.आता ही विचारांची लढाई राहिली आहे का,हा प्रश्न आहे.पक्षांतरबंदी कायदा धाब्यावर बसवले गेला,सर्वोच्च न्यायालयाकडून निराशा केली. लोकशाहीची हत्या करण्यास सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी मदत केली.

ते म्हणाले,'पक्षांतरबंदी कायदा टाकून पक्षांतर केल्यास पक्षाचे सदस्यत्व तात्काळ रद्द होईल असा स्पष्ट कायदा केला पाहिजे. निवडणूक खर्च, निवडणूक आयोग, निवडणुक आचारसंहिता यावर गंभीर पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे'.'घटनाकारांना अभिप्रेत लोकशाही उरली नाही,हे मान्य केले पाहिजे. संसदेत चर्चा करून बदल होत नाहीत.आता विरोधी पक्षच शिल्लक ठेवायचे नाहीत,अशी पावले आता सत्ताधारी पक्ष उचलत आहे.राजकीय पक्षांना विरोधी पक्ष म्हणून काम करता येणे अवघड होणार आहे, महाविकास आघाडीत कुरबूर आहे. त्यातून विरोधी पक्ष संक्रमणावस्थेतून जात आहे, अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे',असे पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले,'राजकीय पक्ष दुबळे झाले आहेत. प्रायव्हेट लिमिटेड कंपन्या बनल्या आहेत. पक्षांतर्गत लोकशाही उरलेली नाही.सर्वच पक्षात अशी अवस्था आहे. लोकशाहीचा आत्मा संपण्याच्या अवस्थेत आपण पोचलो आहोत'.

'दुसरीकडे विकसित भारताचे दावे हास्यास्पद बनले आहे.आताच्या विकासदराने ते होणे शक्य नाही. शिक्षण, आरोग्यावर खर्च न केल्याने मनुष्यबळ विकास शक्य नाही.बेरोजगारी हा भयंकर प्रश्न बनला आहे.

# गावडे विद्यालयातील शासकीय चित्रकला ग्रेड परिक्षेचा निकाल शंभर टक्के




टाकळी हाजी
जनप्रवास । प्रतिनिधी

येथील मा.बापूसाहेब गावडे माध्यमिक विद्यालयाचा शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेचा इंटरमिजिएटचा शैक्षणिक वर्ष २०२४ चा निकाल शंभर टक्के लागला असून या परीक्षेत एकूण २५ विद्यार्थी बसलेले होते, विद्यालयाचा शेकडा निकाल १०० टक्के लागला आहे.

ए श्रेणीत तीन, बी श्रेणीत दहा तर सी श्रेणीत बारा विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे, ए श्रेणीत अनुक्रमे सृष्टी भोरडे, वैष्णवी मेचे,वैष्णवी खिलारी तर बी श्रेणी अनुक्रमे सुप्रिया पोकळे,वैष्णवी भाकरे,शुभम बारहाते,सिद्धांत रावडे,गायत्री जाधव,पल्लवी भुजबळ,राजश्री करकंडे,सायली चौधरी,शिवम कोल्हे,श्रावणी भाकरे तर सी श्रेणीत अनुक्रमे अमृता साळवे,अविष्कार भोरडे,ज्ञानेश्वरी उचाळे,गणेश भाकरे, ईश्वरी गाढवे, कुणाल खिलारी,मयुरी कांदळकर,निरंजन उचाळे,ओम पवार, प्रतिक कांदळकर,श्रद्धा करकंडे,स्वप्निल येवले इत्यादी विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

विद्यार्थ्यांना आदर्श शिक्षक राहुल गावडे यांनी मार्गदर्शन केले अशी माहिती विद्यालयाचे प्राचार्य आर.बी.गावडे यांनी दिली,विद्यालयाच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले.त्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार पोपटराव गावडे,सचिव राजेंद्र गावडे, सहसचिव सुनिता गावडे,व्यवस्थापकीय संचालक अजित गावडे,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धोंडीभाऊ जाधव,माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष आदर्श शिक्षक संभाजी साबळे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# वडिलांच्या स्मरणार्थ श्रीहनुमान मंदिरासाठी २० किलोची पितळी घंटा भेट



निरगुडसर
जनप्रवास । प्रतिनीधी

निरगुडसर ता. आंबेगाव गावचे विद्यमान सरपंच रवींद्र वळसे पाटील, उद्योजक संदीप वळसे पाटील यांनी एकत्रितरित्या त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ निरगुडसर गावातील श्री हनुमान मंदिरासाठी २० किलो वजनाची पितळी घंटा भेट दिली आहे.

सरपंच रवींद्र वळसे पाटील यांचे वडील, व प्रितेश चंद्रकांत वळसे पाटील यांचे आजोबा विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक कै.जनार्दन शेठ नामदेव वळसे पाटील यांचे स्मरणार्थ व संदीप पांडुरंग वळसे पाटील, धनंजय पांडुरंग वळसे पाटील यांनी वडील कै. पांडुरंग नामदेव वळसे पाटील यांच्या स्मरणार्थ सदर पितळी घंटा भेट दिली असून या पितळी घंटेची विधीवत पूजा करून श्री हनुमान मंदिर या ठिकाणी ती बसवण्यात आली आहे. घंटेच्या माध्यमातून आपल्या वडिलांच्या आठवणी स्मृतीत राहावे यासाठी मंदिरासाठी घंटा भेट दिली असल्याचे सरपंच रवींद्र वळसे पाटील यांनी सांगितले.

# महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात लेखक विद्यार्थी संवाद व लेखन कौशल्य कार्यशाळा यशस्वी



श्रीगोंदा
जनप्रवास । प्रतिनिधी

महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून कथाकार, नाटककार डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी कथाकथनाचा बहारदार कार्यक्रम सादर केला. त्यांच्या या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला. नाताळची गोष्ट, बाराव्या शतकातील महानाईका, जिजामाता या कथा ओघवत्या शैलीत त्यांनी सादर केल्या. विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. त्यानंतर प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला. मराठीतील नवरसांचे विश्लेषण ऐकताना विद्यार्थी भारावून गेले. ते महाराजा शिवाजीराव शिंदे महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत विद्यार्थी लेखक संवाद आणि लेखन कौशल्य कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. हा कार्यक्रम ग्रंथालय, मराठी, हिंदी, इंग्रजी आणि राष्ट्रीय सेवा योजना या विभागाने आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. महादेव जरे होते. ते म्हणाले की, वाचनाला पर्याय नाही. विद्यार्थ्यांनी नियमितपणे वाचन करावे असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक प्रा. देवेंद्र बहिरम यांनी केले. सूत्रसंचालन एन. एस. एस. च्या विद्यार्थ्यांनी केले. याप्रसंगी पत्रकार बाळासाहेब काकडे, उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, पर्यवेक्षक रत्नाकर झिटे, ग्रंथपाल यशोदा लबडे, डॉ. राजेंद्र ठाकरे, डॉ. राजाराम कानडे, डॉ. राहुल गायकवाड, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार डॉ. भाऊसाहेब बुलाखे यांनी मानले.

# डिंग्रजवाडीत नागरिकांच्या निदर्शनास येणारा बिबट्या जेरबंद

शिक्रापूर
जनप्रवास । प्रतिनिधी

डिंग्रजवाडी ता. शिरुर येथे वारंवार नागरिकांना बिबट्याचे दर्शन होऊन काही पशुधनांसह कुत्र्यांवर बिबट्याने हल्ला केलेला असताना अखेर वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाला असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. डिंग्रजवाडी ता. शिरुर सह कोरेगाव भीमा, धानोरे, दरेकरवाडी परिसरातील नागरिकांना वारंवार बिबट्याचे दर्शन होत काही पशुधनांसह कुत्र्यांवर बिबट्याने हल्ला केल्याने वनविभागाने संभाजी गव्हाणे यांच्या शेतात पिंजरा लावलेला असताना अखेर आज पहाटेच्या सुमरास बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाला बिबट्या जेरबंद झाल्याचे समजताच नागरिकांनी मोठी गर्दी केली होती, याबाबतची माहिती प्रभारी वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांना मिळताच शिरुर वनविभागाचे नियतक्षेत्र अधिकारी बबन दहातोंडे, वनमजूर आनंदा हरगुडे, निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष व वनविभाग रेस्क्यू टीम मेंबर शेरखान शेख, अमोल कुसाळकर यांनी बिबट्याला ताब्यात घेतले, यावेळी सरपंच प्रकाश गव्हाणे, माजी सरपंच शहाजी गव्हाणे, पोलीस पाटील साईनाथ गव्हाणे, चेअरमन प्रवीण गव्हाणे, उद्योजक कानिफ गव्हाणे, नवनाथ गव्हाणे, संदीप गव्हाणे यांसह आदी उपस्थित होते, सदर ठिकाणी पिंजऱ्यात अडकलेला बिबट्या मादी जातीचा तसेच पूर्ण वाढ झालेला असून त्याची रवानगी माणिकडोह बिबट निवारण केंद्रात करण्यात आली आहे. तर बिबट्या जेरबंद झाल्याने नागरिकांनी देखील समाधान व्यक्त केले आहे.

# लाडक्या बहिणींच्या सुरक्षेसाठी प्रदीप कंद आले धावून..!

## पोलिस भरतीसाठी गेलेल्या मुलींना मुंबईत निवासाची सोय करत सुरक्षिततेची घेतली काळजी

लोणीकंद
जनप्रवास । प्रतिनिधी



रात्रीची वेळ मुंबईतल्या अनोळखी रस्त्यावर शिरूर तालुक्यातल्या मुली पोलीस भरतीच्या परीक्षेला आलेल्याइतक्या रात्री जायचे कोठे सगळ्यांना एकच सवाल.. मात्र अर्ध्या रात्रीही शिरूर तालुक्यातील मुलींसाठी जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद आले धावून..!

शिरूर तालुक्यातील मुलींसाठी प्रदीप कंद यांनी राहण्याची सोय केलीच, परंतु त्यांच्या सुरक्षेचीही काळजी घेतल्याने प्रदीप कंद देवदूतासारखे धावून आले आहे.

याबाबत सविस्तर असे की, शिरूर तालुक्यातील पूर्व भागातील सुमारे दहा ते बारा मुली या मुंबई शहरात पोलीस भरतीसाठी शुक्रवार दि.१०रोजी गेल्या होत्या. मुंबई शहरात रात्री उशिरा तेथे पोहोचल्यानंतर अनेक ठिकाणी त्यांनी मुक्कामासाठी विचारणा केली, मात्र काही ठिकाणी त्यांना जादा दराचे भाडे परवडणारे नव्हते, तर काही ठिकाणी सुरक्षेचा प्रश्न देखील होता.

ग्रामीण भागातील मुलींना मुंबईत राहणे आवाक्याबाहेर असल्याने आता करायचे काय? असा सवाल सगळ्यांकडे उपस्थित झाला होता. यावेळी ही बाब शिरूर तालुक्यातील युवकांना समजली. त्यांनी तत्काळ वडगाव रासाईचे सरपंच सचिन शेलार यांना सांगितली. यावेळी सरपंच शेलार यांनी तत्काळ जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद यांच्या कानावर ही बाब घातली. प्रदीप कंद यांनी रात्रीच्या अकरा वाजता ही क्षणाचाही विलंब न करता त्यांचे स्वीय सहाय्यक सुशांत लिमये यांना स्वतः मुली ज्या ठिकाणी आहेत, त्या ठिकाणी मदतीसाठी मुलींच्या सुरक्षेसाठी पाठवले.

यावेळी लिमये यांनी मुलींची भेट घेऊन मुलींची राहण्याची व्यवस्था केली, तसेच या मुलींना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन देखील दिले. शिरूर तालुक्यातील सर्व मुली या सर्वसामान्य कुटुंबातील व गरीब घरातील असल्याने व मुंबईच्या ठिकाणी अचानक रात्री ओढवलेल्या या प्रसंगाने मुली घाबरलेल्या होत्या, परंतु जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद हे धावून आले व रात्रीच्या वेळी तत्परता दाखवल्यानेच शिरूर तालुक्यातील सर्व मुलींचा राहण्याचा प्रश्न सुटला.

उपस्थित मुलींनी कंद यांचे आभार मानले. या मुलींना मदतीसाठी वडगाव रासाईचे सरपंच सचिन शेलार, इनामगावचे मयूर घाडगे, पिंपळसूटीचे विक्रम लगड, सुशांत लिमये यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# ओतूर पोलीसांनी हरवलेल्या शंभर व्यक्तींचा घेतला शोध

ओतूर
जनप्रवास । प्रतिनिधी

ओतूर पोलीस स्टेशन हद्दीतील गेल्या अनेक वर्षांपूर्वी हरवलेल्या तसेच अपहरण केलेल्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी ओतूर पोलिसांना यश आले असल्याने,ओतूर पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ओतूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक एल.जी.थाटे यांनी यासाठी विशेष शोध मोहीम राबवून,या मोहिमेत शंभर व्यक्तिंचा अवघ्या काही दिवसातच शोध घेतला आहे.

या कामगिरीबद्दल पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी ओतूर पोलिसांचे अभिनंदन केले आहे. ओतूर पोलीस स्टेशन हद्दीत हरवलेल्या तसेच अपहरण केलेल्या व्यक्तींचा तपास करून शोध घेण्याची, तपास करण्याची प्रकरणे गेली अनेक वर्ष प्रलंबित होती.यासाठी पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी ओतूर पोलिसांना आदेश दिले होते.

दि.२६ ऑगस्ट ते दि.१ सप्टेंबर २०२४ पर्यंत अपहरण केलेली मुले व हरवलेल्या ७४ व्यक्तिंचा अवघ्या सहा दिवसांतच शोध घेतला. त्यानंतर एक डिसेंबर २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत अपहरण झालेली मुले व मिसिंग ( हरवलेल्या ) २६ व्यक्तिंचा एका महिन्यातच शोध घेतला असल्याचे श्री थाटे यांनी सांगितले.

सदर कारवाई पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख,अपर पोलीस अधिक्षक रमेश चोपडे,उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर यांच्या मार्गदर्शनाखाली ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहु थाटे, पो.हवा दिनेश साबळे, महिला पोलीस अंमलदार मयुरी खोसे आदींनी केली.

# भैरवनाथ वाचनालयातर्फे ग्रंथ प्रदर्शन, सामूहिक वाचन उपक्रम संपन्न




शिक्रापूर
जनप्रवास । प्रतिनिधी

वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत शिक्रापूर येथील शासनमान्य भैरवनाथ मोफत वाचनालय ग्रामपंचायत शिक्रापूर यांचे वतीने ग्रंथ प्रदर्शन व सामूहिक वाचन उपक्रमांचे आयोजन केले होते .

या उपक्रमात विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले या प्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केलेल्या पुस्तक व ग्रंथांपैकी आवडीचे पुस्तक निवडून एक तास वाचन केले.

ग्रंथपाल श्री.संतोष काळे पाटील यांनी वाचनाचे महत्त्व तसेच ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या अवांतर विषयावरील वाचन साहित्याची माहिती दिली . या उपक्रमाकरिता सरपंच श्री रमेश गडदे तसेच ग्रामपंचायत अधिकारी श्री शिवाजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथालय कर्मचारी व सदस्यांनी वाचन संकल्प व उपक्रम हा कार्यक्रम यशस्वी केला. या प्रसंगी वाचनालयास उदय गुरव व गीता गुरव, मोनिका गरुड, रोहिणी ढोकले या सभासदांनी पुस्तके सप्रेम भेट दिली. आभार ग्रंथपाल संतोष काळे पाटील यांनी मानले.

# गोदाकाठ महोत्सवाला नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद

## खरेदी करण्यासाठी दुसऱ्या दिवशी गर्दीचा महापूर

कोपरगाव
जनप्रवास । प्रतिनिधी



प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळ कोपरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी चॅरिटेबल ट्रस्ट कोपरगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या गोदाकाठ महोत्सवाला कोपरगावकरांचा पहिल्या दिवसापासूनच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून दुसऱ्या दिवशी देखील खरेदीसाठी नागरिकांनी मोठी गर्दी केल्यामुळे गोदाकाठ महोत्सवात गर्दीचा महापूर आल्याचे चित्र निर्माण झाले होते.यावेळी आ.आशुतोष काळे यांनी बचत गटाच्या स्टॉल धारकांशी व खरेदीसाठी आलेल्या नागरिकांशी संवाद साधला. दोनच दिवसात मोठ्या प्रमाणात मालाची विक्री झाली असल्याचे स्टॉल धारकांनी आ.आशुतोष काळे यांना सांगितले.

बचत गटाच्या महिलांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी प्रियदर्शनी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.पुष्पाताई काळे व जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ.चैतालीताई काळे यांच्या संकल्पनेतून माजी आ.अशोकराव काळे व आ.आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली गोदाकाठ महोत्सवाला उत्साहात सुरुवात झाली.ज्याप्रमाणे पहिल्याच दिवशी नागरिकांनी खरेदीसाठी गर्दी केली तेवढीच गर्दी दुसऱ्या दिवशी देखील पहायला मिळाली. बचत गटाच्या महिलांना अतिशय अल्प दरात ना नफा–ना तोटा' धर्तीवर स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात आले आहे. जवळपास तीनशेपेक्षा जास्त स्टॉल्स वर बचत गटाच्या महिलांनी आपली घरगुती उत्पादने विक्रीसाठी आणली असून खात्रीशीर व स्वस्त दरात मिळत असलेल्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी नागरिकांची झुंबड उडत आहे.

गोदाकाठ महोत्सवाची महती केवळ जिल्ह्यापुरतीच मर्यादित राहिलेली नसून महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यात गोदाकाठ महोत्सव पोहोचल्यामुळे राज्याच्या विविध भागातून अनेक प्रकारच्या गृहउपयोगी वस्तु व खाद्य पदार्थ खरेदी करण्यासाठी नागरिकांना उपलब्ध आहे. तसेच शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक लागणाऱ्या विविध वस्तु गोदाकाठ महोत्सवात विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. महिला बचत गटांनी तयार केलेल्या मालाची नागरिकांना वाजवी दरात खरेदी करण्याची संधी गोदाकाठ महोत्सवाच्या रुपाने मिळाली आहे.

गोदाकाठ महोत्सवाच्या माध्यमातून महिला बचत गटांना आर्थिक उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध झाले असून दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील महिला बचतगटांचा व नागरिकांचा गोदाकाठ महोत्सवाला उस्त्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. गोदाकाठ महोत्सवात बचतगटांच्या वस्तू विक्रीसह शालेय विद्यार्थ्यांच्या नेतृत्व कलागुणांना अधिकाधिक वाव मिळावा या हेतूने सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे. शहरातील नागरिक याठिकाणी खरेदी करतात व सांस्कृतिक कार्यक्रमाचाही आस्वाद घेतात.खरेदीसाठी प्रत्येक स्टॉल्सवर होत असलेली गर्दी पाहता पुढील दोन दिवसांत गर्दीचा उंच्चांक होणार असल्याचे दिसून येत आहे.

# पदोन्नतीबद्दल पोलिस अधीक्षक राकेश ओला यांचा 'स्नेहबंध'तर्फे सत्कार



अहिल्यानगर

जनप्रवास । प्रतिनिधी

जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांना भारतीय पोलिस सेवेच्या निवड श्रेणीत पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांचा स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी सन्मानपत्र देऊन सन्मान केला. पोलिस परेड मैदानावर पोलिस अधीक्षक राकेश ओला यांचा हा सन्मान करण्यात आला. यावेळी मेजर जनरल विक्रम वर्मा, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक अन्वर अली सय्यद आदी उपस्थित होते. राकेश ओला हे २०१२ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. सलग १३ वर्षे सेवा बजावल्यानंतर भारतीय पोलिस सेवेच्या निवड श्रेणीत पदोन्नती देण्यात आली. पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी यापूर्वी श्रीरामपूर, मालेगाव येथे अपर पोलिस अधीक्षक म्हणून कार्यकाळ गाजवला. नागपूर शहर पोलीस उपायुक्त, नागपूर ग्रामीण पोलिस अधीक्षक येथे कर्तव्य बजावले.

# नगरमध्ये भाजपच्या हर घर सदस्य नोंदणी अभियानाला प्रारंभ

नगर

जनप्रवास । प्रतिनिधी

संपूर्ण शहर भाजपमय करण्यासाठी पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते प्रयत्नशील आहे. घरोघरी, महाविद्यालय व विविध संस्थेत जाऊन सभासद नोंदणी सुरू करण्यात आलेली आहे. इच्छुक नागरिकांना देशातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेल्या भाजपचे सदस्य बनवून घेतले जात असल्याचे शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांनी सांगितले.

शहरातील प्रभाग क्रमांक १५ मधील रेल्वे स्टेशन परिसरात हर घर सदस्य नोंदणी अभियानाचे प्रारंभ करण्यात आले. यावेळी आगरकर बोलत होते. याप्रसंगी माजी उपमहापौर गीतांजलीताई काळे, शहर सचिव दत्ता गाडळकर, विशाल खैरे, विजय गायकवाड, सुरेश लालबागे, पुंडलिकराव गदादे, पंडित खुडे, ताराचंद भनगे, सागर गांधी, भगवान कुडधने, रोहन गोंटे, सिद्धू झावरे, शंतनू गाडळकर आदींसह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# टाकळीभान येथे राजमाता जिजाऊ यांचा जन्मदिन साजरा



टाकळीभान

जनप्रवास । प्रतिनिधी

श्रीरामपूर तालूक्यातील टाकळीभान ग्रामपंचायतमध्ये हिंदवी स्वराज्याच्या जननी राजमाता जिजाऊ यांचा जन्मदिन साजरा करण्यात आला.

यावेळी राजामाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.यावेळी माजी उप सरपंच राजेंद्र कोकणे, अशोक कारखान्याचे संचालक यशवंत रणनवरे, ग्रामपंचायत सदस्य सुनिल बोडखे, अशोक कचे, प्रा. जयकर मगर, भाऊसाहेब पटारे, टाकळीभान सेवा संस्थेचे संचालक शिवाजी पवार, मधुकर गायकवाड, दिलीप पवार, बंडू कोकणे, बापूसाहेब शिंदे, अशोक तुपे, मिलींद शेळके,पत्रकार विजय देवळालकर उपस्थित होते.

# सुवर्णा जऱ्हाड यांची रासपच्या उ. महाराष्ट्र महिला आघाडी अध्यक्षपदी निवड




राहुरी

जनप्रवास । प्रतिनिधी

राहुरी येथील सुवर्णा जऱ्हाड (चौधरी) यांनी रासप पक्षाच्या माध्यमातून महिलांचे मोठे संघटन उभे केले. जिवाचे रान करून पक्षवाढीसाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांची रासपच्या उत्तर महाराष्ट्र महिला आघाडी अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

फलटन येथील महाराजा मंगल कार्यालय येथे राष्ट्रीय समाज पक्षाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राष्ट्रीय महासचिव सुशील कुमारजी, राष्ट्रीय संघटक बाळकृष्ण लेंगरे, प्रदेशाध्यक्ष काशीनाथ नाना शेवते, महासचिव माऊली सलगर, डॉ. प्रल्हाद पाटील, सय्यद बाबा शेख, युवक अध्यक्ष उत्तर महाराष्ट्र अ‍ॅड. आशुतोष जाधव, जिल्हाध्यक्ष नानाभाऊ जुंधारे व राज्य भरातील प्रमुख पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीत प्रदेश कार्यकारणी सदस्य व विभागीय अध्यक्ष नियुक्ती करण्यात आल्या. राष्ट्रीय समाज पक्ष उत्तर महाराष्ट्र महिला आघाडीच्या अध्यक्षपदी सुवर्णा जऱ्हाड (चौधरी) यांची नियुक्ती करण्यात आली. या प्रसंगी राष्ट्रीय समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष काशिनाथ नाना शेवते, मुख्य महासचिव माऊली नाना सलगर, केंद्रीय संघटक बाळकृष्ण लेंगरे मामा, केंद्रीय मुख्य महासचिव कुमार सुशिल पाल आदी उपस्थित होते. सुवर्णा जऱ्हाड यांच्याकडे यापूर्वी अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पद होते. त्यावेळी त्यांनी जिल्ह्यात महिलांचे मोठे संघटन केले. गाव पातळीवर महिलांच्या भेटीगाठी घेऊन पक्षवाढीसाठी जिवाचे रान केले. निवडणूक काळात त्यांच्याकडे पक्ष निरीक्षक व महाराष्ट्र राज्य स्टार प्रचारकची जबाबदारी देण्यात आली होती.

# प्राईड अ‍ॅकडमीचे ग्रामीण भागात शिक्षण क्षेत्रात आदर्शवत काम : आ. हेमंत ओगले

टाकळीभान

जनप्रवास । प्रतिनिधी

ग्रामीण भागामध्ये शहराप्रमाणे आधुनिक व दर्जेदार शिक्षण देणारी प्राईड अ‍ॅकडमी सारखी आदर्श सुंदर शाळा माऊली व डॉ. वंदनाताई मुरकुटे यांनी अथक प्रयत्नातून नावारूपास आणली. असे प्रतिपादन प्राईड अ‍ॅकडमीच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम प्रसंगी श्रीरामपूर विधानसभेचे आ. हेमंत ओगले यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून आचार्य शुभम महाराज कांडेकर, नेत्रचिकित्सक डॉ. संजय शेळके, डॉ. वर्षाताई शिरसाठ, श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, मा.उपनगराध्यक्ष संजय छल्लारे, अशोकचे माजी चेअरमन सुरेश गलांडे, बाबासाहेब काळे, दिगंबर शिंदे बाबासाहेब आदिक, माऊली प्रतिष्ठानचे ज्ञानेश्वर मुरकुटे, डॉ. वंदनाताई मुरकुटे, बजरंग दरंदले आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी बोलताना आ. ओगले म्हणाले की प्राईड अ‍ॅकडमीची शैक्षणिक वाटचाल दिवसेंदिवस यशस्वीरित्या वाढत असून काही वर्षांपूर्वी लावलेल्या या शैक्षणिक रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर होत असून येथील विद्यार्थी संख्या ८५० पर्यंत गेली आहे. ही येथील चांगल्या व दर्जेदार शिक्षण व्यवस्थेची पावती आहे. या ठिकाणी जुनिअर कॉलेज पर्यंत शैक्षणिक व्यवस्था असून सीनियर कॉलेज साठी त्यांनी मान्यता घ्यावी आपण प्राईड अ‍ॅकडमीस सर्वतोपरी सहकार्य करू असे आश्वासन देतो असे ते म्हणाले. यावेळी संजय छल्लारे ,डॉ. संजय शेळके, व डॉ. वर्षा शिरसाठ यांनी प्राईड अ‍ॅकडमीच्या प्रगतीचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. डॉ. वंदनाताई मुरकुटे यांनी प्रास्ताविक करून सर्वांच्या अनमोल सहकार्याने व आशीर्वादाने हा शैक्षणिक रथ आम्ही यशस्वीरित्या ओढत असल्याबद्दल सांगितले. यासाठी माऊली प्रतिष्ठानचे सर्व विश्वस्त मंडळ, माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक आधारस्तंभ माऊली मुरकुटे यांचे सहकार्यही मोलाचे असल्याबद्दल त्यांनी सांगितले.

कार्यक्रम प्रसंगी माऊली प्रतिष्ठानचे विश्वस्त चंद्रकांत नाईक, नितीन भागडे, भरत साळुंके, विलास थोरात, शांताराम तुवर, अरुण कवडे, अर्जुन राऊत, प्रकाश जाधव, नयन गांधी, सुप्रियाताई भोसले, सिंधुबाई उंडे, श्रीमती लीलावती कोल्हे, डॉ. योगेश बंड, अभिजीत लांडगे, रामेश्वर उंदरे, नितीन हारदे, शिवम पटारे, तेजस बोरावके, ज्ञानेश्वर काळे, बी .डी. बडाख, राजेंद्र कोकणे, बंडू बोडखे ,विराज भोसले प्रा.लक्ष्मण कोल्हे, कार्लस साठे, मार्केट कमिटीचे संचालक किशोर बनसोडे, राजू चक्रनारायण, विलास दाभाडे, प्रताप पटारे, सुदाम पटारे, प्रताप कवडे, नानासाहेब तनपुरे, गणेश छल्लारे, प्रकाश जाधव, बाबासाहेब तनपुरे, श्रीधर गाडे, कान्हा खंडागळे, डॉ.मंगेश उंडे, सुनील पटारे, सचिन मुरकुटे, अविनाश लोखंडे, आप्पा रणनवरे, भैय्या पठाण, सुनील बोडखे, भैरव कांगुणे, योगेश आसने, नंदू सलालकर, प्राचार्या प्रीती गोटे, प्राचार्य जयश्री वाडेकर, प्रदीप गोराणे आदीं उपस्थित होते.

# एमआयटीत स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

पुणे

जनप्रवास । प्रतिनिधी

२१ व्या शतकात भारतमाता ज्ञानाचे दालन व विश्वगुरू म्हणन उदयास येईल हे स्वामीजींचे वचन सत्यात उतरत आहे. १८९३ मध्ये स्वामी विवेकानंद यांनी जागतिक धर्म परिषदेत भाकीत केले होते की, विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातून जगात सुख, समाधान आणि शांती नांदेल. त्यांनी धर्म, प्रार्थना आणि ध्यान या विषयावर सखोल ज्ञान जगासमोर मांडले. त्यामुळे प्रत्येकाने त्यांचा आदर्श घ्यावा. असे विचार एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी व्यक्त केला. भारताचे थोर सुपुत्र स्वामी विवेकानंद यांची १६३ वीं जयंती व युवादिनाचे औचित्य साधून विद्यापीठात ज्ञानजागर- भारतीय अस्मिता जागविण्यासाठी हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# श्रमसंस्कार शिबिरातून शेती प्रश्नांवर चर्चा झाली पाहिजे : कवी अमोल चिने

## सौ. सुशीलामाई काळे महाविद्यालयाचे हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

कोळपेवाडी

जनप्रवास । प्रतिनिधी

राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांमध्ये देशप्रेम, सामाजिक बांधिलकी, समाज सेवा आदी कर्तव्यांची तत्वमुल्ये रुजली जावून वेळप्रसंगी देशसेवेसाठी आपले सर्वस्व पणाला लावले पाहिजे याची शिकवण मिळते.आपले देश कृषी प्रधान देश असून शेतकरी हा राष्ट्राचा कणा आहे. त्यामुळे शेतकरी हिताकडे देखील लक्ष देणे गरजेचे असून राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिरातून शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न देखील चर्चिले गेले पाहिजे असे मत प्राध्यापक कवी अमोल चिने यांनी व्यक्त केले.




कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीच्या सौ.सुशीलामाई काळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप नुकताच कोपरगाव तालुक्यातील मढी खु. येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला याप्रसंगी प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याचे संचालक वसंतराव आभाळे होते.

यावेळी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना संचालक वसंतराव आभाळे म्हणाले की, मा.खा. कर्मवीर शंकररावजी काळे व त्यांच्या अर्धांगिनी माईसाहेब अर्थात सौ.सुशीलामाई काळे यांच्या अट्टाहासातून ग्रामीण भागातील मुलींच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी या उद्देशातून महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली त्यामुळे पंचक्रोशीतील विद्यार्थी व विद्यार्थिनी उच्च शिक्षण घेवून विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहे. संस्थेच्या सचिव सौ.चैतालीताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय गुणवत्तेच्या बाबतीत अव्वल असल्याचे त्यांनी सांगितले.

# शिवसेनेच्या माध्यमातून प्रभागातील सर्व विकास कामे मार्गी लागणार : सुवर्णाताई जाधव

नगर

जनप्रवास । प्रतिनिधी

प्रभागातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच प्रयत्न राहिला आहे. निधी अभावी प्रभागातील कामे प्रलंबीत होती. महायुतीच्या सरकारमध्ये असलेल्या शिवसेनेच्या माध्यमातून प्रभागातील सर्व विकास कामे मार्गी लागणार आहे. गाझी नगर परिसरात मागील काही वर्षापासून असलेली ड्रेनेज लाईनची समस्या सोडविण्यासाठी काम हाती घेण्यात आले आहे. लवकरच या भागातील काँक्रिटीकरण रस्ता व इतर नागरी प्रश्न देखील सोडविले जाणार असल्याचे आश्वासन नगरसेविका सुवर्णाताई जाधव यांनी

काटवन खंडोबा रोड, गाझी नगर येथे नगरसेविका सुवर्णाताई जाधव यांच्या प्रयत्नाने ४५० एमएम व्यासच्या ड्रेनेजलाईन टाकण्याच्या कामाचे शुभारंभ करण्यात आले. यावेळी जाधव बोलत होत्या. याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक अनिल शिंदे, दिपक खैरे, प्रशांत गायकवाड, दत्ताभाऊ जाधव, हजराबी शेख, हसिना शेख, सकिना शेख, कमल दातरंगे, शमीम सय्यद, कमल इंगळे, कौसर पठाण, परवीन बागवान, ताराबाई सुडके, विकास पाचारणे, सुनिल सुडके, अरबाज बागवान, अजीज सय्यद, हिराबाई पाचारणे, शाईन शेख, अकबर शेख, अज्जू शेख, शौकत शेख, नजीर पठाण, मुदस्सर शेख आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# राहुरीमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जंयती साजरी

राहुरी

जनप्रवास । प्रतिनिधी

साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे चौक राहुरी मध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जंयती भगव्या ग्रुपच्या वतीने अभिवादनांचा कार्यक्रम करण्यात आला होता

या कार्यक्रमांप्रसगी भगव्या ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष राजूभाऊ आढागळे भारिप बहुजन महासंघाचेनेते बाबासाहेब साठे गेनू भाऊ तोडमल माजी नगरसेवक सोन्याबापू जगधने भास्कर मामा आल्हाट यांनी प्रतिमेचे पुजन केले. यावेळी लक्ष्मीनगर चे सुजित पवार यांची येवला नगरपरिषद या ठिकाणी आरोग्य निरिक्षिक पदी निवड झाल्या बद्दल सत्कार करण्यांत आला .




तंदनंतर निलेश जगधने , मच्छिंद्र गुंड , राजेंद्र वाढेकर , कांतिलाल जगधने , सोमा जगधने , रविंद्र जगधने, सुरज शिंदे , दिपक डावखर , महामानव प्रतिष्टान चे पृथ्वीराज साठे , रमेश जगधने , संजय संसारे, गुंजाळ सर यांनी मनोगत व्यक्त करून महामानवांच्या विचारांवर चालण्याचे प्रतिज्ञा केली तसेच त्यांच्या कार्याचा उजाळा केला याप्रसंगी मयूर दुधाडे ,बाबासाहेब शेलार ,राजेंद्र जगधने ,मुकेश जगधने ,श्रीकांत शेजुळ,किरण कुंभार ,शुभम नारद ,पंकज नारद ,योगेश मुंडे , सोन्याबापु जगधने , सागर जगधने , सुमित जगधने , अनिल कोळसे , मिनाष पटेकर , सोमा विधाटे , काकासाहेब अढागळे ,भारत सरोदे , प्रसाद नांगरे साहेबराव गाडे , विजय सरोदे ,इ. राहुरी शहरातील नागरिक उपस्थित होते.

# दगडाने ठेचून तरुणाचा खुन करणाऱ्या आरोपीस एमआयडीसी पोलिसांनी केले १२ तासात जेरबंद

अहील्यानगर

जनप्रवास । प्रतिनिधी

बोल्हेगाव फाटा येथे दगडाने तरुणाचा खून करून पसार झालेल्या आरोपीस पकडण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे हे कारवाई पोलिसांनी अवघ्या १२ तासाच्या आत केली आहे.

यातील मयत यांची पत्नीने सदरील घडलेल्या घटनेबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनेनुसार एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी पोलीस कर्मचाऱ्यांचे दोन पथक तयार करून त्यांना मार्गदर्शन करून आरोपी पकडण्यास रवाना केले.गुन्हा घडला त्या ठिकाणी पोलीस सीसीटीव्ही फुटेज चेक करत असताना सपोनी.माणिक चौधरी यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सदरील गुन्हा हा भास्कर विठ्ठलराव देशमुख रा. वाळुंज ता. जि. अहिल्यानगर याने केला असून तो सध्या आष्टी जि.बीड येथे आहे. खात्रीशीर माहिती मिळाल्याने पोलीस पथकाने बीडमध्ये जाऊन आरोपीचा सीताफिने तपास करत आरोपीला अटक केली.



पकडलेल्या आरोपीस गुन्ह्याबाबत विचारणा केली असता त्याने सांगितले की मयत अश्विन कांबळे यांनी दारू पिऊन शिवीगाळ केल्याने मी त्याच्या डोक्यात दगड घालून त्यास जीवे ठार मारले आहे अशी कबुली दिली.सदरची कारवाई जिल्हा एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सपोनि. माणिक चौधरी,पोउनि. विनोद परदेशी,पोउनि.विकास जाधव, पोउनि. मनोज मोंढे,पोहेकॉ. नंदकिशोर सांगळे, नितीन उगलमुगले,साबीर शेख, कावरे,राजू सुद्रिक, आदींनी केली.

# श्रध्दा व भक्तीतून साधूसतांनी जपलेल्या धर्म संस्कृती व परंपरेला जपा : राज्यपाल हरिभाऊ बागडे

नेवासा

जनप्रवास । प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील तीर्थक्षेत्र देवगड येथील श्री गुरुदेव दत्त पिठास राजस्थानचे महामहिम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी शुक्रवारी दि.१० जानेवारी रोजी भेट दिली.आपल्या संस्कृतीवर अनेकांकडून प्रहार करण्याचे प्रयत्न झाले मात्र चिवट श्रध्दा व भक्तीतून साधूसतांनी धर्म व संस्कृती जपली म्हणून आज देशाची संस्कृती व परंपरा अबाधित आहे ही संस्कृती व परंपरा जपा व तिला वाढविण्याचा प्रयत्न करा असे आवाहन राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी यावेळी बोलतांना केले.

राज्यपाल हरिभाऊ बागडे नानांचे देवगड येथे आगमन झाल्यानंतर राष्ट्रीय संत गुरुवर्य महंत श्री भास्करगिरीजी महाराज,उत्तराधिकारी स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी महाराज, श्रीराम साधना आश्रमाचे महंत सुनीलगिरीजी महाराज,मुकाई



आश्रमाचे महंत योगी श्री गोपालानंदगिरीजी महाराज,मध्यमेश्वर देवस्थानचे योगी ऋषिनाथजी महाराज,आमदार विठ्ठलराव लंघे, हभप श्री दिनकर महाराज मते यांच्या समवेत उपस्थित मान्यवरांचे झांज पथकाच्या निनादात गुरुदत्त माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे स्वागत केले.

या सर्व संत मंडळींसह मान्यवरांच्या उपस्थितीत ज्ञानसागर सभागृहात झालेल्या सत्कार समारंभ कार्यक्रमात राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी भगवान दत्तात्रयांसह श्री समर्थ सदगुरू किसनगिरी महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेतले.यावेळी महंत श्री भास्करगिरीजी बाबा व प्रकाशानंदगिरीजी,नेवासा तालुक्याचे महायुतीचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते राज्यपाल बागडे नानांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलतांना गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज म्हणाले की राज्यपाल झालेल्या श्री बागडे नानांनी जीवनात धर्म कार्यासह त्याग व समर्पित भावनेने राष्ट्राकरिता काम केले व करत आहे त्यांच्या अंतकरणातील भाव हा राष्ट्राकरता व समाजाकरता असून मिळालेल्या सर्व पदांचा त्यांनी सन्मान केला असे गौरवोदगार त्यांनी यावेळी बोलतांना काढले व देश सेवा व दु:ख पीडितांची सेवा त्यांच्याकडून होत राहील असा शुभाशीर्वाद दिला.

यावेळी बोलतांना आमदार विठ्ठलराव लंघे पाटील म्हणाले की आमदार,मंत्री,विधानसभा अध्यक्ष अशी अनेक पदे बागडे नानांनी भूषवली व त्या पदांचा आपल्या कार्यातून सन्मान ही केला,राजस्थानच्या राज्यपालपदी त्यांची झालेली नियुक्ती ही राज्यासाठी अभिमानास्पद व भूषणावह बाब असल्याचे त्यांनी सांगितले.पूर्वीपासून देवगडचे भक्त असलेले बागडे नाना हे कुटुंबातले वाटते असे गौरवोदगार काढले.

# पतंगोत्सवात वीजयंत्रणेपासून सावध राहण्याचे आवाहन

पुणे

जनप्रवास । प्रतिनिधी

मकरसंक्रातीनिमित्त पतंगोत्सव साजरा करताना सार्वजनिक ठिकाणी असलेल्या उच्च व लघुदाबाच्या वीजवाहिन्या, रोहित्र, फिडर पिलर आणि इतर वीजयंत्रणेपासून सावधगिरी बाळगावी तसेच वीजतारांसह इतर वीजयंत्रणेत अडकलेल्या पतंग किंवा मांजा काढण्याचा प्रयत्न करू नये असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे.

शहरी व ग्रामीण भागात महावितरणच्या उच्च व लघुदाबाच्या वीजवाहिन्या, रोहित्र, फिडर पिलर्स तसेच इतर वीजयंत्रणा सार्वजनिक ठिकाणी आहेत. मकरसंक्रातीनिमित्त पतंग उडविताना पतंग किंवा मांजा वीजयंत्रणेमध्ये अडकण्याची शक्यता आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत नागरिक किंवा लहान मुलांनी लोखंडी सळई, काठीच्या सहाय्याने वीजयंत्रणेमध्ये अडकलेला मांजा किंवा पतंग काढण्याचा प्रयत्न करू नये. वीज यंत्रणेमध्ये वीजप्रवाह सुरु असताना वीजतारा, रोहित्र किंवा वीजयंत्रणेत अडकलेले पतंग काढण्याच्या प्रयत्नात वीजयंत्रणेला स्पर्श होण्याचा किंवा त्यावर चढून जाण्याचा जाणते अजाणतेपणी धोका पत्करला जातो. त्यामुळे विजेचा धक्का लागून अपघात होण्याची मोठी शक्यता असते. याशिवाय पतंगाच्या मांज्यामध्ये धातुमिश्रीत कोटींग असल्यामुळे विजेचा धक्क्याने विद्युत अपघातामध्ये जिवितहानी तसेच वीजवाहिन्यांमध्ये शॉर्टसर्कीट होऊन वीजपुरवठा खंडित होण्याचा धोका आहे. नागरिकांनी व विशेषत: लहान मुले व तरुणांनी महावितरणची विविध वीजयंत्रणा असलेल्या परिसराऐवजी सुरक्षित व मोकळ्या मैदानात पतंगोत्सव साजरा करावा.

## जाहीर बी–१ खुली निविदा सुचना क्रं. ०८/२०२४–२५
## पुणे जिल्हा परिषद पुणे,बांधकाम विभाग (दक्षिण)

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग दक्षिण , पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे तर्फे खालील कामाचे नावासमोर नमुद केलेप्रमाणे पुणे जिल्हा परिषदेकडील योग्य त्या कंत्राटदाराकडुन खाली नमुद कामाच्या सीलबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग (दक्षिण),निविदा शाखा,जिल्हा परिषद पुणे–४११००१,यांच्या कार्यालयातून दि. १३/०१/२०२५ सकाळी १०.०० वा पासून ते दि. २७/०१/२०२५ ( सुट्टीचे दिवस सह ) दु. ५.०० वा. पर्यंत देणेत येतील. सीलबंद भरलेल्या निविदा कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग (दक्षिण ) जिल्हा परिषद पुणे येथे दि. २८/०१/२०२५ रोजी दु. ५.०० वा. पर्यंत स्विकारणेत येतील आणि शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा त्यानंतर कार्यालयीन सोईच्या दिवशी सक्षम समिती समोर उघडणेत येतील.

| अ. क्रं. | कामाचेनाव | निविदा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम रु. | एकूण अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | आवश्यक कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिवरी विठठल मंदिर ते मराठी शाळेचा मळा रस्ता करणे ता. पुरंदर (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४५९४५/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला) प्रवर्ग |
| २ | पानवडी– छ. संभाजी महाराज स्मारक परिसरातील रस्ता ता. पुरंदर (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४५०६/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ३ | खळद मुंजवडी ते खळद रस्ता करणे ता. पुरंदर (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४५९४५/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ४ | थोपटेवाडी झिरापवस्ती (बोऱ्होटेवस्ती) ते बोल्हाई मंदिर रस्ता करणे ता. पुरंदर (३०५४४०१७–२७ रस्ते व पूल विशेष / नैमित्तक दुरुस्ती) | ८५७४९६/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ५ | पोंढे धनगरवस्ती रस्ता करणे ता. पुरंदर (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४५१०८/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ६ | मौजे चिव्हेवाडी ता. पुरंदर जि. पुणे येथे अंतर्गत सिमेंट कॉंक्रीटीकरण रस्ता करणे ता. पुरंदर (प्रधानमंत्री आदि. आदर्श ग्राम विकास योजना) | ८४४९१२/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ७ | खळद येथील सतिश कामथे घर ते अंगणवाडी घोडकेमळा रस्ता करणे (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८४४७९४/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला) प्रवर्ग |
| ८ | वाळुंज पारगाव रस्त्यावरील वाळुंज येथे कऱ्हा नदीवर साकव पुल दुरुस्ती करणे ता. पुरंदर (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८३४२८६/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ९ | वाळुंज पारगांव रस्त्यावर वाळुंज येथे साकव पुलावर कॉंक्रीटीकरण करणे (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८४०१६७/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| १० | गुळूंचे ते बोलाईमाता मंदिर रस्ता करणे (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८३६५००/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ११ | केतकावळे येथिल रा.मा. ११९ ते काळसरीचा वाडा रस्त्यावरील सी.डी. वर्कचे उर्वरित काम करणे ता. पुरंदर (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ६७२१५०/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| १२ | मासाळवाडी येथील भगवान धायगुडे वस्ती सभागृह बांधणे ता. बारामती (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ४२३०४७/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| १३ | सोनगाव लिंगायत समाज दफनभुमी सुधारणा करणे ता. बारामती (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४५८३४/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला) प्रवर्ग |
| १४ | सांगवी – रामभाऊ मुगटे वस्ती रस्ता ता. बारामती (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८५८०९५/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| १५ | सांगवी – विश्वास देशमुखवस्ती रस्ता ता. बारामती (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८५८०९५/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| १६ | सांगवी– C.V. तावरेवस्ती रस्ता (पाटीलवस्ती) ता. बारामती (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४९४६/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| १७ | कांबळेश्वर आवाळे वस्ती रस्ता ता. बारामती (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८५४९०९/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| १८ | निरावागज गुण्याबा येळेवस्ती ते जगु येळे वस्ती रस्ता ता. बारामती (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४८५३/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| १९ | भिलारवाडी येथील नितीन ठामणे वस्ती उर्वरित रस्ता करणे ता. बारामती (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४७८४०/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला) प्रवर्ग |
| २० | सदोबाचीवाडी गोडगाईवस्ती रस्ता करणे ता. बारामती (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४९४६/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| २१ | बऱ्हाणपूर जुने नेपतवळण ते बऱ्हाणपूर रस्ता ता. बारामती (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८६७८४३/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| २२ | वरकुटे बु. भावडी रस्ता मते हरिभाऊ देवमकर वस्मती रस्ता मता. इंदापूर (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८५२६८२/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| २३ | गलांडवाडी नं.२ वस्ती कांता शिंदे ते अशोक साळुंके रस्ता ता. इंदापूर (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४६६२३/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| २४ | लोणी देवकर येथिल पुणे सोलापुर हायवे ते तोरवे वस्ती अंतरराष्ट्रीय महिला कुस्ती एकेडमी रस्ता करणे ता. इंदापूर(३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८४१२५८/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| २५ | भोडणी येथे पवळ घर ते प्रकाश घाडगे घर रस्ता करणे ता. इंदापूर(३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ७९८५८७/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला) प्रवर्ग |
| २६ | लोणी देवकर येथिल सोनवाडी ते देवकर चितारे वस्ती रस्ता करणे ता. इंदापूर(३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ७००३१८/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| २७ | मलठण खडकनाला ते सबस्टेशन रस्ता करणे ता. दौंड (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४७५६४/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| २८ | डाळींब मुकादममळा ते भडकबोरी रस्ता ता दौंड (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८५११६८/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| २९ | लडकतवाडी येथील उर्वरित लडकत उंडवडी शिवरस्ता करणे ता दौंड (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८५८५८२/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ३० | गलांडवाडी येथील शहाजी कदम घर ते अनिल कदम घर रस्ता करणे ता दौंड (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८११८७५/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ३१ | मौजे केडगाव येथील खुटबाव रोड ते काळुबाई मंदिर हंडाळवाडी रस्ता करणे ता दौंड (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८२५४७९/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला) प्रवर्ग |
| ३२ | गिरीम येथील लक्ष्मण पासलकर घर ते विशाल पासलकर घर रस्ता करणे ता दौंड (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ७४५९१५/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ३३ | पारगांव येथील खोपोडी गलांडवाडी रोड ते कानिफनाथ मंदिर रस्ता करणे (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४७३८९/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ३४ | शिक्रापूर गावातील राऊतवाडी येथे मुख्य रस्ता करणे ता. शिरुर (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४५०८७/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ३५ | केंदूर येथील श्री कानिफनाथ मंदिर ते जांभळावस्ती रस्ता डांबरीकरण काणे ता. शिरुर (३०५४४०१७–२७ रस्ते व पूल विशेष / नैमित्तक दुरुस्ती) | ८५१४७७/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ३६ | शरदवाडी हनुमान मंदिरापासुन कॉंक्रीट (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८३८०५०/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ३७ | मौजे आंबळे आरोग्य केंद्र ते पाण्याची टाकी सिमेंट रस्ता ता. शिरुर (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४५२४४/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला) प्रवर्ग |
| ३८ | टाकळी भिमा स्मशानभूमी येथे आर सी सी शेड बांधणे ता शिरुर (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४९२१/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ३९ | मौजे अण्णापुर येथे गावठाण अंतर्गत रस्ता करणेता शिरुर (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८३४४३०/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ४० | मौजे पिंपरखेड येथे दाभाडे मळा हनुमान मंदिर समोर रस्ता करणेता शिरुर (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८३३५८३/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ४१ | मौजे आंधळगांव गावठाण अंतर्गत कुस्ती आखाडा बांधणे ता शिरुर (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८१६००७/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला) प्रवर्ग |
| ४२ | मौजे टाकळी हाजी खटाटेवस्ती उर्वरित रस्ता कॉंक्रिटीकरण करणे ता शिरुर (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८३२०३५/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ४३ | मौजे आमदाबाद येथे स्मशानभूमी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे ता शिरुर (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८३५५७४/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला) प्रवर्ग |
| ४४ | मौजे मांडवगण फराटा येथे वडगाव रासाई रस्ता ते रायझींग स्टार शाळेपर्यंत रस्ता करणे ता शिरुर (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८३५९१९/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ४५ | शिरुर (ग्रामिण) येथील जाधव मळा शेळके सर घर ते थिटे सर घर रस्ता करणे(३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ७४९६८२/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ४६ | नागरगाव येथील आंधळगाव नागरगाव त निंभोळवस्ती जोड रस्ता ता शिरुर (२५१५–२२१९ ग्रा.पं.स्तर स्थाविका) | ८३४४८८/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ४७ | डिंग्रजवाडी नाबगेवस्ती अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे ता शिरुर (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४९०३/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ४८ | डिग्रजवाडी केतन कांतीलाल गव्हाणे घर ते खडावस्ती चौकाकडे जाणारा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे ता शिरुर (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४९०३/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ४९ | शिरुर ग्रामीण बाबूरावनगर मधील गंगाविहार सोसायटीकडे जाणारा रस्ता ता. शिरुर (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४५२०८/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला) प्रवर्ग |
| ५० | कदमवाकवस्ती वॉर्ड क्रमांक ४ मधील समीर खान घर ते नचि शेख घर रस्ता ता. हवेली (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४०७४/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ५१ | न्हावी सांडस अंतर्गत रस्ता ता. हवेली (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४७३९/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ५२ | अहिरे गाव अंतर्गत चौक सुशोभिकरण व कॉंक्रीटीकरण करणे ता. हवेली (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४४०४/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ५३ | अहिरे ग्रामपंचायत सुधारणा करणे ता. हवेली (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४००११/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ५४ | कदमवाकवस्ती कवडी माळवाडी वॉर्ड क्र.१ रस्ता कॉंक्रीट ता. हवेली (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४७८७/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ५५ | कदमवाकवस्ती कवडे माळवाडी गणराज पार्क (वॉर्ड क्र.१) ते शशिकला यादव घर रस्ता कॉंक्रीट ता. हवेली (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४६९३/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला) प्रवर्ग |
| ५६ | कदमवाकवस्ती गोठा परिसर रस्ता कॉंक्रीट ता. हवेली (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४६९३/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ५७ | खेड शिवापूर केवलाई पाणवठयाकडे जाणारा रस्ता कॉंक्रीट करणे ता. हवेली (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४४७१/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ५८ | वडकी गायकवाडी मस्कोबा मंदिर ते जयराम कोळपे घर रस्ता करणे ता. हवेली (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४३६४२/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ५९ | वडकी देवराम लडकत घर ते आगळीचा ओढा रस्ता कॉंक्रीट करणे ता. हवेली (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४३८१४/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ६० | वडकी मच्छिंद्र मोडक घर ते समीर मोडक घर रस्ता करणे ता. हवेली (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४१७५/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ६१ | गोऱ्हे बु. जि.प. शाळेमागील रस्ता कॉंक्रीट करणे ता. हवेली (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४६९१/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला) प्रवर्ग |
| ६२ | खडकवासला मतदारसंघातील मौजे जांभळी अंतर्गत रस्ता करणे ता. हवेली (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८४१३४०/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ६३ | थेऊर येथील भीमनगर अंतर्गत रस्ता करणे ता. हवेली (३०५४४००५–२७ जि.प.निधी) | ८३८०६९/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ६४ | गाडीखेल – दळवीवस्ती रस्ता करणे ता. बारामती (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४५३५/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ६५ | काझड बाळू नरुटे वस्ती रस्ता करणे ता. इंदापूर (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४५०८८/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृत वर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला) प्रवर्ग |
| ६६ | मुंजवडी अंतर्गत रस्ता करणे ता. पुरंदर (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४५९४५/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ६७ | कोळोली दशक्रिया विधी घाट बांधकाम ता. बारामती (२५१५–१५०५ जनसुविधा) | ८४४२९६/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |
| ६८ | भरणेवाडी येथील बिरोबावाडी येथील शेडलगत असलेल्या विहिरीस संरक्षक भिंत बांधणे ता. इंदापूर ( ४ इ व द जि.प. निधी) | ८४३९९६/– | ५९०/– | निविदा रकमेच्या १% | २% | ०३ महिने | पुणे जि.प. नोंदणीकृतवर्ग १ ते ७ सर्वसाधारण (खुला ) प्रवर्ग |

## निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१) कोऱ्या निविदा संचासाठी अर्जासोबत उपरोक्त कामाचे नावासमोर नमूद केलेप्रमाणे योग्य त्या वर्गाचे नोंदणी प्रमाणपत्र, मुळ प्रती दाखविलेनंतर त्यांना कोरे निविदा संच्यासाठी भरणा चलन तयार करुन देणेत येईल.

२) कोऱ्या बी –१ नमुन्याची रक्कम रोख स्वरुपात चलनाने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा जिल्हा परिषद पुणे (विस्तारीत कक्ष) खाते क्रं.२९/१ येथे भरुन चलन दाखविल्यास निविदा उपलब्ध होतील.

३) सीलबंद निविदेच्या लिफाफा क्रं.१ मध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या सत्यप्रती सादर कराव्या लागतील.

(१) वरील प्रमाणे आवश्यक नोंदणी प्रमाणपत्र .

(२) निविदा फॉर्म फी भरणा चलनाची प्रत.

(३) इसारा रकमेचा पुणे येथे देय होणारा मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जि.प.पुणे खाते २९/१ यांचे नावाने काढलेला धनाकर्ष (Demand Draft) सरकारी बँक, शेडयुल बॅक व सार्वजानिक क्षेत्रातील बॅकेचा स्वीकरणेत येईल (C.A. & F.O. Z.P. Pune A-/c No.29/1 payable Pune) तसेच सु.बे.अ. व म.स.स. यांनीही ही खुल्या गटातील निविदा असल्याने बयाणा रक्कम भरणे बंधनकारक आहे.

(४) प्राप्तीकर पॅनकार्ड व जी.एस.टी प्रमाणपत्र शेवटचे तीन वर्षाचे आय.टी. आर. PTRA and PTC

(टिप :–उपरोक्त कागदपत्रांपैकी एकही कागदपत्र सादर केलेले नसल्यास सदर ठेकेदाराची निविदा बाद करणेत येईल व आर्थिक लिफाफा (Financial Bid) उघडणेत येणार नाही.

तसेच कोणतेही कागदपत्र सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.)

४) सीलबंद निविदेच्या लिफाफा क्रं.२ मध्ये प्रत्येक पानावर ठेकेदाराचा स्वत:चा सही व शिक्का असलेला तसेच दर अंकी व अक्षरी लिहीलेला खात्याने साक्षांकित करुन दिलेला निविदा फॉर्म सादर करावा.

५) अ ) पात्र निविदा धारकांकडून विहित सुरक्षा अनामत रक्कम ही कामाचा करारनामा करतेवेळी कार्यकारी अभियंता बांधकाम दक्षिण विभाग, जिल्हा परिषद पुणे यांचे नांवे ठेव पावती स्वरुपात / चलनाने रोख स्वरुपांत घेतली जाईल व उर्वरीत अनामत रक्कम प्रथम देयकांतुन कपात केली जाईल.

६) निविदा देकार १ % पर्यंत कमी असल्यास अतिरिक्त सुरक्षा अनामत भरण्याची आवश्यकता नाही .

७) निविदाधारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १.०१%पासुन ते १०% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन कामाच्या किंमतीच्या १% एवढया रकमेचा पुणे येथे देय असलेला मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.पुणे खाते क्रं.२९/१ या नावाने काढलेला धनाकर्ष (डी.डी.) (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं.२ मध्ये सादर करावा . (उदा. १ ते १०.०० % पर्यंत कमी दर १ % रक्कम)

८) निविदाधारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे

तेवढया रकमेचा वरील (४) प्रमाणे येणा–या रकमेसह पुणे येथे देय असलेला मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.पुणे खाते क्रं.२९/१ या नावाने काढलेला धनाकर्ष (डी.डी.) (Demand Draft) जो परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं.२ मध्ये सादर करावा (उदा.१०% पर्यंत कमी दर १% व (१०% ते १५% पर्यंत कमी दराने प्रति टक्का १% दराने) ५% असे एकुण ६% रक्कम)

९.) निविदा देकार अंदाजपत्रकीय दरपेक्षा १५% पेक्षा कमी दराचा असल्यास देकार १५% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे त्याच्या दोन पटीने वरील (५) प्रमाणे येणा–या रकमेसह पुणे येथे देय असलेला मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.पुणे खाते क्रं.२९/१ या नावाने काढलेला धनाकर्ष (डी.डी.) (Demand Draft) Demand Draft) जो परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं.२ मध्ये सादर करावा (उदा.१५% पर्यंत कमी एकुण ६% रक्कम) व १९% पर्यंत कमी दर (१९% – १५%) ४% २ = ८%) असे एकुण १४% रक्कम सदर डी.डी. सादर केलेला नसलेस निविदा अवैध ठरविणेत येईल.

१०) निविद प्रपत्रातील व निविदा नोटीसमधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांवर बंधनकारक राहतील. तसेच प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देताफेटाळण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला असून निविदा पाठविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला/संस्थेला निविदा फेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

सही/–
कार्यकारी अभियंता
पुणे जिल्हा परिषद,

# नारळाचे 'हे' फायदे आपल्याला माहित आहेत का?



नारळाच्या झाडाला कल्पवृक्ष म्हटलं जातं. त्यापासून निर्माण होणाऱ्या सगळ्या गोष्टी या मनुष्याला उपयोगी पडतात. नारळ हा त्यापैकीच एक.

नारळाचा उपयोग खाण्यासाठी, ओषधांसाठी, तेलासाठी तसेच इतर अनेक गोष्टींसाठी केला जातो. नारळाच्या शेतीपासून जगातल्या अनेक देशांत चांगला रोजगार मिळत आहे.

अगदी तहान भागविण्यापासून ते फर्निचर तयार करण्यापर्यंत नारळाचे असंख्य असे फायदे आहेत.

नारळामध्ये कार्बोहायड्रेट्स, मॅगनिज आणि प्रोटिन मोठ्या प्रमाणावर असतं. त्यामुळे आपले आरोग्य चांगलं राहण्यास मदत होते.

नारळाचे दूध आणि तेल हे आपल्या त्वचेला ग्लो आणण्यासाठी फायदेशीर आहे. केसांच्या आरोग्यासाठीही नारळाचे तेल वापरले जाते.

नारळामध्ये आयर्न आणि सेलेनियम असते. ते एक ॲन्टिऑक्सिडन्ट स्वरुपात काम करते, त्यामुळे लाल रक्त पेशींचे संरक्षण होते.

नारळ खाल्याने कोलेस्टोरॉलचा स्तर सुधारतो. नारळात व्हिटॅमिन, मॅग्नेशियम आणि पोटॅशियम हे घटक असतात. त्यामुळे ब्लड प्रेशर नियंत्रणात येतं.

नारळाचे पाणी रोज पिल्यास शरीरातील ग्लुकोजचे प्रमाण स्थिर राहतं. नारळातील औषधी गुण लक्षात घेता आजारी व्यक्तींना नारळाचे पाणी प्यायचा सल्ला दिला जातो.

# प्लास्टिकच्या बाटलीतून पाणी पिणे चांगलं की वाईट?



आपण प्रवासात किंवा अन्यवेळी नेहमीच पाण्याची बाटली सोबत ठेवतो. पण प्लास्टिकच्या बाटलीतून पाणी पिणे हे आरोग्यास चांगलं की वाईट, यावर एक नजर –

१) बिसफेनोल ए हे एक घातक रसायन आहे. हे पाण्यासोबत मिसळून शरिरात गेल्यास हानीकारक ठरू शकतं. त्यामुळे पाण्यासाठी बाटली विकत घेताना ती इझ विरहीत असेल, याकडे लक्ष द्या.

२) बहुतेक प्लॅस्टिकच्या बाटल्यांमध्ये इझ असतं. त्यामुळे काचेची बाटली उपयोगी ठरू शकते.

३) काचेच्या बाटलीत पाणी कितीही दिवस राहू शकतं, मात्र प्लॅस्टिकच्या बाटलीत जास्त दिवस पाणी ठेवल्यास त्याची चव बदलते.

४) पाण्याची प्लास्टिक बाटली जर उन्हात ठेवल्यास आणि ते पाणी प्यायल्यास शरिराला घातक ठरू शकतं. कारण सूर्यकिरणांमुळे इझ रसायन पाण्यात तातडीने मिसळलं जातं. त्यामुळे पाण्याची प्लॅस्टिक बाटली वापरणार असाल, तर ती सावलीत ठेवा.

५) जर तुम्ही लिंबू पाणी सोबत ठेवत असाल, तर काचेच्या बाटलीचाच पर्याय उत्तम ठरू शकतो. कारण प्लॅस्टिक बाटलीतील रसायनामु त्याचा स्वाद बिघडतो.

६) प्लॅस्टिकची बाटली योग्यप्रकारे न धुतल्यास त्यामध्ये जीवाणूंची पैदास होऊ शकते. दुसरीकडे प्लॅस्टिक बाटलीपेक्षा काचेची बाटली स्वच्छ करणं सहज शक्य आहे.


७) लहान मुलांनाही काचेच्याच बाटलीतून दूध पाजणं फायदेशीर आहे.

८) काचेची बाटली फुटण्याचा धोका असतो, त्यामुळे बाटली घेताना त्यावर सिलिकॉन कव्हर असलेली बाटली निवडा.

९) प्लॅस्टिकच्या प्रत्येक बाटलीचा पुनर्वापर करता येऊ शकत नाही. कोल्ड्रिंक्सच्या बाटल्यांचाही पुनर्वापर करता येत नाही. या बाटल्यांच्या वरच्या बाजूला एक त्रिकोण असतो, त्यावर १ लिहिलेलं असतं. त्याचा अर्थ या बाटलीचा केवळ एकदाच वापर होऊ शकतो. या बाटल्यांचा पुनर्वापर केल्यास, तुम्ही आजारी पडू शकता.

■■■

# ऑफिसमध्ये सतत झोप येते का? 'ही' असू शकतात कारणे



बऱ्याचदा आपण तयारी करून घाईगडबडीमध्ये ऑफिसला जातो. पण ऑफिसमध्ये गेल्यानंतर आपल्याला झोप येते किंवा थकवा जाणवू लागतो. समोर कामाचा कितीही लोड असला तरीही झोप आवरता येत नाही. असं कधीतरी झालं तर ते सामान्य कारण असू शकतं. पण जर असं वारंवार होत असेल तर मात्र त्या गोष्टीकडे दुर्लक्ष न करता तात्काळ यांची कारण जाणून घेणं गरजेचं असतं. जाणून घेऊयात यामागच्या कारणांबाबत....

**कमी पाणी पिणं**

पाण्याचे आपल्या शरीरासाठी असणारे फायदे आपल्याला माहीत आहेतच. अशातच जर तुमच्या शरीरात पाण्याची कमतरता असेल तर चिडचिड आणि थकवा जाणवू लागतो. त्यामुळे तुम्हाला झोप येऊ लागते. यावर उपाय म्हणून भरपूर प्रमाणात पाणी प्यावे.

**झोप अपूर्ण राहणं**

जर तुमची झोप पूर्ण होत नसेल तरीदेखील तुम्हाला थकवा जाणवू शकतो. तुम्हाला अनेकदा असं जाणवलंही असेल की, जेव्हा तुम्ही सुट्टीवर असता. त्यानंतर पुन्हा ऑफिसमध्ये आल्यानंतर थकवा जाणवू लागतो. त्यामुळे झोपही येते. यावर उपाय म्हणून तुम्ही लवकर झोपू शकता. त्यामुळे तुमची झोप पुर्ण होईल.


**एनीमियामुळे वाढते कमजोरी**

तुम्हाला येणाऱ्या झोपेचे एक कारण एनीमियाही असतं. जेव्हा आपल्या शरीरात रेड ब्लड सेल्सची कमतरता जाणवू लागते त्यावेळी एनीमियाची लक्षणं दिसू लागतात. हे सेल्स आपल्या फुफुस्सांमार्फत शरीरात ऑक्सिजन पोहोचवण्यासाठी मदत करतात. एनीमिया आयर्न किंवा व्हिटॅमिनच्या कमतरतेमुळे होतं. त्यामुळे शरीरात थकवा जाणवू लागतो.

**डिप्रेशनमुळे उडते झोप**

जर तुम्ही डिप्रेशनमध्ये असाल तर ही तुमच्यासाठी काळजी करण्याचं कारण आहे. यामुळे तुम्ही स्वतःला कमजोर समजू लागता. सतत डिप्रशनमध्ये राहिल्याने तुम्हाला पूर्णवेळ झोप येत नाही त्यामुळे तुम्हाला सतत थकवा जाणवतो. परिणामी तुम्ही सतत थकलेले आणि कमजोर दिसू

# हळव्या मनाचे पुरुष फारच कमी सापडतात...




आपण सगळ्यांपेक्षा वेगळेच आहोत, असे लग्न झाल्यानंतर प्रत्येकालाच वाटत असते. आपणच जगात सर्वात आनंदी, सुखी आहोत आणि आपल्यात कधी भांडण होणे शक्यच नाही; पण कालांतराने दोघांचे खरे रूप समोर यायला लागते. कडू गोळी साखरेच्या मुलाम्यात लपेटलेली, आणि साखरेचा मुलामा हळू हळू संपतोच. जिभेवर रेंगाळतो तो फक्त कडवटपणाच. नाती ही अशीच असतात का? दोघांमधले सामंजस्य का संपते? ती कुठे कमी पडते? त्याला का हे सगळे सांभाळून घेता येत नाही?

खूप कमी पुरुषांमध्ये सांभाळून घेण्याची ताकद असते. हळव्या मनाचे पुरुष फार कमी सापडतात. इतरांची काळजी घेणे हा गुण त्याच पुरुषांमध्ये जास्त दिसून येतो. गमतीचा विषय म्हणजे असे पुरुष सगळ्यांचीच काळजी घेतात. त्यांना असंख्य मैत्रिणीसुद्धा असतात.

निसर्गाची कमाल म्हणा किंवा देवाची कृपा, जोड्या या परस्परविरोधीच तयार झालेल्या असतात. अती काळजी करणारी स्त्री असली की तिच्या वाट्याला नेहमी हेळसांडच येते. नवऱ्याचे दुर्लक्ष, प्रेमाचा आणि काळजीचा अभाव. तिची अपेक्षा मात्र त्याच्याकडून कायम अशीच असते की त्याने कधी तरी माझ्यासाठी काळजीचे शब्द तोंडातून काढावे; पण कितीही प्रयत्न केले तरी तो आपला निर्विकार. असेही पुरुष असतात जे घराची, मुलांची, बायकोची आपल्या सर्व कामात तडजोड करून काळजी घेत असतात. आणि त्यांच्या जोडीदाराच्या बाबतीत विचार केला तर त्या बायका ढिम्म असतात. जाऊद्या ना, तो करतोय ना, मग आपल्याला लक्ष द्यायची काय गरज? मजेची गोष्ट म्हणजे असे पुरुष सगळ्यांच्या आजारपणात स्वत:हून लक्ष देतात, काळजी घेतात. पण जेव्हा स्वत: ते आजारी पडतात तेव्हा त्यांच्या पार्टनरकडून त्यांना काळजीचा हात मिळत नाही. अति काळजी करणारी व्यक्ती स्वत:ला नेहमी सर्वगुणसंपन्न समजत असते. त्या व्यक्तीच्या मते तिला सर्वच जमत असते. अशा वेळेस समोरच्याने काही सांगितलेले त्याला पटत नसते. त्या व्यक्तीला आपल्या कार्यावर शंका घेतल्यासारखे वाटते. परिणामी या व्यक्तीचा पार्टनर अजूनच अलिप्त राहायला लागतो. नको बाबा, मी केलेले काहीच हिला /याला पटत नाही. त्याच्यापेक्षा काही न केलेले बरे आणि हा / ही दुर्लक्ष करतात म्हणून हे आपले मनातल्या मनात धुसफूस करत बसतात. तात्पर्य काळजी घेणारी व्यक्ती स्वत:च्या हातात सर्व अधिकार घेऊन बसते आणि त्याच्या अधिकारक्षेत्रात पार्टनरने केलेली लुडबूड त्याला चालत नाही. त्याला सल्ला किंवा मदत नको असते; पण सहकार्य मात्र हवे असते. अंतर्मुख होऊन विचार करून तसेच एकमेकांशी संवाद साधून अनेक प्रश्न सोडवता येऊ शकतात. पण संवाद हा केवळ संवादच असला पाहिजे, त्या संवादात एकमेकांच्या त्रुटींवर बोट ठेवताना खूप काळजीपूर्वक वागले पाहिजे. नाहीतर याचा उलट परिणाम होऊ शकतो. भारतात नाती तशी कमीच तुटतात; पण सर्वात मोठे स्वीकारण्याचे सत्य म्हणजे आपल्या भारतात दोघे एकमेकांबरोबर खूप तडजोड म्हणून किंवा घरगुती अडचणीमुळे एकमेकांच्या नुसते बरोबर राहत असतात.

# काही महिला बॉसही आपल्या हाताखालील व्यक्तीशी संबंध राखतात



कित्येक स्त्रिया प्रमोशनसाठी बॉसला रिझवतात. वेडी महत्वाकांक्षा त्याने नको ते करायला भाग पाडते. महिला बॉसही आपल्या हाताखालील व्यक्तीशी संबंध राखायला मागे-पुढे पाहात नाहीत.

स्त्री-पुरुषांची कोणत्या ना कोणत्या निमित्ताने जवळीक निर्माण झाली की त्यांच्यात नको ते आणि नको ते संबंध निर्माण होतात.


त्यातही ऑफिसमध्ये आता स्त्री-पुरुष समान पातळीवर एकमेकांत मिसळून काम करतात. दिवसभर दोघे एकमेकांच्या संबंधांत संपर्कात येतात. त्यातूनही हे कर्मचारी तरुण, अनुभवी असतील तर नको ते नाते निर्माण होते, त्याचा परिणाम चांगलाच असेल याची खात्री नसते.

जेव्हा स्त्रिया चार भिंतीत राहत होत्या. तेव्हा विवाहबाह्यसंबंधांना जास्त वाव नव्हता. परंतु त्यांची पावले बाहेर पडली व परिस्थिती पालटली. ऑफिसमधील नीरस, उबग असणाऱ्या रुटीनमध्ये स्त्रियांचे आगमन म्हणजे वाळवंटात तलाव सापडल्यासारखे झाले. मेकअप, कपडे, परफ्युम इ.नी. सजून धजून आलेल्या मुलींना पाहून बिचारे पुरुष किती वेळ विश्वामित्रासारखे समाधी लावून बसणार आहेत. ऑफिसमध्ये हास्यविनोद, चेष्टामस्करी, एकत्र चहा-कॉफी घेणे, कधी ट्रीट देणे तर कधी घेणे, असा हलका, फुलका रोमान्स कधी गंभीर होतो हे कोणालाच समजत नाही.

घटस्फोटाच्या वाढत्या केसेस, वैवाहिक संबंधात वाढता दुरावा याला बऱ्याच प्रमाणात ऑफिस रोमान्सच कारणीभूत आहे. एका अमेरिकन वेबसाईटने आपल्या सर्व्हेत असे सांगितले की, अशा रोमान्सचा परिणाम त्यांच्या कार्यक्षमतेवर नकारात्मक होतो. कंपनीच्या व व्यक्तीच्या करिअरवर होतो. कारण हे प्रेम खरे नसून मुदतीचा ताप आहे. ऑफिस रोमान्सने काय घडते याचे उदाहरण म्हणजे अमेरिकन माजी राष्ट्रपती क्लिंटन, ऑफिस रोमान्सने त्याची प्रतिमा धुळीला मिळवली.

ऑफिस रोमान्स केल्यास पुरुषांनाही आज स्त्रियांएवढाच नव्हे तर त्यापेक्षा जास्त धोका असू शकतो. काही कारणाने प्रेयसी बिघडली, तर ती महिला आयोगासारख्या इतर अनेक संस्थांना ॲप्रोच करुन लैंगिक शोषणासारखा आरोप करुन प्रियकराला तुरुंगात पाठवू शकते. खरे तर प्रत्येक कंपनीत याबाबत रुल्स व रेग्यूलेशन असावेत की, या गोष्टी ऑफिसात चालणार नाहीत. कंपनी कायदा लक्षात घेऊन चालते. अशा रोमान्सचा त्यावर घातक परिणाम होतो. प्लॅटोनिक लव्ह आणि शारीरिक प्रेमसंबंधातील अंतर कधी संपते हे सांगता येत नाही. रोमान्सच्या नावाखाली कधी काय होते हे आज सारे जग पाहत आहे. स्त्रीला अश्लीलतेला सामोरे जावे लागू शकते. कॉस्टिंग काऊचची स्थिती असू शकते. ज्यात तीच दोषी असते, पण मॅनेजमेंट इच्छा असूनही पुरुषाला वाचवू शकत नाही. कारण सहानुभूती स्त्रियांच्या बाजूने असते. अशावेळी पुरुषांचेच करिअर बरबाद होऊ शकते.

# नखे कुरतडण्याच्या सवयीमुळे होऊ शकतो तुमच्या जीवाला धोका



बऱ्याचदा आपल्या नकळत आपला हात तोंडात जातो आणि आपण नखं खावू लागतो. एखाद्या मिटींगमध्ये, विचारात असताना अनावधानाने आपण नखं दाताने कुरतडू लागतो. पण तुम्हाला माहित आहे का? या सवयीमुळे आपण आजारी पडू शकतो. आपल्या नखांमध्ये अनेक प्रकारचे धोकादायक बॅक्टेरिया असतात. त्यांची लागण झाल्यास तुम्ही सहज आजारी पाडू शकतात. तुम्हालाही अशी सवय असेल तर जाणून घ्या तुमच्या या सवयीमुळे तुम्ही कोणत्या आजारांना आमंत्रण देत आहात.

**हाताच्या बोटांपेक्षाही नखांमध्ये जास्त असतात बॅक्टेरिया**

आपल्या नखांमध्ये साल्मोनेला आणि ई कोलाई यांसारखे आजार पसरवणारे बॅक्टेरिया असतात. दातांनी आपण जेव्हा नखे कुरतडतो. त्यावेळी हे बॅक्टेरिया आपल्या तोंडात जातात. नखे खाण्याच्या या सवयीवर अनेक संशोधने झाली आहेत.

**स्कीन प्रॉब्लेम्स** : नखे खाण्यामुळे त्याच्या आजूबाजूला असलेले स्कीनचे सेल्स डॅमेज होतात. त्यामुळे पॅरोनेशियासारखा आजार होण्याचा धोका संभवतो. यामुळे नखांच्या आजूबाजूच्या त्वचेला इन्फेक्शन होते. सारखी नखे खाल्याने डर्मेटोफेजियासारखे आजार होण्याचाही धोका असतो. यामध्ये त्वचेवर जखमा होतात, तसेच या इन्फेक्शनमुळे शरिरातील नसांनाही नुकसान पोहोचते.

**तणावाचे कारण**

एका संशोधनातून असे सिद्ध झाले आहे की, जास्त नखे खाणारी माणसे जास्त तणावात असतात. बऱ्याचदा तणाव वाढल्याने ते नखे खात खात आपल्याच जगात हरवून जातात. कालांतराने एकटे एकटे राहू लागतात.

**कॅन्सरचा धोका :** सारखी नखे खाल्याने आतड्यांचा कॅन्सर होण्याचा धोका अधिक असतो. नखांमध्ये असणारे बॅक्टेरिया तोंडातून आतड्यांमध्ये जातात आणि कॅन्सरचा धोका वाढतो.

**दातांना नुकसान** : नखे खाल्याने दातांनाही नुकसान पोहचते.

# फ्रीजमध्ये कोणते पदार्थ किती वेळ ठेवावेत?



आजच्या घाईगडबडीच्या जीवनात ताजे अन्न खाणे शक्य नाही. बहुतेक काम करणारे लोक वेळ वाचवण्यासाठी फ्रीजमध्ये बनवलेले अन्न साठवतात. मात्र फ्रिजमध्ये बराच काळ ठेवलेले हे अन्न तुमचे आरोग्यही खराब करू शकते. फ्रीजमध्ये ठेवलेले अन्न आपण किती तासांनंतरही खाऊ शकतो आणि कोणता पदार्थ किती वेळ फ्रीजमध्ये ठेवून आपण वापरू शकतो हे आज जाणून घेऊया.


फ्रिजमध्ये ठेवलेला भात २ दिवसात खाऊन घ्यावा, अन्यथा तो खराब होतो. फ्रिजमध्ये ठेवलेला भात खाण्यापूर्वी चांगला गरम करुन घ्या आणि त्यानंतरच खा.

जर तुम्ही गव्हाची चपाती फ्रीजमध्ये ठेवत असाल तर चपाती बनवल्यानंतर १२ ते १४ तासांच्या आत खाणे तुमच्या आरोग्यासाठी चांगले आहे. जर चपाती वेळेत खाल्ली नाही तर त्यातील पोषणतत्वे नष्ट होतात. तसेच ती चपाती तुमच्या पोटदुखीचे कारण बनू शकते.

जर जेवणातील डाळ शिल्लक राहिली तर तर तुम्ही ती फ्रिजमध्ये ठेवू शकता. आणि डाळ फ्रीज ठेवली असेल तर तुम्ही ती डाळ २ दिवसांच्या आत खावी. कारण फ्रिजमध्ये २ दिवसांपेक्षा जास्त काळ ठेवलेली डाळ खाल्ल्याने पोटात गॅस होऊ शकतो. कधीकधी आपण कापलेली फळे उरली तर ती फळे आपण फ्रीजमध्ये ठेवतो. पण ही फळे ४ तासांच्या आत खावीत कारण त्या नंतर ती फळं खराब होऊ शकतात.

केळी हे असे फळ आहे की तुम्ही ते कधीही फ्रीजमध्ये ठेवू नये. फ्रिजमध्ये केळी ठेवल्यास त्वरीत काळी पडते. केळी फ्रिजमध्ये ठेवल्याने त्यातून इथिलीन गॅस सोडला जातो. ज्यामुळे फ्रिजमध्ये असलेले इतर फळे देखील लवकर पिकतात. म्हणून केळी कधीही फ्रीजमध्ये ठेवू नये.

# नव्याने प्रेमात पडला असाल तर पार्टनरसोबत बोलताना घ्या काळजी



प्रेमाच पडणं ही या जगातली सर्वात सुंदर भावना असावी. जेव्हा एखादा व्यक्ती कुणाच्या प्रेमात असतो तेव्हा त्या व्यक्तीची काळजी घेणे हे साहजिकच आलं. पण प्रेम जर नवंनवं असेल तर अनेक गोष्टीं उत्साहाच्या भरात बोलल्या आणि केल्या जातात. प्रेमात असलेले लोक एक वेगळ्याच विश्वात रमत असतात. पण काही कपल्स हे ऐकमेकांशी बोलताना कशाचाही विचार न करता काहीही बोलतात. याचा प्रभाव तुमच्या नात्यावर होतो. त्यामुळे एकमेकांसोबत बोलताना काही गोष्टींची काळजी घेणे फार महत्त्वाचे आहे. चला जाणून घेऊया काय आहेत त्या गोष्टी...

**नात्याबाबत इमानदार रहा**

नवीन नात्यात बातचीत होत असताना जास्तीत जास्त प्रश्न हे पर्सनल गोष्टींबाबत असतात. या प्रश्नांची उत्तरं इमानदारीने द्यावी, जेणेकरून तुमचा/तुमची पार्टनर तुम्हाला योग्यप्रकारे समजू शकेल. जर तुम्ही एखाद्या गोष्टीविषयी खोटं सांगितलं आणि ती बाब तुमच्या पार्टनरला बाहेरून कळाली तर त्याला वाईट वाटू शकतं. याने त्याच्या मनात तुमच्याविषची चुकीची धारणा निर्माण होऊ शकते. जर तुम्ही तुमच्यातील एखादी वाईट गोष्ट किंवा तुमची वाईट सवय आधीच पार्टनरला स्वत:हून सांगितली तर कदाचित तुमच्यावरील पार्टनरचा विश्वास वाढू शकतो.

**गंमतीतही तुलना करु नका**

कधी कधी गंमतीत किंवा रागात काही लोक आपल्या पार्टनरची तुलना दुसऱ्याच्या पार्टनरसोबत किंवा एक्ससोबत करतात. पण कुणालाही त्यांची तुलना इतरांशी केलेली पसंत पडणार नाही. अशाप्रकारे तुलना केल्यास तुमचं नातं अडचणीत येऊ शकतं.

**प्रेमाचा पुरावा मागू नका**

नातं नवीन असताना अनेकदा काही लोक आपल्या पार्टनरकडे प्रेमाचा पुरावा मागतात. यावर पुरावा म्हणून मिळणाऱ्या उत्तराने भलेही तुम्हाला काहीवेळ बरं वाटत असेल, पण ही गोष्ट पुढे जाऊन पार्टनरला इरिटेट करणारी ठरु शकते. प्रेम ही अनुभवण्याची गोष्ट आहे त्यामुळे त्याचा पुरावा मागणं तुम्हाला अडचणीत आणू शकतं. प्रेम असेल तर ते तुम्हाला दिसेलच पुरावा मागण्याची गरज नाही.

**विनाकारणचे प्रश्न विचारु नका**

प्रेमात अधिकाराची भावना असते. या भावनेने प्रेरित होऊन अनेकदा काही लोक आपल्या पार्टनरच्या खाजगी आयुष्यात लुडबूड करतात. हे तुमच्या पार्टनरला अजिबात आवडणारं नसतं. त्यामुळे असे प्रश्न विचारूच नये जे तुमच्या पार्टनरला पसंत नाहीयते किंवा त्यांची उत्तरं देताना त्यांना अवघडल्यासारखं होत असेल.

■■■

# चेहऱ्यावरील सुरकुत्या घालविण्याचे घरगुती उपाय



तुमच्या चेहऱ्यावर अवेळीच सुरकुत्या आल्यात का ? किंवा चेहऱ्यावर डाग, पुरळ आली असल्यास घाबरून जाऊ नका. आम्ही तुम्हाला सांगतो काही नैसर्गिक उपाय. ज्यामुळे तुमच्या चेहऱ्यावर आलेल्या अवकाळी सुरकुत्या देखील नष्ट होतील शिवाय, तुमच्या चेहऱ्यावरील तेजदेखील वाढेल.

**चंदन :** चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवण्याचा रामबाण उपाय म्हणजे चंदन. याचा लेप लावल्यामुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या नाहीशा होतात. यातील ॲन्टीबॅक्टेरीयल तत्त्व चेहऱ्यावर परिणाम करणारी बॅक्टेरीया नष्ट करून चेहरा उजळ बनवतात. याच्या लेपनामुळे चेहऱ्यावरील तेलग्रंथी कमी करण्यास मदत करतात.

**संत्र्याची साल :** यातील ' क ' जीवनसत्त्व, पोटॅशिअम आणि कॅलशिअम चेहऱ्यावरील ब्लॅकहेड, मृत पेशी, पुरळ काढून टाकतात.

**मुलतानी माती :** याचे लेपन चेहऱ्यावरील पुरळ घालवून चेहऱ्याचा उजळ होतो.

**लिंबू पाणी :** लिंबू पाण्याने चेहरा धुतल्यास चेहऱ्यावरील मृत पेशी तसेच सर्व प्रकारचे डाग नाहीसे होऊन चेहरा नितळ होतो. यातील ॲसिडने चेहऱ्यावरील ऑईल बॅलेन्स करतो.

**कोरफड :** कोरफडीमुळे चेहऱ्यावरील मॉईश्चर वाढते, चेहरा साफ बनतो. तसेच चेहरा स्मूथ होऊन त्वचा लवचिक बनते.

## छान छान गोष्टी...

# फक्त उद्याचा विचार करणे मूर्खपणाचे

एका नगरात एक धनाढ्य शेठ राहत होता. तो दिवसभर खूप कष्ट करीत असे. एक दिवस त्याला काय वाटले कोणास ठाऊक. त्याने आपल्या मुनिमाला बोलावले आणि विचारले, 'आपल्याकडे किती पैसा आहे आणि तो कधीपर्यंत पुरेल, याची माहिती काढून द्या.

काही दिवस हिशेब करुन मुनिम आला आणि त्याने सांगितले, 'शेठजी, ज्या प्रमाणात आज आपण खर्च करीत आहोत; त्याप्रमाणे खर्च होत राहिला, तर आपल्या सात पिढ्यांना पुरेल एवढा पैसा आपल्याकडे सध्या आहे. शेठजी हादरले. त्यांनी विचारले, 'अहो, तर मग आठव्या पिढीचे काय होईल?' शेठजी विचार करु लागले, त्यांच्या डोक्यात ताण वाढला. त्यामुळे ते आजारी पडले. खूप उपचार केले गेले. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. एक दिवस शेठजींचा एक मित्र त्यांची विचारपूस करण्यासाठी आला. शेठजी म्हणाले, एवढा पैसा कमावला. पण, तरीही आठव्या पिढीसाठी काहीच उरत नाही रे.'

मित्र म्हणून इथून जवळच एक पंडितजी राहतात. त्यांना तू जर सकाळी खायला दिलेस, तर तुझी ही व्याधी बरी होईल.

दुसऱ्याच दिवशी सकाळी शेठजी खाद्यपदार्थ घेऊन पंडितजींकडे गेले. पंडितजींनी त्यांना आदराने बसविले. नंतर आपल्या पत्नीला हाक मारुन सांगितले, 'शेठजी, खाद्यपदार्थ घेऊन आले आहेत.'

यावर पंडितजींची पत्नी म्हणाली, 'कोणीतरी आजचे जेवण देऊन गेले आहे.'

ते ऐकून पंडितजी शेठजींना म्हणाले, 'शेठजी माफ करा. मी तुमचे पदार्थ घेऊ शकत नाही. कारण, आजचे खाणे कोणीतरी देऊन गेले आहे. सकाळी जो आम्हाला सर्वप्रथम पदार्थ देतो तेच आम्ही स्वीकारतो.' यावर शेठजी म्हणाले, 'तर मग उद्यासाठी काय आणू ?'

पंडितजी म्हणाले, 'आम्ही उद्याचा विचार करीत नसतो. उद्याचा दिवस उगवेल तेव्हा देव आपोआप पाठवून देईल.

शेठजी घराकडे परतले. वाटेत चालताना ते विचार करीत होते की, हा कसा माणूस आहे. याला उद्याची अजिबातच चिंता नाही आणि मी माझ्या आठव्या पिढीची चिंता करीत रडतो आहे. त्यांचे डोळे उघडले. त्यांनी चिंता करणे सोडून दिले.

**तात्पर्य :** उद्याच्या चिंतेपायी आजचा दिवस खराब करु नये. माणूस वर्तमानात जगला, तरच त्याचे जीवन सुखी होते.

# हिंमत टिकून राहण्यासाठी खालील सल्ला आजमावून पहा...



बऱ्याचदा महिला एखादे ध्येय गाठण्यात अयशस्वी होतात तेव्हा गळून जातात व डिप्रेशनने वेढल्या जातात. पुन्हा प्रयत्न केल्यास आपण यशस्वी होऊ शकतो हे त्यांनी लक्षात घ्यायला हवे. अपयश आपला आत्मविश्वास डळमळीत करते, पण आपण हिंमत राखायला हवी. हिंमत टिकून राहण्यासाठी खालील सल्ला आजमावून पहा...

★ अपयश येईल, तेव्हा सर्वप्रथम स्वत:ला भावनिकदृष्ट्या कमकुवत होऊ देऊ नका, स्व:ला नशिबाच्या हवाली सोडू नका. प्रत्येकजण स्वप्ने पाहत असतो, पण ती सर्व खरी होतातच असे नाही. स्वप्नांचा महाल जरी कोसळला तरी तो पुन्हा उभा करता येतो, पण त्यासाठी आपण हिंमत हरु नये.

★ आपले लक्ष रचनात्मक कार्यात गुंतवावे. उदा. काही लिहिण्याचा प्रयत्न करावा. लेखन हे आपल्या भावना व्यक्त करण्याचे सर्वश्रेष्ठ माध्यम आहे.

★ घरी कधीही एकट्या राहणार नाही असा प्रयत्न करा. त्यामुळे भीती वाढते. जर निरुपाय असेल तर घरातील किरकोळ कामे करत मैत्रिणींशी गप्पा मारत राहा, नाही तर शॉपिंगसाठी बाहेर पडा, यामुळे मन हलके राहील.

★ जर आपण थोड्या पक्क्या व मजबूत मनाच्या असाल तर लवकरच या दु:खातून बाहेर पडाल. काळ जखमा भरत असतो यासाठी थोडा संयम बाळगा.

★ स्वत:वर विश्वास राखा, एक स्वप्न भंग पावले म्हणजे आपण स्वप्न पाहणेच सोडावे असे अजिबात नाही. आत्मविश्वास हीच यशाची किल्ली आहे.

# गर्लफ्रेंडमध्ये ही लक्षणे दिसू लागताच समजून घ्या की नात्यात होतेय तुमची फसवणूक

आजकाल काही नाती फार काळ टिकत नाहीत. कारण ते खोटेपणा आणि फसवणुकीच्या पायावर विसावलेले आहेत. अशा परिस्थितीत जेव्हा तुमचा पार्टनर तुमचा विश्वास दुखावतो तेव्हा तुम्हाला तुटल्यासारखे वाटते. अनेकदा असे दिसून येते की काही मुली रिलेशनशिपमध्ये असतानाही फसवणूक करत राहतात, ज्याची मुलांना माहितीही नसते.

जोडीदार किती प्रामाणिक आहे याचा अंदाज बांधणे फार कठीण होऊन बसते. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला तुमच्या मैत्रिणीबद्दल शंका असेल, तर काही मार्ग आहेत ज्याद्वारे तुम्ही तिची फसवणूक समजून घेऊ शकता. आज आम्ही तुम्हाला तुमच्या गर्लफ्रेंडच्या काही लक्षणांबद्दल सांगणार आहोत जे ती फसवणूक करत असल्याचे दर्शविते.

**जेव्हा तुम्ही ऑफिस किंवा कॉलेजपासून गोष्टी लपवता**

जेव्हा तुम्ही वेगवेगळ्या ऑफिसमध्ये किंवा कॉलेजमध्ये असता तेव्हा तुम्हाला रोज नवीन लोकं, बोलणं आणि इव्हेंट्स भेटायला मिळतात. ज्याबद्दल तुम्ही एकमेकांशी चर्चा करता. पण, अनेकदा असं होतं की तुमची मैत्रीण तुम्हाला काहीच सांगत नाही. या व्यतिरिक्त, कधीकधी वैयक्तिक गोष्टी देखील एकमेकांशी शेअर केल्या जात नाहीत आणि तुमचे नाते फक्त हँग आउट आणि एकत्र चित्रपट पाहण्यापुरते मर्यादित आहे, अशा परिस्थितीत तुम्ही थोडे सावध राहणे आवश्यक आहे.



**पैसे खर्च करा**

बरेचदा लोक फायद्यासाठी नातेसंबंध जोडतात. अशा रिलेशनशिपमध्ये पार्टनर तुमच्यावर प्रेम करत नाही तर फक्त तुमचा फायदा घेतो.जर तो तुम्हाला त्याच्या समस्यांबद्दल सांगतो आणि वारंवार पैशाची मागणी करू लागला, तर तुम्ही समजून घेतले पाहिजे की तो फक्त त्याच्या स्वतःच्या गरजांसाठी तुमचा फायदा घेत आहे.

**काही तासांपर्यंत कोणतीही माहिती न देता गायब होणे हे**

एक मोठे लक्षण असू शकते की तुमची मैत्रीण तुमची फसवणूक करत आहे. जर तुम्ही त्याला कॉल केला किंवा मेसेज केला आणि काही तास प्रतिसाद मिळाला नाही तर तुमच्यासाठी समस्या असू शकते. जर हे एकदा किंवा दोनदा घडले तर ते ठीक आहे, परंतु जर ते आठवड्यातून अनेक वेळा घडत असेल आणि तो नेहमी म्हणत असेल की त्याचा फोन बंद आहे तर सावध होणे गरजेचे आहे.

**जेव्हा कोणी तुमच्या भावना समजून घेत नाही**

कधी कधी तुम्ही अडचणीत असता तेव्हा तुमच्या भावना व्यक्त करण्यासाठी तुमच्या प्रेयसीशिवाय तुमच्याकडे कोणी नसते. पण जेव्हा तुम्ही तुमचे विचार तिच्याशी शेअर करता तेव्हा ती त्यात रस दाखवत नाही. जर तुमची मैत्रीण देखील तुमच्या भावना समजत नसेल तर ती तुमच्याशी मनापासून जोडलेली नसण्याची शक्यता आहे. ती भविष्यात तुमच्यापासून दूर जाऊ शकते.

**जोडीदाराबद्दल कोणत्याही तिसऱ्या व्यक्तीला गोष्टी सांगणे**

अनेकदा असे दिसून आले आहे की जे आपल्या नात्यात आनंदी आहेत ते आपल्या जोडीदाराबद्दल कोणत्याही तिसऱ्या व्यक्तीला सांगण्यास मागेपुढे पाहत नाहीत. पण काही नाती अशी असतात जी टाइमपास करतात, ज्यामध्ये व्यक्ती आपल्या जोडीदाराचे अस्तित्व लपवू लागते. जर तुमची मैत्रीण असे वारंवार करत असेल तर समजून घ्या की काहीतरी चुकीचे आहे.

**तुमच्या मित्रांपासून दूर जात असेल**

तुमच्या मित्रांनाही तेच लागू होते जरी तिने मागच्या वेळी तुमच्या मित्रांसोबत ग्रुप पिकनिकला जाण्याचा आनंद घेतला होता, जर तिला अचानक त्यांच्यासोबत हँग आउट करायला कमी आवडू लागले, तर असे होऊ शकते कारण तिला स्वतःची इच्छा आहे. स्वतःला तुझ्यापासून दूर ठेवण्यासाठी. जर ती तुमची फसवणूक करत असेल, तर तिला असे वाटू शकते की ती तुमच्या सामाजिक वर्तुळात येण्यास पात्र नाही किंवा तुमचे नाते खराब होण्याआधी तिने तुमच्यासोबत किती मजा केली याची तिला आठवण करून द्यायची नाही.

## किचन स्वच्छ ठेवण्यासाठी सोपे टिप्स

रोज घर किंवा किचन स्वच्छ करायला आजकालच्या बायांना मुळीच वेळ नसतो. जर आपण एक बिझी आई किंवा गृहिणी आहात तर हे सोपे उपाय अमलात आणून आपले किचन चकचकीत करा:

**कॅबिनेट्स :** कॅबिनेट्सवर लागलेले तेलाचे डाग ऑलिव्ह ऑयलने स्वच्छ करा. टिशू पेपरवर ऑलिव्ह ऑयलचे काही थेंब घेऊन तेलाचे डाग मिटवा.

**फ्रीज :** फ्रीजच दार उकळलेल्या बटाट्याचा सालांनी स्वच्छ केले जाऊ शकतात.

**डाइनिंग टेबल :** डाइनिंग टेबलाला स्वच्छ करण्यासाठी नीलगिरीचे तेल कामास घ्या. जर टेबलाहून दुर्गंध येत असेल तर एखाद्या कापडावर नीलगिरी तेलाचे काही थेंब टाकून त्याने पुसून घ्या.

**डस्टबिन :** किचनमध्ये जिथे डस्टबिन ठेवत असाल ती जागा नियमितपणे फेनिल टाकून स्वच्छ करायला हवी कारण सर्वात जास्त घाण तिथेच जमते आणि अशाने बॅक्टीरिया पसरतात. किचनमध्ये नेहमी झाकण असलेले डस्टबिन वापरा.

**खिडकी आणि दार :** किचनची काचेची खिडकी आणि दार घाण झाले असल्यास गरम पाण्यात पेपर बुडवून त्याने काच स्वच्छ करा. याने माती आणि चिकट डाग आरामात स्वच्छ होऊन जातात.

# लग्नानंतर मुली 'या' अडचणींमुळे चिंतेत असतात

लग्नाचा सर्वात जास्त परिणाम मुलींवर होतो. कारण त्यांचं संपूर्ण आयुष्यच बदलून जातं. ज्यामध्ये घर बदलण्यापासून ते कुटुंब, नातेसंबंध, जबाबदाऱ्या या सर्व गोष्टींचा समावेश असतो. अशा परिस्थितीत लग्नासाठी मुलींवर खूप दबाव असतो. तसं, लग्नापूर्वी मुलीला अनेक नियम सांगितले जातात. पण अशा काही गोष्टी आहेत ज्या कोणत्याही नवविवाहित जोडप्याचं मन अस्वस्थ करू शकतात. त्यातील एक म्हणजे सासरच्या घरातील सदस्यांना कसं संबोधावं. तसं, नवऱ्याच्या नातेसंबंधानुसार, नवीन वधूला वागावं लागतं. पण नवरीकडून अपेक्षा असते की तिने अगदी लहान्यांना सुद्धा खूप घाबरून वागावं. अशा वेळी योग्य माहिती नसल्यामुळे मुलींकडून चुका होतात.



सुरुवातीला तुम्हाला या सर्व गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील. तुमच्या आवडीच्या नसलेल्या काही गोष्टीही तुम्हाला कराव्या लागतील. सून म्हणून तुमच्यावर अनेक जबाबदाऱ्या असू शकतात.

लग्नाच्या रिती रिवाज पूर्ण करताना नवरा नवरीची खूप दमछाक होते. अशा स्थितीत लग्नाच्या दुसऱ्या दिवशी दुपारी गाढ झोपून घ्यावं, अशीही त्यांची मानसिकता असते. पण नवोदितांमध्ये तिला घरातील नवीन सदस्य म्हणून झोपावं की नाही, अशी भीती वाटत असते.

सामान्यतः दररोज कोणीही नववधूचे इतके जड दागिने आणि भरजरी कपडे घालत नाही. पण दागिने आणि जड वस्त्रे घालून नववधू म्हणून किती दिवस जगावं लागेल, असा प्रश्न वधूच्या मनात कायम असतं. अशा स्थितीत तिला या सगळ्यातून कधी मुक्ती मिळेल, असा विचार तिच्या मनात येत असतो.

म्हाला तुमच्या पतीसोबत राहण्यासाठी, त्याचे वागणे आणि मार्ग समजून घेण्यासाठी वेळ लागतो. तुमच्या दोघांचे व्यक्तिमत्त्व आणि आवडीनिवडी जुळत नसतील, पण तुम्हाला त्यांच्याशी जुळवून घ्यावे लागेल.

# मसाजमुळे तारूण्य सळसळते राखण्यास मदत होते

मसाज हे योगाचे अखेरचे आठवे सूत्र. शरीराच घर्षण विधीलाच मसाज म्हणतात. मसाजामुळे शरीरातील पेशींचे योग्य पोषण व व्यायाम होतो व त्या सक्रिय राहून तारूण्य सळसळते राखण्यास मदत होते.

मसाजाद्वारे शरीराची मज्जा प्रणाली व रक्ताभिसरण सक्रिय राहते. स्नायू व बाहम्यत्वचेतील शिरांमध्ये ताण निर्माण होऊन शिरा ताणल्यामुळे शरीराच्या बाह्य भागाकडे रक्तप्रवाह वाढतो. मसाजाचा सर्वाधिक परिणाम त्वचेवर होतो. घर्षणाद्वारे त्वचेची रोमछिद्रे उघडून त्वचेतील दूषित पदार्थ बाहेर काढळ्यामुळे शरीर विषरहित होऊन निरोगी होऊ लागते. संपूर्ण शरीराला रोज तेल लावणे पुष्टीकरण समजले जाते. विशेषत: डोक्यात व कानात तेल सोडणे लाभदायक मानले जाते. मोहरीचे तेल अग्निसंयोगाने, संगंधित पदार्थाचे काढलेले तेल, चंपा, चमेली, जुई, इ. फुलांनी सुगंधित केलेले तेल शरीराचे तारूण्य उजळण्यात तिशय साहाय्यक असते.



आयुर्वेदात तुमाचा मसाज सर्वोत्तम मानला गेला आहे. तसा खोबरेल तेलाचा मसाजही उपयुक्त असतो. वातविकृती तेलाचा मसाजही उपयुक्त असतो. वातविकृती दूर करण्यासाठी व पोटाच्या व्याधीतही मसाज महत्वाचा आहे. अनेक प्रकारच्या सूज व इतर विकृतीही मसाजाद्वारे नाहीशी करता येतात.

स्त्रियांना त्यांची योनी, गर्भाशय व मासिक पाळीचे त्रासही मसाजाद्वारे दूर करता येऊ शकतात. वक्ष अविकसित ओघळलेले) राहील्यास जैतून तेलाच्या मसाजाने फायदा होतो. ज्या स्त्रिया तेल वा तुपाने नियमितपणे वक्षांची (स्तनांची) खालून वरच्या दिशेने मसाज करतात त्यांचे वक्ष कधीही ओघळत नाहीत. मसाजाचा आरंभ कसा व कोणत्या अवयवापासून करावा हाही महत्वाचा भाग आहे. तेल वा तुपात भिजवलेल्या हातांच्या बोटांनी हळूवार चोळत छातीपासून मसाज सुरु करावा. कारण हा भाग शरीराच्या केंद्रस्थानी असतो व अग्नि वा उर्जाही याच भागात असते. या भागाचा मसाच व्यवस्थित करायला हवा. कंबरेच्या वर छातीचा व कंबरेखाली पायाकडे मसाज करायला हवा. हिवाळ्यात उन्हात बसून शरीराचा मसाज केल्यास शरीराची चमक वाढते. मसाज करताना काही गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात. मसाज करण्याची जागा हवेशीर मोकळी असावी. मसाजानंतर लगेच वातानुकूलित खोलीत वा पंख्याखाली जाऊ नये. मसाचानंतर लगेच स्नान करू नये. किमान तासभराने शरीर चोळून स्नान करावे.

मसाजानंतर त्वरित पाणी पिऊ नये, परंतु मूत्र त्याग केल्यास शरीरातील विकार बाहेर पडतात.

# वयाच्या ५० व्या वर्षीही दिसाल २० वर्षांचे तरूण

चेहऱ्यावरील सुरकुत्या वाढत्या वयाचे आणि ताणतणावाचे प्रमुख लक्षण असतात. वयोमानाप्रमाणे त्वचेची लवचिकता कमी होते आणि त्यामुळे सुरकुत्या दिसू लागतात. मात्र, योग्य त्वचेची काळजी घेतल्यास आणि काही नैसर्गिक उपायांचा अवलंब केल्यास सुरकुत्या कमी करता येऊ शकतात.

बाजारात महागडी उत्पादने आणि उपचार उपलब्ध असले तरी, घरगुती उपाय अधिक सुरक्षित आणि प्रभावी ठरतात. या लेखात आपण काही सोपे आणि प्रभावी घरगुती उपाय पाहणार आहोत ज्यामुळे चेहऱ्यांरील सुरकुत्या कमी होण्यास मदत होईल.



**बदाम तेलाचा वापर**

बदाम तेलात विटामिन ई मोठ्या प्रमाणात असते, जे त्वचेसाठी अत्यंत उपयुक्त आहे. बदाम तेल त्वचेला मऊ करते आणि तिला हायड्रेटेड ठेवते. रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्यावर बदाम तेल हलक्या हाताने मसाज करा. यामुळे त्वचेची लवचिकता वाढते आणि सुरकुत्या कमी होतात. नियमित वापर केल्यास त्वचा अधिक ताजेतवाने आणि तरुण दिसू लागते.

**केळीचा फेस पॅक**

केळीमध्ये नैसर्गिक अँटीऑक्सिडंट्स आणि पोषणतत्त्वे असतात, जे त्वचेला पोषण देतात. एक पिकलेली केळी मॅश करून त्यात एक चमचा मध मिसळा. हा फेस पॅक चेहऱ्यावर लावून १५-२० मिनिटे ठेवा आणि नंतर कोमट पाण्याने स्वच्छ धुवा. या पॅकचा नियमित वापर त्वचेला उजळवतो आणि सुरकुत्या कमी करतो.

**दूध आणि मधाचा उपयोग**

दुध आणि मध त्वचेला आर्द्रता प्रदान करतात आणि ती मऊ करतात. दोन चमचे दुधात एक चमचा मध मिसळून चेहऱ्यावर लावा. १५ मिनिटांनी पाण्याने धुवा. हा उपाय आठवड्यातून दोनदा केल्यास त्वचेला आवश्यक पोषण मिळते आणि सुरकुत्या कमी होण्यास मदत होते.

**नारळ तेल आणि लिंबाचा रस**

नारळ तेलात अँटीऑक्सिडंट्स आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात. यामुळे त्वचेला आवश्यक पोषण मिळते. दोन चमचे नारळ तेलात अर्धा चमचा लिंबाचा रस मिसळा आणि चेहऱ्यावर लावा. १०-१५ मिनिटांनी चेहरा धुवा. हा उपाय नियमित केल्यास त्वचेला लवचिकता येते आणि सुरकुत्या कमी होतात.

**पपईचा फेस पॅक**

पपईमध्ये पपेन एंझाइम असते, जे त्वचेची मृत पेशी काढून टाकते आणि त्वचा उजळवते. एक तुकडा पपई मॅश करून त्यात एक चमचा मध मिसळा. हा पॅक चेहऱ्यावर लावून २० मिनिटे ठेवा आणि नंतर धुवा. यामुळे त्वचेला स्वच्छता आणि उजळपणा मिळतो.

चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करण्यासाठी घरगुती उपाय सहज आणि सुरक्षित असतात. नियमित त्वचेची काळजी घेऊन आणि योग्य आहाराचा अवलंब करून सुरकुत्या टाळता येऊ शकतात. वर दिलेल्या उपायांचा नियमित वापर केल्यास त्वचेला नैसर्गिक चमक येते आणि वयस्करपणाची लक्षणे लांबवता येतात.

# चेहऱ्यावर स्टीम घेताना या चुका करू नका

चेहऱ्यावर स्टीम घेताना काही चुका झाल्यामुळे त्वचेचे नुकसान होऊ शकते. यामुळे त्वचा कोरडी होते, ज्यामुळे चेहऱ्यावर सुरकुत्या पडण्याची समस्या उद्भवू शकते. जर स्टीम घेण्याची पद्धत योग्य नसेल तर त्यामुळे मुरुमांची समस्या देखील होऊ शकते. त्यामुळे त्वचेच्या अनेक समस्या वाढतात. जाणून घ्या सविस्तर



चेहऱ्यावर स्टीम घेताना काही चुका झाल्यामुळे त्वचेचे नुकसान होऊ शकते. यामुळे त्वचा कोरडी होते, ज्यामुळे चेहऱ्यावर सुरकुत्या पडण्याची समस्या उद्भवू शकते. जर स्टीम घेण्याची पद्धत योग्य नसेल तर त्यामुळे मुरुमांची समस्या देखील होऊ शकते. त्यामुळे त्वचेच्या अनेक समस्या वाढतात.

**चेहरा धुवून घ्या :** चेहऱ्यावर स्टीम घेण्यापूर्वी चेहरा पूर्णपणे धुणे आवश्यक आहे. जर चेहरा स्वच्छ नसेल तर छिद्र उघडल्यावर घाण बाहेर पडू शकत नाही आणि त्यामुळे मुरुमांची समस्या उद्भवू शकते.

**खूप जवळून स्टीम घेऊ नका :** स्टीम खूप जवळून घेतल्याने त्वचेचं नुकसान होऊ शकतं. यामुळे त्वचा जळू शकते. स्टीम घेताना चेहरा पाण्याच्या जास्त जवळ घेऊ नका.

**एकाच वेळी खूप साहित्य टाकू नका :** पाण्यात अनेक प्रकारचे इंग्रेडिएंट्स एकाच वेळी टाकून स्टीम घेऊ नका. त्याच वेळी, हे लक्षात ठेवा की, स्टीम घेण्यासाठी स्टीलचे भांडे निवडा, ॲल्युमिनियम नाही. स्टीमरमध्ये इंग्रेडिएंट्स टाकल्याने स्टीमर खराब होऊ शकतो.

**स्टीमर साफ न करणे :** स्टीमर नियमितपणे स्वच्छ करणे देखील महत्त्वाचे आहे. घाण पाण्याची स्टीम घेतल्याने त्वचेच्या समस्या उद्भवू शकतात.

**मॉइश्चरायझर जरूर वापरा :** स्टीम घेतल्यावर चेहऱ्याला मॉइश्चरायझ न केल्याने त्वचा कोरडी होऊ शकते. त्यामुळे त्वचेला हायड्रेशन मिळत नाही. त्वचेतील आर्द्रता कमी होते आणि चेहऱ्यावर सुरकुत्या पडण्याची समस्या उद्भवू शकते. स्टीम घेतल्यानंतर चेहरा चांगला कोरडा करा आणि मॉइश्चरायझर लावा.

# ... तर नखे मजबूत ठेवण्यासाठी अवलंबा 'हे' घरगुती उपाय

शरीरात पोषक तत्वांच्या कमतरतेमुळे नखे कमकुवत होतात आणि लवकर तुटतात. नखे तुटण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे शरीरात कॅल्शियम, लोह आणि प्रोटीनची कमतरता. खाण्याच्या चुकीच्या सवयींमुळे नखे कमकुवत होतात. तुमची सुद्धा नखे वारंवार तुटत असतील तर काही खास टिप्स अवलंबा. काही घरगुती उपाय करून तुम्ही तुमची नखे मजबूत आणि निरोगी बनवू शकता.

**लिंबाचा रस लावा**

व्हिटॅमिन सी घेतल्याने नखांची वाढ वाढते. तुम्ही लिंबू कापून दिवसातून एकदा तरी हात आणि पायांच्या नखांवर घासू शकता. पाच मिनिटे चोळल्यानंतर कोमट पाण्याने हात धुवा. नखांवर लिंबू चोळल्याने नखे स्वच्छ आणि बॅक्टेरियापासून मुक्त राहतील, तसेच नखांची वाढही होईल.

**खोबरेल तेल लावा**

कोमट खोबरेल तेलाने नखांना मसाज केल्याने नखांची वाढ वाढेल. नारळाच्या तेलात भरपूर प्रमाणात अँटिऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन ई असते जे नखांच्या वाढीला चालना देण्यासाठी प्रभावी आहे. रोज रात्री झोपण्यापूर्वी तुमच्या नखांना खोबरेल तेलाने मसाज करा आणि तुम्हाला फरक दिसेल.



**संत्र्याचा रस देखील प्रभावी आहे**

संत्र्यामुळे कोलेजन तयार होण्यास मदत होते. कोलेजन हा एक महत्त्वाचा घटक आहे जो नखांच्या वाढीस मदत करतो आणि नखे मजबूत करतो. संत्र्यामधील अँटीऑक्सिडंट गुणधर्म कोणत्याही प्रकारच्या संसर्गापासून दूर राहतात. एका भांड्यात संत्र्याचा रस घ्या आणि नखे सुमारे १० मिनिटे त्यात बुडवून ठेवा. १० मिनिटांनंतर कोमट पाण्याने नखे धुवा आणि मॉइश्चरायझरने मसाज करा.

**ऑलिव्ह ऑइल देखील उपयुक्त आहे**

जर तुमची नखे खराब झाली असतील तर तुमच्यासाठी ऑलिव्ह ऑईल हा सर्वोत्तम पर्याय आहे. ऑलिव्ह ऑइल तुमच्या नखांच्या आतील थरापर्यंत पोहोचते आणि नखांची वाढ देखील वाढवते. हे रक्ताभिसरण सुधारण्यास मदत करते आणि नखांच्या वाढीस देखील मदत करते. ऑलिव्ह ऑईल नखांवर वापरण्यासाठी, ऑलिव्ह ऑइल थोडेसे कोमट करा आणि सुमारे पाच मिनिटे तुमच्या नखांना आणि क्यूटिकलला हळूवारपणे मसाज करा. तुम्हाला हवे असल्यास रात्री झोपण्यापूर्वी या तेलाने नखांची मसाज करा आणि सकाळपर्यंत असेच राहू द्या.

**(टीप: वरील टिप्सचा वापर करताना क्षेत्रातील तज्ञांचा सल्ला घ्या.)**

# दूध की दही, जाणून घ्या आरोग्यासाठी काय आहे फायदेशीर?

शरीराची योग्य वाढ होण्यासाठी कॅल्शियमची आवश्यकता असते. कॅल्शियमुळे हाडं व दात मजबूत होतात. याशिवाय कॅल्शियममुळे हाय ब्लड प्रेशर, हाय कॉलेस्ट्रॉल नियंत्रणात राहते. यामुळे रोजच्या जेवणात अशा कॅल्शियमयुक्त पदार्थांचा वापर करणे गरजेचे असते. दूध,दही व दुग्धजन्य पदार्थात कॅल्शियम असल्याने या पदार्थांचा आहारात समावेश करावा. पण बऱ्याचवेळा दूध घ्यावे की दही असा प्रश्न सगळ्यांना पडतो. यापैकी कोणता पदार्थ घेतल्याने अधिक फायदा होईल याबद्दल जाणून घेऊ या.

साधारणत: दह्याच्या तुलनेत सर्वप्रकारच्या दूधात सगळ्यात जास्त कॅल्शियम असते. १०० ग्रॅम दूधात १२५ मिलिग्रॅम कॅल्शियम असते. तर १०० दह्यातून फक्त ८५ मिलिग्रॅम कॅल्शियम असते. पण या दोघांचे सेवन केल्याने शरीराला फायदा मात्र नक्कीच होतो. त्यातही जर कॅलरीजबद्दल विचाराल तर २५० मिलिलीटर फॅट फ्री दूधात जवळजवळ ९० कॅलरीज आणि ९ ग्रॅम प्रोटीन असतं. तर एक कप फॅट फ्री दह्यात ९८ कॅलरीज आणि ११ ग्रॅम प्रोटीन असते. यावरून दूधाच्या तुलनेत दह्यात जास्त कॅलरीज आणि प्रोटीन असतात. यामुळे दूधापेक्षा दही शरीराला अधिक फायदेशीर आहे. दूध आणि दह्यामध्ये व्हिटामिन बी १२ आणि व्हिटामिन ए असतं. एक कप फॅट फ्री दही व दूध या दोघांमध्ये जवळजवळ ८ टक्के व्हिटामिन बी १२ आणि २ टक्के प्रमाण व्हिटामिन ए असते. तसेच १८ वर्षाहून अधिक वय असलेल्या व्यक्तींना दिवसाला कमीत कमी २.४ मायक्रोग्रॅम व्हिटामिन बी १२ आणि १.३ मिलिग्रॅम व्हिटामिन ए घेण्याचा सल्ला दिला जातो. दूध व दह्यात व्हिटामिनचे प्रमाण भरपूर असल्याने या दोन्ही पदार्थांचे सेवन करणे उपयुक्त आहे. त्यातही दूधापेक्षा दही खाणे तब्येतीसाठी जास्त फायदेशीर आहे.



पण सामान्य दही खाण्यापेक्षा फॅट फ्री दही खाणे जास्त फायदेशीर आहे. कारण यात कॅलरीजचे प्रमाण कमी असते. पण व्हिटामिन मात्र भरपूर असते. जर तुम्हाला तब्येत ठणठणीत ठेवायची असेल तर रोजच्या जेवणात २५० मिलीलीटर फॅट फ्री दह्याचे सेवन करा. पण ज्यांना बद्धकोष्ठ, दमा, सांधेदुखी व शरीराला सूज येण्याची तक्रार असेल त्यांनी दही न खाल्लेलच बरं.


प्रपत्र-१

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग, पुणे- ४११ ००३**

**दुरध्वनी क्रमांक :- (०२०)२५८१७५१७**

Web-www.mahapwd.gov.in and email - buildingpune.ee@mahapwd.gov.in

**ई निविदा सुचना क्रमांक ३० सन २०२३-२०२४ (ऑनलाईन)**

**(संदर्भ - सा.बां. विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि. २७/०९/२०१८)**

**कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग,शिवकिर्ती,सदनिका क्र.जी.६/१ व ६/२, घोरपडी रोड,पुणे-४११००१** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे खालील कामाकरिता **बी-२/एसबीडी** नमुन्यातील निविदा ई प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा अटीनुसार पात्र/समक्ष असलेले कंत्राटदार/संस्था/कंपनी यांचेकडुन मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर htpp://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत.निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १ | कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर पुणे येथे गोशाळा,सिलो बंकर,बायो गॅस युनिटस कंपोस्टिंग आणि स्टोरेज युनिटस,प्रयोगशाळा,शेतकरी वसतिगृह, प्रशिक्षण हॉल, प्रशासकिय आणि निवासी इमारती यांच्या इमारतींचे बांधकाम करणे. | **रु.३२.१६ कोटी** |

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दिनांक १३/०१/२०२५ ते दिनांक ०६/०२/२०२५ |
| निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | :- | दिनांक ०६/०१/२०२५ वेळ १८.०० पर्यंत |
| निविदा पुर्व चर्चा बैठक दिनांक वेळ व पत्ता | :- | दि.२८/०१/२०२५ वेळ स.१२.०० वाजता (बैठकिचे ठिकाण:- मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक,विभाग पुणे-४११ ००१ मध्यवर्ती इमारत आवार) |
| निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | :- | दिनांक १०/०२/२०२५ वेळ १०.०० पासुन पुढे |

निविदा सुचनेबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
१. www.mahapwd.com
२. mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल.)
३.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (इमारती)विभाग, पुणे ४११ ००३ कार्यालयातील सुचना फलक.

जा.क्र.लेखा/निविदा/३६/२०२५
कार्यकारी अभियंता,यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग,
शिवकिर्ती,सदनिका क्र.जी.६/१ व ६/२,
घोरपडी रोड,पुणे-४११००१
दि.०३/०१/२०२५

सही/-
(उ.सं.घावटे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग,
पुणे-४११००३

आरओसी-२०२३-२४/क्र-५/C ५५६५

# कलाविश्व

## लॉस एन्जेलिसच्या आगीतून थोडक्यात बचावली बॉलिवूडची सुप्रसिद्ध अभिनेत्री



बॉलिवूडची सुप्रसिद्ध अभिनेत्री प्रीती झिंटा लग्नानंतर अमेरिकेत राहते. अभिनेत्री अमेरिकेत राहत असली तरी भारतात येते. प्रीती झिंटाने लॉस एन्जेलिस येथे स्थायिक असलेल्या आर्थिक विश्लेषक जीन गुडएनफबरोबर लग्न केलंय. त्यामुळे प्रीती लॉस एन्जेलिस येथेच राहते. अशातच आता प्रीतीने सध्या लॉस एन्जेलिसमध्ये जंगलाला लागलेल्या आगीबद्दल पोस्ट शेअर केली असून स्वतःची आणि कुटुंबीयांची अपडेट दिली आहे. प्रीतीने तिच्या ट्विटर अकाउंटवर पोस्ट शेअर करत लिहिलं की, मी आणि माझं कुटुंब सध्या तरी सुरक्षित आहोत'

प्रीतीने पुढे लिहिलं की, 'माझ्या संपूर्ण कुटुंबाला इथून हलवण्यात आलं असून आम्हाला सतर्क राहण्यास सांगितलं आहे. धुरकट आकाशातून बर्फासारखी राख खाली पडतेय. वाऱ्याचा जोर अजून कमी झाला नाहीये. काय होईल याची भीती आहेच. लहान मुलं आणि वयोवृद्धांसोबत आम्ही या परिस्थितीचा सामना करत आहोत.'

'आमच्या समोर होणाऱ्या विध्वंसामुळे मी खूप निराश आणि काळजीत आहे. पण देवाचे आभार की, आम्ही सध्या सुरक्षित आहोत. ज्यांनी या आगीत आपलं सर्वस्व गमावलं आहे, त्यांच्यासाठी मी प्रार्थना करतेय. लवकरच वारा शांत होईल आणि आग विझवली जाईल, अशी आशा आहे. अग्निशामक विभाग, अग्निशामक कर्मचारी आणि आगीत अडकलेल्या अनेकांचे जीव वाचवण्यासाठी मेहनत करणाऱ्या प्रत्येकाचे मनःपूर्वक आभार. सर्वांनी काळजी घ्या.' असं प्रीतीने पुढे लिहिलंय.

दरम्यान, प्रियंका चोप्रानेही सोशल मीडियावर पोस्ट करून लॉस एन्जॉलिस येथील जंगलात लागलेल्या आगीविरोधात काम करणाऱ्या धाडसी बचाव पथकांचे आभार मानत पोस्ट शेअर करत ती म्हणालेली की, 'रात्रभर काम करणाऱ्या आणि पीडितांना मदत करणाऱ्या धाडसी बचाव पथकांना माझा सलाम. तुमच्या अथक प्रयत्नांसाठी मनःपूर्वक धन्यवाद.'

लॉस एन्जेलिस येथे ७ जानेवारी २०२५ रोजी लागलेल्या मोठ्या जंगलातील आगीमुळे ३०,००० हून अधिक रहिवाशांना आपली घरं सोडावी लागली आहेत. त्यानंतर कॅलिफोर्नियाचे गव्हर्नर गेविन न्यूजम यांनी लॉस एन्जेलिसमध्ये आपत्कालीन स्थिती जाहीर केलीये.

## चित्रपटसृष्टीत लेखकांना अपेक्षित श्रेय मिळणे आवश्यक; गीतकार, सिनेलेखक जावेद अख्तर यांचे प्रतिपादन



'एखादी इमारत ही अभियंत्यापेक्षा वास्तुविशारदाच्या नावाने ओळखली जाते, परंतु मी नम्रपणे खरे सांगतो की चित्रपटसृष्टीत लेखकांना अपेक्षित श्रेय मिळत नाही. याबाबत माझी वैयक्तिक तक्रार नाही, मला आजवर चित्रपटसृष्टीने भरभरून प्रेम दिले आहे. मात्र आजही काही उल्लेखनीय लेखकांना अपेक्षित श्रेय मिळत नाही. चित्रपट या कलाकृतीचा महत्त्वाचा घटक असलेल्या अशा लेखकांना प्रकाशझोतात आणून नावलौकिक, योग्य तो मान व दाम मिळणे आवश्यक आहे', असे मत ज्येष्ठ लेखक आणि गीतकार जावेद अख्तर यांनी व्यक्त केले. तसेच भारतात उत्तम कलागुण व कलारत्नांची खाण असून त्याला योग्य तो वाव मिळाला पाहिजे. तसेच आपण आपल्या मातीतील प्रादेशिक कलाकृतींसाठी आग्रही राहायला हवे', असेही जावेद अख्तर म्हणाले.

एशियन फिल्म फाऊंडेशन आयोजित २१ व्या 'थर्ड आय' आशियाई चित्रपट महोत्सवाला शुक्रवारपासून सुरुवात झाली. या महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र फिल्म स्टेज अँड कल्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील यांच्या हस्ते अंधेरी येथील मूव्हीमॅक्स चित्रपटागृहात शुक्रवारी झाले. याप्रसंगी चित्रपट क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल 'एशियन फिल्म कल्चर अॅवॉर्ड' या विशेष पुरस्काराने जावेद अख्तर यांना गौरविण्यात आले. या वेळी एशियन फिल्म फाऊंडेशनचे अध्यक्ष किरण व्ही. शांताराम, महोत्सवाचे संचालक डॉ. संतोष पाठारे, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी उपस्थित होते.

हिंदी चित्रपटसृष्टीतील लेखणीचे जादूगार समजले जाणारे जावेद अख्तर यांनी आपल्या गाणी, गझल, चित्रपट, संगीत आणि पटकथांद्वारे चित्रपटविश्वात एक वेगळे स्थान प्राप्त केले आहे. शोले , जंजीर, दिवार यांसारख्या अतिशय लोकप्रिय चित्रपटांचे लेखन करणाऱ्या ज्येष्ठ लेखक आणि गीतकार जावेद अख्तर यांनी रसिकांना आजवर अनेक उत्तमोत्तम चित्रपट दिले आहेत. गीतकार, पटकथाकार आणि कवी म्हणून भारतीय चित्रपटांसाठी त्यांचे अमूल्य योगदान राहिले आहे.

अंधेरी व शीव येथील मूव्हीमॅक्स चित्रपटगृह तसेच ठाण्यातील विवियाना मॉल येथील सिनेपोलिस चित्रपटगृहात १६ जानेवारीपर्यंत चित्रपट पाहायला मिळणार आहेत. 'ब्लॅक डॉग' या चिनी चित्रपटाने २१ व्या थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सवाचा शुभारंभ झाला.

दरम्यान, 'आपल्या चित्रपटांची परंपरा ही गीत-संगीताची आहे. मात्र हल्लीच्या चित्रपटांमध्ये मला गीत- संगीताचा अभाव दिसतो. दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये ही परंपरा आवर्जून जपली जाते.


आपल्याकडे चित्रपटांत गीत – संगीताला महत्त्व दिले. तर आपला चित्रपट हा जागतिकदृष्ट्या नक्कीच नावाजला जाईल. तसेच आशियाई देशांमध्ये प्रचंड कल्पकता व ऊर्जा आहे. त्यामुळे भारतात आशियाई चित्रपटांचा महोत्सव होणे हे महत्त्वपूर्ण आहे. हा चित्रपट महोत्सव आशियाई देशातील कलाकारांना प्रोत्साहन देणारा आहे', असेही जावेद अख्तर म्हणाले.

# शरद पवारांच्या दगाफटक्याचे राजकारण २० फूट जमिनीमध्ये गाडलं; अमित शहा यांचा हल्लाबोल

जनप्रवास । प्रतिनिधी

अ.नगर : भारतीय जनता पक्षाचे राज्यस्तरीय अधिवेशन शिर्डी येथे होत आहे. या अधिवेशनातून भाजपाच्या कार्यकर्त्यांचं कौतुक केलं जात असून विरोधकांवर निशाणा साधला जात आहे. विधानसभा निवडणुकीच्यानंतर पहिल्यांदाच हा मोठा कार्यक्रम होत असल्याने राज्यभरातील भाजपाचे बडे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते या सोहळ्याला उपस्थित राहिले आहेत. दरम्यान, भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री अमित शाह यांनीही या कार्यक्रमाला उपस्थित राहत कार्यकर्त्यांचे आभार मानले. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील विरोधी पक्ष शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षावरही निशाणा साधला.

भारतीय जनता पक्षाचे राज्यस्तरीय अधिवेशन शिर्डी येथे होत आहे. या अधिवेशनातून भाजपाच्या कार्यकर्त्यांचं कौतुक केलं जात असून विरोधकांवर निशाणा साधला जात आहे. विधानसभा निवडणुकीच्यानंतर पहिल्यांदाच हा मोठा कार्यक्रम होत असल्याने राज्यभरातील भाजपाचे बडे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते या सोहळ्याला उपस्थित राहिले आहेत. दरम्यान, भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय



मंत्री अमित शाह यांनीही या कार्यक्रमाला उपस्थित राहत कार्यकर्त्यांचे आभार मानले. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील विरोधी पक्ष शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षावरही निशाणा साधला.

अमित शाह म्हणाले, महाराष्ट्राच्या महाविजयानंतर आपण पहिल्यांदा एकत्र आलो आहेत. तुम्ही (कार्यकर्त्यांनी) किती मोठं काम केलंय याची तुम्हाला कल्पना नाही. देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री बनले. अनेक कार्यकर्ते आमदार आणि मंत्री झाले. १९७८ पासून शरद पवारांनी दगाफटक्याचं राजकारण सुरू केलं होतं, त्याला २० फूट जमिनीत गाडण्याचं काम कार्यकर्त्यांनी केलं. उद्धव ठाकरेंनी द्रोह केला, २०१९ ला विचारधारा सोडली. बाळासाहेब ठाकरेंच्या सिद्धांताला सोडलं होतं. दगफटका करून उद्धव ठाकरे मुख्यमंत्री बनले होते, त्यांना तुम्ही त्यांची जागा दाखवली. १९७८ ते २०२४ महाराष्ट्रात अस्थिरतेची स्थिती होती. अस्थितरता सोडून स्थिर राष्ट्र बनवण्याचं काम देवेंद्र फडणवीसांनी केलं आहे. लोकसभेनंतर आमचा विजय होईल, असं विरोधकांचा स्वप्न होतं. पण त्यांच्या स्वप्नांचा चुराडा करण्याचं काम तुम्ही केलं. काही निवडणुका अशा असतात की त्या देशाचं राजकारण बदलतात. महाराष्ट्राचे शिल्पकार भारताचे जनता पक्षाचे कार्यकर्ते आहेत, असंही अमित शाह म्हणाले.

## आजपासून महा कुंभमेळा सुरू

प्रयागराज : येथे आजपासून महा कुंभमेळा सुरू होणार आहे. हिंदू धर्मात प्रयागराज मध्ये आयोजित महाकुंभाला विशेष धार्मिक आणि अध्यात्मिक महत्त्व आहे. इथे गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वती नदीचा संगम होतो त्याला त्रिवेणी संगम असे म्हणतात. भारतातील प्रयागराज, नाशिक, उज्जैन आणि हरिद्वार या चार ठिकाणी महा कुंभ मेळाव्याचे आयोजन केले जाते. साधू संत आणि भक्त या पवित्र स्थानांवर होणाऱ्या महान उत्सवाची आतुरतेने वाट पाहत असतात. असे म्हणतात की महा कुंभाच्या वेळी त्रिवेणी घाटावर स्नान केल्याने मनुष्याला जीवनातील सर्व पापांपासून मुक्ती मिळते. त्यामुळे आत्मा आणि शरीर दोन्ही शुद्ध होतात. पौष पौर्णिमेच्या दिवशी महा कुंभाचे पहिले शाही स्नान होणार आहे. वैदिक दिनदर्शिकेनुसार पौष महिन्याची पौर्णिमा सोमवार १३ जानेवारी रोजी पहाटे ०५: ०३ मिनिटांनी सुरू होईल आणि १४ जानेवारी रोजी ३: ५६ मिनिटांनी संपेल.

## बृहतसूचीवरील पात्र भाडेकरुंना सशर्त ताबा, म्हाडा उपाध्यक्षांचा निर्णय

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या बृहतसूची सोडतीतील पात्र भाडेकरूंच्या निकटच्या वारसांना आता सदनिकेचा सशर्त ताबा देण्याचा निर्णय म्हाडा उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांनी घेतला आहे. मृत भाडेकरुंचे एकापेक्षा अधिक वारस असल्यास सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र आवश्यक असते. ते प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सहा ते नऊ महिन्यांचा कालावधी लागतो. त्यामुळे ताबा घेण्यास विलंब होत असल्याने जयस्वाल यांनी सदनिकेचा सशर्त ताबा देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार लाभार्थ्यांनी ताबा मिळाल्यापासून सहा महिन्यात वारस प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असेल. या निर्णयामुळे वारसांना, लाभार्थ्यांना दिलासा





मिळणार आहे.

वर्षानुवर्षे संक्रमण शिबिरात राहणार्या संक्रमण शिबिरार्थींना कायमस्वरुपी हक्काची घरे देण्यासाठी बृहतसूची तयार केली जाते. सोडतीद्वारे बृहतसूचीवरील संक्रमण शिबिरार्थींना घरांचे वितरण केले जाते. संक्रमण शिबिरात ३० ते ५० वर्षांपासून उपकरप्राप्त इमारतीतील मूळ भाडेकरु राहतात. अशावेळी अनेक मूळ भाडेकरूंचा मृत्यू झालेला असतो. अशा प्रकरणांमध्ये मृत भाडेकरूंचे पत्नी वा मुले असे एकापेक्षा अधिक वारस असल्यास त्यांना सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र बंधनकारक असते. ते घेण्यासाठी सहा ते नऊ महिन्यांचा कालावधी लागतो. परिणामी घराच्या वितरणास विलंब होतो. ही बाब लक्षात घेता सदनिकेचे वितरण वेगाने व्हावे यासाठी आता बृहतसूचीवरील घरांचे सशर्त वितरण वारसांना करण्याचा निर्णय जयस्वाल यांनी घेतला आहे.

बृहतसूचीवरील मूळ भाडेकरूच्या निकटचे वारस (मुलगा, मुलगी, आई-वडील किंवा पत्नी) असल्यास इतर नातेवाईकांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन सदनिकेचा सशर्त ताबा देता येईल. महत्त्वाचे म्हणजे सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र सादर होईपर्यंत सदर सदनिकेची खरेदी – विक्री किंवा कोणत्याही प्रकारचा त्रयस्थ हक्क निर्माण करता येणार नाही.

## पश्चिम रेल्वेवरील मेगाब्लॉकमुळे प्रवाशांचे हाल, अनेक गाड्या रद्द

जनप्रवास । प्रतिनिधी

वसई : पश्चिम रेल्वे-वरील मेगाब्लॉकमुळे आज (दि.१२) अनेक प्रवाशांचे हाल झाले. विरार, नालासोपारा, भाईंदर, मिरा रोड आणि इतर स्थानकांवर मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळाली. कुटुंबासह प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा मोठा फटका बसलाय.



अंधेरी आणि बोरीवलीदरम्यान चालणाऱ्या काही गाड्या गोरेगावपर्यंतच मर्यादित

रेल्वे प्रशासनाने सांताक्रूझ आणि गोरेगाव स्थानकांदरम्यान सकाळी १० वाजेपासून दुपारी ३ वाजेपर्यंत जलद मार्गावर पाच तासांचा जम्बो ब्लॉक घेतला होता. या ब्लॉकदरम्यान, जलद मार्गावरील गाड्या धीम्या मार्गांवर वळवण्यात आल्या होत्या. परिणामी, काही गाड्या रद्द करण्यात आल्या तर अंधेरी आणि बोरीवलीदरम्यान चालणाऱ्या काही गाड्या गोरेगावपर्यंतच मर्यादित होत्या.

रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी

मेगाब्लॉकमुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणात असुविधा सहन करावी लागली. रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी होती. गाड्या रद्द झाल्याने प्रवाशी, तसेच कुटुंबीयांसह प्रवास करणाऱ्या नागरिकांची मोठी तारांबळ उडाली होती.

आज पश्चिम रेल्वेवर मेगाब्लॉकमुळे अनेक प्रवाशांचे हाल झाले. विरार, नालासोपारा, भाईंदर, मिरा रोड आणि इतर स्थानकांवर मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळाली. कुटुंबासह प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा मोठा फटका बसला.

रेल्वे प्रशासनाने सांताक्रूझ आणि गोरेगाव स्थानकांदरम्यान सकाळी १० वाजेपासून दुपारी ३ वाजेपर्यंत जलद मार्गावर पाच तासांचा जम्बो ब्लॉक घेतला होता. या ब्लॉकदरम्यान, जलद मार्गावरील गाड्या धीम्या मार्गांवर वळवण्यात आल्या होत्या. परिणामी, काही गाड्या रद्द करण्यात आल्या तर अंधेरी आणि बोरीवलीदरम्यान चालणाऱ्या काही गाड्या गोरेगावपर्यंतच मर्यादित होत्या.

मेगाब्लॉकमुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणात असुविधा सहन करावी लागली. रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी होती. गाड्या रद्द झाल्याने प्रवाशी, तसेच कुटुंबीयांसह प्रवास करणाऱ्या नागरिकांची मोठी तारांबळ उडाली होती.

## मालाड मीठ चौकी उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांची घोषणा

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : मालाडमधील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाचा असा मीठ चौकी उड्डाणपूल रविवारपासून जनतेसाठी खुला करण्यात आला. बांधकाम पूर्ण झाल्यामुळे हा पूल उद्घाटन सोहळ्याशिवाय वाहतुकीसाठी खुला करण्यात येत असल्याची घोषणा केंद्रीय मंत्री आणि उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातील खासदार पीयूष गोयल यांनी केली. रविवारी त्यांनी या पुलाची पाहणी केली व पूल वाहतुकीसाठी खुला करण्याचे निर्देश दिले.

मुंबई महानगरपालिकेने मालाड पूर्व – पश्चिम परिसर जोडण्यासाठी मीठ चौकी पूल उभारला. मालाड पश्चिमेला असलेल्या मीठ चौकी जंक्शनवर टी आकाराच उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. या पुलामुळे मार्वेकडून पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे अर्थात पश्चिमेकडून पूर्वेकडे जाता येणार आहे. मार्वे ते पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणारी एक मार्गिका आणि मार्वेकडून गोरेगावकडे जाणारी दुसरी मार्गिका अशी उड्डाणपुलाची रचना आहे. त्यापैकी मार्वे ते पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणारी एकेरी मार्गिका ६ ऑक्टोबर २०२४ पासून वाहतुकीसाठी खुली करण्यात आली आहे. तर गोरेगावकडे जाणाऱ्या मार्गिकेचे काम उद्याप सुरू होते. ते कामही पूर्ण झाले असून पीयूष गोयल यांनी रविवारी या पुलाची पाहणी केली व पूल वाहतुकीसाठी सुरू करण्याची घोषणा केली.

## महावितरणला सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रीय पुरस्कार

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या नाविन्यपूर्ण योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल महावितरण आणि एमएसईबी सोलर ग्रो पॉवर लिमिटेड कंपनीला शनिवारी बेळगावी येथे आयपीपीएआय पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्याचसोबत सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल विविध वर्गवारीतील एकूण आठ पुरस्कार देऊन महावितरणचा सन्मान करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चा गौरव झाल्याबद्दल महावितरणचे आणि अपर मुख्य





सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या नेतृत्वाखालील एमएसईबी सोलर ग्रो पॉवर लिमिटेड कंपनीचे अभिनंदन केले. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी मा. मुख्यमंत्र्यांचे आभार मानले असून कंपनीच्या गौरवाबद्दल महावितरणचे वीज ग्राहक तसेच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

इंडिपेंडेन्ट पॉवर प्रोड्युसर्स असोसिएशन ऑफ इंडिया (आयपीपीएआय) या राष्ट्रीय संस्थेने देशभरातील विद्युत कंपन्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करून हे पुरस्कार दिले. सौरऊर्जेचा वापर करून वीजनिर्मिती करायची व त्या आधारे कृषी फीडर्स चालवून शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी दिवसा वीज पुरवठा करायचा अशी नाविन्यपूर्ण मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० महावितरणतर्फे राज्य सरकारचा ऊर्जा विभाग व एमएसईबी सोलर ग्रो पॉवर लिमिटेड कंपनीच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अंमलात येणारी ही योजना शेतकऱ्यांना लाभदायक ठरण्यासोबत उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी करणारी आणि एकंदरितच ऊर्जा क्षेत्रात परिवर्तन करणारी आहे. या योजनेमुळे कार्बन उत्सर्जन कमी करण्यास मदत होणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणला शनिवारच्या सोहळ्यात दोन पुरस्कार देण्यात आले.

# राज्यातील विद्यापीठांमध्ये सायबर सुरक्षेबाबत अल्पकालीन अभ्यासक्रम राबविण्यात येईल : राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : राज्यातील सर्व कुलगुरूंची बैठक घेऊन सायबर सुरक्षेबाबत अल्पकालीन अभ्यासक्रम तयार करण्यासह सर्व विद्यापीठात राबविण्यात येईल, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. हे अभ्यासक्रम राबविल्यामुळे सायबर योद्ध्यांची एक नवीन पिढी तयार होईल, असेही ते म्हणाले.

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवॉर्ड्स' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, महाराष्ट्र सायबरचे उप महानिरीक्षक संजय शिंत्रे, क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, क्विक हील टेक्नॉलॉजीस लि. चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलास काटकर, सह व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय काटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल साळवी, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

स्वामी विवेकानंदांना जयंतीनिमित्त अभिवादन करून राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले, स्वामी विवेकानंदांची शिकवण लाखो लोकांना,





विशेषतः तरुणांना, धैर्याने, शहाणपणाने आणि उद्देशाने नेतृत्व करण्यासाठी प्रेरणा देत आहे. त्यामुळे क्विक हील फाउंडेशनने आयोजित केलेल्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा पुरस्कारांमध्ये युवकांसोबत सामील होताना आनंद होत आहे.

२०१६ पासून हा कार्यक्रम सुरू करून आतापर्यंत ५४ लाख लोकांपर्यंत सायबर सुरक्षेबद्दल जागरूकता केल्याबद्दल फाउंडेशन आणि क्विक हील टेक्नॉलॉजीसचे अभिनंदन करून राज्यपाल म्हणाले, फाउंडेशनने समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यावर आणि सायबर-सुरक्षित समाज निर्माण करण्यासाठी त्यांना सक्षम करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. या फाउंडेशन बरोबर जोडले जाऊन तळागाळापर्यंत काम केलेले सर्व सायबर वॉरियर्स' कौतुकास पात्र आहेत.

ते पुढे म्हणाले, सायबर सुरक्षा ही भारतासह जगभरातील सर्वात गंभीर चिंतांपैकी एक म्हणून उदयास आली आहे, आज आपण पेमेंट स्वीकारण्यासाठी आणि करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानावर अधिकाधिक अवलंबून आहोत. अगदी अशिक्षित छोटा विक्रेता देखील डिजिटल पेमेंट स्वीकारतो. हे प्रधानमंत्री मोदी यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या तंत्रज्ञानाचे यश आहे.

तंत्रज्ञान पुढे जात असताना चुकीचे काम करणारे लोकदेखील वाढत आहेत. तथापि, त्यांची साखळी तोडणे आणि त्यांना पकडण्याचे कामदेखील आपल्याला करावे लागणार आहे. आज सायबर गुन्हेगारीत स्थिर गतीने वाढ होत आहे. त्यामुळे प्रत्येकाला सायबर गुन्हेगारीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. दुसऱ्या बाजूला सामान्य नागरिक त्याचा पैसा गमावणार नाही अशी यंत्रणा आपल्याला विकसित करावी लागेल.

□ संपादक – संजय प्रल्हाद भोकरे □ सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com